सोलापूर तरुण भारत

# आसमंत



**अमेरिकेतल्या निवडणुकांत ट्रम्प आणि कमला हॅरिस यांच्यातील चुरस तीव्र असून, या लढतीत पराभूत उमेदवार आपला पराभव मान्य करणार का, हा प्रश्न आहे. तेथील भारतीयांच्या मतदानामुळे निकालात किती फरक पडणार आणि मुख्य म्हणजे नरेंद्र मोदी भारतीयांशी संवाद साधताना तटस्थ राहाणार का, याबद्दल उत्सुकता आहे. नरेंद्र मोदी अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणात ढवळाढवळ करणार नसले तरी, तिथे बांगलादेशमधील हिंदूंचा मुद्दा उपस्थित करुन सूचक इशारा देऊ शकतात. त्यामुळे मोदींच्या अमेरिका दौऱ्याकडे जगाचे लक्ष आहे.**

लक्ष्यवेध

**अनय जोगळेकर**

## मोदींचा लक्षवेधी अमेरिका दौरा

संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेला जाणारे नरेंद्र मोदी या सभेत मात्र भाषण करणार नाहीत. नरेंद्र मोदींचा दौरा २१ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर या कालावधीत आयोजित केला असून सर्वसाधारण सभेत जागतिक नेत्यांच्या भाषणांना २४ सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. नरेंद्र मोदींना २६ सप्टेंबर ही तारीख देण्यात आली होती. पण, एवढा काळ अमेरिकेत थांबणे मोदींसाठी शक्य नसल्यामुळे २८ सप्टेंबरला त्यांच्याऐवजी परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. सुब्रमण्यम जयशंकर भाषण करणार आहेत. नरेंद्र मोदी २१ सप्टेंबरला पार पडणाऱ्या 'क्वाड' गटाच्या नेत्यांच्या परिषदेत सहभागी होतील. त्यानंतर ते 'समिट ऑफ द फ्युचर' या परिषदेत जगभरातील आघाडीच्या नेत्यांसह सहभागी होतील. याशिवाय, मोदी लाँग आयलंड येथे अमेरिकेत स्थायिक झालेल्या अमेरिकन लोकांच्या अतिभव्य सभेस संबोधित करणार आहेत.

सभास्थानाची क्षमता १६ हजार असली तरी, २४ हजार लोकांनी नोंदणी केली आहे. यावर्षी नरेंद्र मोदींच्या मॅडिसन स्क्वेअर येथील सभेला दहा वर्षे पूर्ण होत आहेत. गुजरातमधील दंग्यांचे निमित्त करुन अमेरिकेने मोदींना अनेक वर्षे व्हिसा नाकारला होता. २०१४ सालच्या निवडणुकांमध्ये नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वातील सरकार येणार, हे स्पष्ट झाल्यावर मोदींच्या अमेरिका प्रवासावरील अघोषित बंदी उठली. पंतप्रधान झाल्यावर आपल्या पहिल्या अमेरिका दौऱ्यात मोदींना ऐकायला अलोट गर्दी जमली होती. मोदींचा हा दौरा अमेरिकेतीत अध्यक्षीय निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पार पडत आहे. कमला हॅरिस आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील लढतीतील उत्कंठा आता शिगेला पोहोचली आहे.

भारत आणि अमेरिका संबंध वर्षागणिक अधिकाधिक मजबूत होत असले तरी, या संबंधांना तडे जाणाऱ्या गोष्टीही घडत आहेत. बांगलादेशमधील सत्तांतर हे त्याचे उत्तम उदाहरण. गेल्या वर्षीच्या अखेरीस बांगलादेशमधील निवडणुकांच्या दरम्यान पंतप्रधान शेख हसीना परकीय हस्तक्षेपाचा मुद्दा वारंवार उपस्थित करत होत्या. त्यांचा रोख अमेरिकेकडे होता. बांगलादेशमधील न्यायालयाच्या आरक्षणाबद्दलच्या वादग्रस्त निर्णयानंतर तिथे उसळलेले हिंसक आंदोलन, विद्यार्थ्यांना पुढे करुन झालेले सत्तांतर आणि या आंदोलनाचा फायदा घेत तेथील हिंदूविरुद्ध झालेले अत्याचार यांमुळे भारतातील जनमत ढवळून निघाले. त्यात भर म्हणून मणिपूरमध्ये भडकलेला हिंसाचार, कुकी गटांच्या हाती ड्रोन आणि रॉकेटसारखी शस्त्रास्त्रे लागणे आणि या शस्त्रांच्या साहाय्याने त्यांनी हल्ले करणे यामुळे भारताच्या डोकेदुखीत वाढ झाली आहे. म्यानमार आणि भारत यांच्या सीमेलगत कुकी लोकांची वस्ती असून, म्यानमारमधील कुकी लोक स्वतंत्र देशासाठी तेथील लष्करी राजवटीविरोधात लढत आहेत. त्यांना जर्मनी आणि अमेरिकेतील स्वयंसेवी संस्थांकडून साहाय्य केले जाते.

अमेरिकेला भारताशी मैत्री महत्त्वाची असेल तर, अमेरिका भारताच्या सीमाभागांत अशांतता निर्माण होऊ शकेल, अशा गोष्टींमध्ये नाक का खुपसते, असा प्रश्न भारतातील सुशिक्षित मध्यमवर्गीय लोक विचारु लागले आहेत. अशीच ढवळाढवळ २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये तर केली गेली नसेल ना, असा प्रश्न त्यांच्या मनात उपस्थित होणे स्वाभाविक आहे.


गेल्या महिन्यात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह अमेरिकेला गेले असता, भारत आणि अमेरिका यांच्यामध्ये संरक्षण क्षेत्रातील पुरवठा साखळीबद्दल तसेच लष्करी सहकार्यासाठी एकमेकांच्या देशांमध्ये प्रतिनिधी नेमण्याबाबत करार करण्यात आले. मोदींच्या अमेरिका दौऱ्यातही काही महत्त्वाच्या घोषणा केल्या जातील. गेल्या आठवड्यात इस्रायलच्या वाहतूकमंत्री मिरी रेगेव आणि जपानचे माजी पंतप्रधान शिंझो आबे यांच्या पत्नी अकी आबे भारतात येऊन गेल्या. या आठवड्यात संयुक्त अरब अमिरातींचे युवराज शेख खलिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांनी दिल्ली आणि मुंबईला भेट दिली. या भेटीत व्यापार, गुंतवणूक, अणुऊर्जा, पेट्रोलियमजन्य पदार्थ आणि तंत्रज्ञान संबंधित विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षर्या करण्यात आल्या. याच कालावधीत परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. जयशंकर यांनी सौदी अरेबियाची राजधानी रियाध येथे पहिल्या भारत-आखाती सहकार्य काऊन्सिलच्या कूटनैतिक परिषदेत सहभाग घेतला. २१ सप्टेंबर रोजी नरेंद्र मोदी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन यांच्या डेलवेर राज्यामधील 'क्वाड' परिषदेत सहभागी होणार आहेत. खरे तर यावर्षी 'क्वाड' परिषद भारतात होणार होती. भारताने जो बायडन यांना प्रजासत्ताक दिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. त्याच सुमारास 'क्वाड' परिषदेचे आयोजन करण्याचा प्रयत्न होता. पण, अमेरिकेतल्या अंतर्गत राजकारणामुळे बायडन येऊ शकले नाहीत. आता बायडन यांच्या अध्यक्षपदाचे अखेरचे दोन महिने उरले असल्यामुळे भारताने आपले यजमानपद अमेरिकेकडे हस्तांतरित केले.

जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा यांनीही राजकारणातून निवृत्ती जाहीर केली आहे. त्यांनी या महिन्यात होणाऱ्या पक्षाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुका न लढण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाचे नवीन अध्यक्ष पंतप्रधानपद स्वीकारणार असल्यामुळे त्यांची कारकीर्दही काही आठवड्यांमध्ये संपणार आहे. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान ॲन्थनी अल्बानिस यांच्याविरुद्ध जनमत तीव्र आहे. असे असताना, सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान बनलेल्या नरेंद्र मोदींचे स्थान सगळ्यात बळकट आहे. बायडन आणि किशिदा यांची कारकीर्द अखेरच्या टप्प्यात असली तरी, अनेकदा अशाच वेळेत नेते इतिहासात आपली नोंद व्हावी, यासाठी काही निर्णय घेतात. अशाच प्रकारचे निर्णय 'क्वाड' परिषदेत घेतले जातील, अशी अपेक्षा आहे. 'समिट ऑफ द फ्युचर' या कार्यक्रमाला जास्त महत्त्व आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेत दरवर्षी तेच तेच नेते त्याच त्याच मुद्द्यांवर बोलतात, ज्याची जागतिक पातळीवर फारशी दखल घेतली जात नाही. पण, सध्याची परिस्थिती अत्यंत स्फोटक आहे. एकीकडे युक्रेन आणि गाझा पट्टीत युद्ध सुरु आहे. दोन्ही युद्धांचा विस्तार होण्याची भीती आहे. येमेनमधील हुती बंडखोरांकडून होणाऱ्या हल्ल्यांमुळे सुएझ कालव्यातून होणाऱ्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. चीनचा विस्तारवाद आणि चीनने तंत्रज्ञानक्षेत्रात मारलेली मुसंडी यांमुळे पाश्चिमात्य देशांच्या छातीत धडकी भरली असली तरी, चीनवर त्यांचे असलेले अवलंबित्व कमी होणार नाही. युद्धांमुळे जगभरात अनेक देशांमध्ये महागाई आणि बेरोजगारीच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ होऊन सत्तांतर झाले. आफ्रिकेतून युरोपात बेकायदेशीरपणे येणाऱ्या लोकांची संख्या बेसुमार वाढल्याने युरोपात अनेक ठिकाणी उजव्या विचारसरणीचे पक्ष सत्तेवर आले. (पान ४ वर)

वेधक

**प्रतिनिधी**

## राहुल गांधींची असत्याची फॅक्टरी!




राहुल गांधी यांची असत्याची फॅक्टरी पुन्हा एकदा धडधडू लागली आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी इंग्लंड आणि युरोपातील काही विद्यापीठांमध्ये दिलेल्या भाषणांमध्ये मोदी सरकार आणि भाजप यांच्यावर प्रच्छन्न टीका तर केलीच होती, पण ते करताना भारताचीही बदनामी केली होती. लोकसभा निवडणुकीनंतर त्यांनी हाच उद्योग पुन्हा सुरू केला आहे. राहुल गांधी हे सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. तिथे टेक्सास विद्यापीठात भाषण करताना त्यांनी आपला जुनाच भारतविरोधी राग आळविला.

आपल्या भाषणात त्यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर यथेच्छ पण बिनातथ्य टीका केली आहे. इतकेच नव्हे, तर मोदी यांच्यामुळे भारतात कारखाने बंद पडत असून, त्यामुळे हजारो लोक बेरोजगार होत असल्याचा अभिनव शोधही लावला आहे. भाजप आणि संघ यांची विचारसरणी प्रतिगामी आणि पुरुषप्रधान असल्याचा दावा करताना त्यांना महिलांनी केवळ घर सांभाळावे असे वाटते, असाही आरोप केला आहे. राहुल गांधी यांच्या आजवरच्या सर्व वक्तव्यांचा इतिहास पाहाता, त्यांनी हे आरोप कोणत्या आधारावर केले आहेत, असे विचारण्याचा नादानपणा आम्ही करणार नाही. बालकबुद्धीच्या वक्तव्यांना तर्कशुद्धतेचे निकष लावायचे नसतात, याची जाणीव आम्हाला आहे. तरीही भारतातील विरोधी पक्षनेते या नात्याने राहुल गांधी यांच्या वक्तव्याची छाननी करणे, आमचे कर्तव्य आहे.

गेल्या काही वर्षांत, विशेषत: 'कोविड'च्या साथीपासून बहुसंख्य अमेरिकी आणि युरोपीय कंपन्यांनी चीनमधील आपले कारखाने अन्य देशांमध्ये हलविण्यास प्रारंभ केला आहे. तैवानवरील चीनच्या संभाव्य हल्ल्यांचाही त्यामागे विचार आहे. चीनपेक्षा या कंपन्यांना आता भारत हे उत्पादनाचे आकर्षक केंद्र वाटत आहे. गेल्या पाच वर्षांत भारतात अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक झाली असून 'फॉक्सकॉन'सारख्या अनेक कंपन्यांनी भारतात सेमीकंडक्टरची चिप, मोबाईल वगैरे उच्च तंत्रज्ञानावर आधारित उत्पादने भारतात बनविण्यासाठी गुंतवणूक केली आहे. आय-फोन आता भारतात तयार होत असून 'ॲपल' कंपनीची अन्य उत्पादनेही लवकरच भारतात बनविली जातील. संरक्षण सामग्री क्षेत्रातील अनेक उत्पादने आता भारतात बनत आहेत. बांगलादेशातील राजकीय अस्थैर्यामुळे तेथील वस्त्रोद्योगही भारतात स्थलांतरित होऊ लागला आहे. या स्थितीत मोदी यांनी भारतातील कारखाने बंद पाडले, असे विधान राहुल गांधी कोणत्या आधारावर करीत आहेत? पण, राहुल गांधी यांना सत्यासत्यतेशी काही देणे-घेणे नाही. त्यांना मोदी आणि भाजपविरोधाचा आपला कंडू शमवायचा असतो.

**खरा प्रश्न हा राहुल गांधी यांना आपल्या संस्थेत भाषण करण्यासाठी आमंत्रित करणाऱ्या संस्थांचा आहे. पाश्चिमात्य देशांतील बहुराष्ट्रीय कंपन्या, बँका, जागतिक बँक, नाणेनिधी यांसारख्या संस्था भारताच्या आर्थिक विकासाबद्दल किती आशेने आणि भरभरून बोलतात हे लक्षात घेता, राहुल गांधी हे 'सीरियल खोटारडे' असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. तरीही त्यांना आपल्या संस्थेत भाषणासाठी बोलाविणाऱ्याचाच बुध्यांक तपासून पाहाण्याची गरज आहे, अन्यथा त्यांच्या आमंत्रणामागे भारतविरोधी छुपा अजेंडा आहे, असेच म्हणावे लागते.**

राहुल गांधी यांच्या असत्य भाषणांचा इतिहास आता सर्वविदित. भारतातील जनतेलाही त्यांच्या भाषणातील खोटेपणा लक्षात येऊ लागला आहे. असे असतानाही परदेशातील, विशेषत: पाश्चिमात्य देशांतील विद्यापीठे आणि अन्य संस्था यांच्याकडून राहुल गांधी यांना भाषणासाठी आमंत्रित केले जाते, हीच मुळी आश्चर्याची बाब. विद्यापीठे ही ज्ञानाची केंद्रे असतात आणि त्यांना जागतिक घडामोडी आणि जागतिक महत्त्वाच्या नेत्यांची विशेष माहिती असते. भारतातील विरोधी पक्षनेते म्हणून त्यांना भाषणासाठी आमंत्रण मिळते, असे जरी म्हटले तरी ज्या वक्त्याला आपण आमंत्रित करतो, त्याचे कर्तृत्त्व आणि इतिहास काय आहे, त्याचे काम स्पृहणीय आणि भरीव आहे का, ते तपासून पाहाण्याची गरज असते.

राहुल गांधी यांनी आजवर ज्या ज्या परदेशी संस्थांमध्ये भाषणे दिली, त्या भाषणातील एकही मुद्दा वास्तवाच्या कसोटीवर खरा उतरत नाही, हे दिसून आले आहे. थोडक्यात, राहुल गांधी यांची टीका ही पोकळ आणि बिनातथ्यावर आधारित असते, हे त्यांचे भाषण वरवर ऐकणार्यालाही कळून येते. ज्या मोदी यांच्यावर राहुल गांधी कडाडून टीका करतात, त्या मोदींना जगातील अनेक देशांनी आपले सर्वोच्च मानसन्मान दिले आहेत. मोदी यांच्याइतके मानसन्मान तर मनमोहन सिंह किंवा नेहरू यांनाही मिळाले नव्हते. (पान ४ वर)

## पसमांदा मुस्लिमांना हक्क देणार नवा 'वक्फ' कायदा

**आता मुस्लीम समाजातील मागास जाती आणि समुदाय आपल्या हक्काची भाषा बोलू लागला आहे. 'वक्फ सुधारणा विधेयका'मध्ये पसमांदा मुस्लिमांसह अन्य संख्येने अगदी कमी असलेल्या जातीदेखील प्रतिनिधित्वाची भाषा बोलू लागल्या आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने मुस्लिमांमध्ये आपल्या हक्कांविषयी जाणीव निर्माण होऊन जागृती होत असल्याचे दिसून येत आहे.**


समाजभान

**पार्थ कपोले**

भारतात अनेक जातीधर्मांचे लोक राहतात आणि जवळपास सर्वच धर्मांत दानधर्माची परंपरा आहे. पण, कोणत्याही धर्मात 'वक्फ' बोर्डासारखी धर्मादाय संस्था अस्तित्वात नाही. स्वातंत्र्य आणि फाळणीपूर्वीही काही लोकांनी तत्कालीन सरकारशी संगनमत करून त्यांच्या हिताचे कायदे केले. त्याचे नियम आणि कायदे वेळोवेळी बदलत राहातात. आत्तापर्यंत देशात कोणाचेही सरकार असो, 'वक्फ' बोर्डावर फक्त 'अश्रफ' म्हणजेच बाहेरून आलेले मुस्लीम शासकांचे वंशज किंवा मुस्लिमांच्या उच्च वर्गाचेच अधिकारी राहिले आहेत.

'वक्फ' म्हणजे दान केलेली मालमत्ता. ती दान केलेली रक्कम आणि संपत्तीचा वापर फक्त गरीब, निराधार आणि असाहाय्य लोकांच्या मदतीसाठी व्हायला हवा. मात्र, सध्या 'वक्फ' बोर्डाचे लोक आपल्या स्वार्थापोटी त्याचे व्यवस्थापन करताना दिसतात.

आजपर्यंत 'वक्फ' बोर्डाकडून गरीब व दलित मुस्लीम जनतेला विशेष लाभ होताना दिसत नाही. त्यासाठीच केंद्र सरकारने 'वक्फ सुधारणा विधेयक' संसदेत मांडून ते संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले आहे. संयुक्त संसदीय समिती 'वक्फ सुधारणा विधेयका'विषयी नियमित बैठका घेत आहेच. स्वातंत्र्यपूर्व काळात काही लोकांच्या मनात वेगळा देश निर्माण करण्याचा विचार होता. स्वातंत्र्याच्या वेळी भारताची फाळणी झाली आणि त्यानंतर पाकिस्तानचीही निर्मिती झाली. पाकच्या निर्मितीमागे स्वतःला इतरांपेक्षा 'वेगळे' समजण्याचा आणि 'वेगळा न्याय' असल्याचा विचार कारणीभूत होता. (पान ४ वर)



# 'चीन प्लस वन' नीतीचा फायदा घेण्यासाठी चिनी थेट गुंतवणुकींना सरकारची मंजुरी

राष्ट्ररक्षा
ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३



### भारताकरिता चीन विशेष समस्या- परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर

या दृष्टीने चीन ही सामान्य समस्या असली, तरी भारताच्या दृष्टीने चीन ही विशेष समस्या आहे; त्याचे स्वरूप अधिक गंभीर आहे. सीमेवरील स्थिती आणि चीनबरोबर भारताचे संबंध कसे आहेत, त्यावरून चीनकडून येणाऱ्या गुंतवणुकीची छाननी आवश्यक आहे, असे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर म्हणाले. चीनबरोबरच्या व्यापारात तूट असल्याचे कारण आहे की, काही दशकांपूर्वी आम्ही चीनमध्ये होणाऱ्या उत्पादनाच्या स्वरूपाकडे आणि त्यामुळे चीनला मिळणाऱ्या फायद्याकडे सातत्याने दुर्लक्ष केले. चीनबद्दल चर्चा करणारे आपण जगातील एकमेव देश नाही. युरोपमध्ये प्रमुख आर्थिक किंवा राष्ट्रीय सुरक्षेच्या चर्चेत चीनचा विषय असतो. चीनची समस्या भारतापुरतीच मर्यादित नाही. अमेरिकाही चीनच्या कुरापतींनी त्रस्त आहे.

### चीनमधून येऊ शकणाऱ्या थेट गुंतवणुकीवरील निर्बंधांचा पुनर्विचार

२२ जुलै २०२४ रोजी देशाचे २०२३-२०२४ चे आर्थिक सर्वेक्षण संसदेत सादर करण्यात आले. या अहवालात चीनमधून भारतात थेट गुंतवणुकीचे समर्थन करण्यात आले. 'चीन प्लस वन' नीतीचा फायदा घेण्यासाठी चीनच्या पुरवठा साखळीत सहभागी होणे व चीनमधून भारतातील थेट प्रोत्साहन देणे हे दोन उपाय यात सुचविण्यात आले. 'भारतीय अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन हितासाठी, भारताने चीनमधून येऊ शकणाऱ्या थेट गुंतवणुकीवरील निर्बंधांचा पुनर्विचार करावा' ही सूचना होती. जून २०२० मध्ये गलवान खोऱ्यात चीनशी झालेल्या रक्तरंजित संघर्षानंतर अशी सूचना केली गेल्यामुळे अनेकांना हे चुकीचे वाटले. मात्र ही सूचना केंद्राने गंभीरपणे घेतली व मागच्या आठवड्यात भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात चिनी थेट गुंतवणुकीच्या प्रस्तावांना सरकारने मंजुरी दिली.

### चीनला तडकाफडकी डच्चू देणे आत्मघातकी

जागतिक अर्थव्यवस्थेत गेली २५ वर्षे परदेशांतील थेट गुंतवणुका व वस्तुमालाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत चीन आक्रमक आहे. 'जागतिक मूल्यवृद्धी साखळ्यां'च्या (ग्लोबल व्हॅल्यू चेन्स) केंद्रस्थानी चीन आहे. पूर्ण जगाचे चीनवरील अवलंबित्व कोरोना काळात अधोरेखित झाले. चीनच्या राजनैतिक व महत्त्वाकांक्षांमुळे जगाच्या चीनविषयक धोरणात बदल झाला. जागतिक साखळ्यांतून चीनला तडकाफडकी डच्चू देणे आत्मघातकी ठरेल, हे आता समजत आहे. म्हणून अवलंबित्व पद्धतशीरपणे कमी करण्यासाठी या राष्ट्रांनी चीनकडून वस्तुमाल आयात कमी करून, अन्य विकसनशील अर्थव्यवस्थांकडून आयात वाढवण्याचा निर्णय घेतला.

मेक्सिको, व्हिएतनाम, तैवान, दक्षिण कोरियाने आर्थिक धोरणे आखून फायदा घेतला. त्यामागील कारणांत त्यांचा चीनकडून येणाऱ्या थेट गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याचा निर्णय प्रमुख आहे. चीनला पर्याय होऊ शकणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या यादीत भारत आहे. त्यासाठी विकसित राष्ट्रांना निर्यात होऊ शकणाऱ्या वस्तुमालाच्या उद्योगात आधुनिक तंत्रज्ञान, उच्च दर्जाची उत्पादकता, कमी उत्पादन खर्च आणि चीनच्या वस्तुमालाच्या तोडीस तोड गुणवत्ता असण्याची गरज आहे. या क्षमता भारतीय कंपन्या स्वत:च्या ताकदीवर शकतात का?

### गलवान संघर्षानंतर कठोर पावले

भारतानेही मेक्सिको, व्हिएतनाम, तैवान, दक्षिण कोरियाप्रमाणे चीनविषयक आर्थिक धोरणे आखली असती. पण गलवान संघर्षानंतर चीनविषयक आर्थिक धोरणे बदलली आहेत. गलवाननंतर भारताने चीनबरोबरच्या आर्थिक व्यापारी संबंधावर अनेक बंधने आणली. भारत सरकारने थेट परकीय गुंतवणुकीबाबतच्या नियमावलीत केलेल्या बदलांनुसार भारताच्या सीमांना भिडणाऱ्या राष्ट्रांमधून येणाऱ्या गुंतवणुकीच्या प्रस्तावांना केंद्र सरकारची वेगळी मंजुरी घेणे बंधनकारक केले. याच तरतुदीनुसार चिनी थेट गुंतवणुकीचे अनेक प्रस्ताव नामंजूर करण्यात आले. भारत तेथेच थांबला नाही.

चिनी तंत्रज्ञांना व्हिसा नाकारणे; चिनी गुंतवणुकी असणाऱ्या काही कंपन्यांची बेहिशेबी पैसे परदेशी पाठवण्याबद्दल चौकशी करणे; रस्ते, रेल्वे प्रकल्पासाठी चिनी कंपन्यांना बोली लावण्यास प्रतिबंध करणे अशी कठोर पावलेदेखील उचलण्यात आली. त्यानंतर चीनमधून भारतात येणाऱ्या थेट गुंतवणुकीचा ओघ आटला. थेट गुंतवणुकीचा ओघ आटला असला, तरी भारतीय अर्थव्यवस्थेतील चीनची उपस्थिती लक्षणीय आहे. शाओमी, व्हिवो, ओप्पो, वन प्लस या ब्रॅण्डने भारतातील ८० टक्के मोबाईल हॅण्डसेटचे मार्केट चीनने काबीज केले आहे. दोन लाख कोटी रुपयांच्या भांडवल गुंतवणुका केलेल्या ४०० चिनी कंपन्या भारतात विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत.

### विकसनशील राष्ट्रांनी केलेल्या धोरण बदलांमधून धडे घेणे जरूरी

चीन-भारतातील आयात-निर्यात व्यापारातील तफावत भारताच्या दृष्टिकोनातून कायमची चिंतेची बाब आहे. २०२३-२४ वित्तवर्षात चीनकडून भारतात येणारी आयात ८ लाख ५० हजार कोटी रुपयांची होती, तर भारतातून चीनला होणाऱ्या निर्यातीचा आकडा फक्त १ लाख ५० हजार कोटी आहे. विकसित राष्ट्रांशी व्यापारात चीनची पीछेहाट होत असताना त्या अवकाशातील मोठा हिस्सा भारताने मिळविणे महत्त्वाचे आहे. तो मिळविण्यासाठी सुरू असलेल्या स्पर्धेत इतर विकसनशील राष्ट्रांनी केलेल्या धोरण बदलांमधून धडे घेणे जरूरी आहे. चिनी कंपन्या स्वत:च्या देशात वस्तुमाल बनवून भारताला निर्यात करतात; त्यावेळी जीडीपीत भर, रोजगार निर्मिती, परकीय चलन अशा अनेक मार्गांनी चिनी अर्थव्यवस्थेलाच लाभ होत असतो. त्याऐवजी भांडवल व तंत्रज्ञान घेऊन येणाऱ्या कंपन्यांना भारतीय कंपन्यांबरोबर संयुक्त कंपन्या काढून चीनकडून आयात होणारा वस्तुमाल भारतातच उत्पादन करण्यास परवानगी दिली तर भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, रोजगार निर्मिती होईल, अधिकच्या उत्पादन क्षमतांमधून निर्यात वाढवता येईल, जागतिक पुरवठा साखळ्यांत भारताचा वाटा वाढेल आणि चीनशी आयात-निर्यातीतील तफावत कमी होईल. कारण चीनकडून आयात होणारा वस्तुमाल आता काही प्रमाणात भारतातच बनवलेला असेल.

### 'चीन प्लस वन'चा फायदा भारतासमोरील आव्हाने

'चीन प्लस वन'चा फायदा घेणाऱ्या भारताच्या क्षमतेला संधी व आव्हाने दोन्हीही आहेत. प्लस वन स्थान निवडण्यामध्ये खर्चाचे मूल्यांकन, भूराजकीय स्थिरता, पायाभूत सुविधा, पुरवठा प्रतिष्ठा आणि इतर बाबी महत्त्वाच्या ठरतात 'चीन प्लस वन' रणनीतीचा फायदा घेत असताना प्लस वन देशांचे आर्थिक व राजकीय मूल्यांकन करणे आवश्यक आहे. ज्यात चलनातील चढउतार, कामगारांचे संप, भूराजकीय तणाव इत्यादींचा समावेश होतो. कोविड साथीनंतर अनेक भारतीय कंपन्यांनी पर्यायी पुरवठा साखळी शोधण्याचे धोरण स्वीकारले आहे.

भारतातील सर्वात मोठ्या एअर कंडिशनर उत्पादक व्होल्टासने चीनवरील आपले अवलंबित्व कमी करण्यासाठी भारतात मोटर्सचे उत्पादन सुरू केले आहे; हीच स्थिती फार्मा कंपन्यांची आहे. संसाधने आणि धोरणात्मक नियोजन असूनही भारताने चीनमधून स्थलांतरित होणाऱ्या व्यवसायांमध्ये हवी तेवढी सकारात्मक छाप निर्माण केली नाही. भारतातील उच्च टेरिफ दर पाश्चात्त्य गुंतवणूकदारांना परावृत्त करतात. जटिल कररचना, पायाभूत सुविधांची कमतरता, कुशल मनुष्यबळाची कमतरता, उत्पादन स्पर्धात्मकतेचा अभाव, भूसंपादन आव्हाने, उत्पादन खर्च जास्त, व्यवसाय करण्यासाठी सुलभतेचा अभाव, भ्रष्टाचार इत्यादी कारणांमुळे भारताला 'चीन वन' क्रांतीचा जास्तीत जास्त फायदा घेणे आव्हानात्मक आहे. यात योग्य बदल जरूरी आहे.

### देशाची सुरक्षा महत्त्वाची

चिनी थेट गुंतवणुकीवरील प्रतिबंधांचा पुनर्विचार करण्याची मागणी भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उद्योगांकडूनही गेले काही महिने होत होती. सेमीकंडक्टर्स, कॉम्प्रेसर्स, डिस्प्ले पॅनल्स सुट्या भागांसाठी या उद्योगातील कंपन्या चीनच्या भांडवल आणि तंत्रज्ञानावर अवलंबून आहेत. स्पर्धक विकसनशील चिनी थेट गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले म्हणून भारताने तसेच करण्याची गरज नाही. भारत आणि चीनच्या संबंधांतील इतिहास लक्षात ठेवूनच, केंद्र सरकारने चिनी थेट गुंतवणुकीच्या प्रस्तावांना सरसकट परवानगी दिलेली नाही. प्रत्येक प्रकल्प प्रस्तावाची स्वतंत्र छाननी केली जाईल; चिनी भांडवल आणि तंत्रज्ञानामुळे नक्की कशी मूल्यवृद्धी होणार आहे, हे प्रस्तावकर्त्या भारतीय कंपन्यांना समाधानकारकपणे द्यावे लागेल; भारतीय आणि चिनी कंपन्यांच्या संयुक्त कंपनीमध्ये कोणताही चिनी नागरिक उच्चपदस्थ अधिकारी पदावर नसेल; या संयुक्त कंपन्यांचे नियंत्रण भारतीय भांडवल व प्रवर्तकांच्या हातातच असले पाहिजे इत्यादी.


भारताचे चीनशी संबंध नजीकच्या भविष्यात सुधारणार नाही. चीनशी व्यापारातील तफावत दूर करणे, विकसित देशांना होणारी निर्यात वाढवणे या उद्दिष्टांत काहीही गैर नाही. सर्वात महत्त्वाचे असेल, देशाची सुरक्षा. देशाच्या सध्याच्या आणि भविष्यातील सुरक्षेशी तडजोड होऊ शकणारी कोणतीच धोरणे स्वागतार्ह नाही.

चीन सदैव भारताशी हायब्रिड युद्ध लढत असतो. म्हणून तो भारताचा 'शत्रू नंबर वन' आहे. त्याचप्रमाणे आपल्याला देशाची आर्थिक धोरणे पण बनवावी लागतील. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

# संत साहित्यातील अनुभव सिद्धांत

संत प्रबोधन
प्रा. डॉ. हरिदास आखरे

संतांनी आपले अनुभव 'सिद्धांत संत साहित्या'मध्ये विशद केले आहेत. ते त्यांचे अनुभवाचे बोल आहेत. आपल्या जीवन कालमर्यादेमध्ये त्यांनी समाज निरीक्षणातून घेतलेले अनुभवाचे हे सिद्धांत महत्त्वाचा ठेवा आहे. त्यातून त्यांनी उलगडा केला आहे. जग कितीही वाईट वागले तरी आपण आपले चांगूलपण सोडू नये, हा महत्त्वाचा सिद्धांत त्यातून प्रकर्षाने जाणवतो. 'अनुभवे आले अंगा। ते या जगा देतसे' संत तुकारामांना जीवन जगत असताना जे काही बरेवाईट अनुभव आले, ते त्यांनी प्रस्तुत अभंगातून विशद केले आहेत.



अनुभवातून व्यक्ती हुशार होतो. अगदी त्याचप्रमाणे ४०६२) आचारधर्माच्या या मूल्यांसाठी संत तुकारामांनी आईच्या वागण्याचे दिलेले उदाहरण मोठे मार्मिक आहे. जसे एखाद्या मुलाच्या आईला स्वत:ला चालता येत असूनही ती जाणीवपूर्वक मुलाच्या पावलाबरोबर छोटी छोटी पावले टाकत असते. 'तुझा तू चालायला शिक' असे म्हणून तो चालायला शिकणार नाही. 'तुझा तू लिहायला शिक' असे म्हणून तो लिहायला शिकणार नाही. म्हणून हे सगळे स्वतः करायचे, असे ते सांगतात.



जगाला सन्मार्गाकडे जाण्याचा उपदेश संत तुकारामांनी केला आहे. संत तुकारामांना ज्या सिद्धांताचा अनुभव आला तोच त्यांनी या जगाच्या हाती दिला. म्हणून त्यांचा हा उपदेश केवळ शाब्दिक नाही किंवा एखादी वस्तू तळहातावर घेऊन तिचे वजन सांगावे त्यापैकी नाही. तुकारामांनी प्रथमतः त्याचे स्वतः आचरण केले, अनुभवले. त्यानंतरच ते जगासमोर मांडले. त्यांच्या प्रत्येक शब्दाच्या पाठीमागे अनुभव आणि त्या शब्दांच्या मुळात लोककल्याणाविषयी अंतरीचा ओलावा आहे. जे शब्द अनुभवाच्या कसोटीवर उतरले आहेत आणि ज्यात शांत रस असल्याची खात्री आहे, तेच तुमच्या हाती देत आहे. संत तुकाराम म्हणतात, माझ्या बोलण्यात सिद्धांतावाचून दुसरे काहीही नाही.

**अनुभवे आले अंगा । ते या जगा देतसे ।।१।। नव्हती हाततुके बोल । मूळ ओल अंतरिची ।।२।। उतरुनि दिले कशी । शुद्धरसी सरे ते ।।३।। तुका म्हणे दुसरे नाही । ऐसी ग्वाही गुजरली ।।४।।** (तु. गा. २८३५) **'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊल'** या उक्तीनुसार जसे बोलायचे, तसे कर्म करायचे. आपले वर्तन ठेवायचे. लोकांना जसे वागायला सांगण्याचा उपदेश करायचा तसे सांगण्यापूर्वी स्वतः वागून दाखवायचे. ज्या गोष्टी इतरांनी करू नयेत, त्या गोष्टी आपण स्वत:ही करायच्या नाहीत. हे संत तुकाराम ांच्या व्यक्तित्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य त्यांनी स्वत:च्या आचरणातून लोकांसमोर ठेवले. बोलल्यासारखे वागणे ही त्यांच्या दृष्टीने संतत्वाची कसोटी होती. ही कसोटी स्वत:च्या जीवनाला लावणे कठीण असते; पण महत्त्वाचेही असते. समाजाचे हित साधण्यासाठी आपल्यावर काही जबाबदाऱ्या येतात. कोणत्याही क्षेत्रात समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींवर काही नैतिक बंधने येतात. स्वत:च्या आचरणाने लोकांना धडा घालून देणे, त्यांना वाट दाखवणे, हे त्यांचे कर्तव्य ठरते. विवेकाच्या व अनुभवाच्या बळावर संत तुकारामांनी किती मोठी उंची गाठली होती, हे त्यांच्या प्रस्तुत अभंगावरून दिसून येते. **संतांचा अनुसरण मार्ग अर्भकाचे साटी । पंते हाती धरिली पाटी ।।१।। तैसे संत जगी । क्रीया करूनी दाविती अंगी ।।ध्रु।। बालकाचे चाली । माता जाणुनि पाऊल घाली ।।३।। तुका म्हणे नाव । जनासाठी उदकी ठाव ।।४।।** (तु. गा. समाजातील भोळीभाबळी माणसेही या लहान माणसासारखी असतात. म्हणून त्यांनी तसे वागावे, अशी संतांची इच्छा असते; तसे ते स्वतः वागतात आणि लोकांपुढे आदर्श ठेवतात. सदाचार निर्माण होण्यासाठी संत तुकारामांनी आपल्या आचरणाने आपल्या लोकांना आदर्शाचा धडा घालून दिला. स्वत:च्या वाट्याला आलेली कर्जखाती त्यांनी इंद्रायणीत बुडवली. त्या कृतीतून त्यांनी भोळ्याभाबड्या समाजाला कर्जातून मुक्त केले व नंतरच सांगितले. संत तुकारामांनी गृहस्थाश्रमाला महत्त्वाचे स्थान दिले आहे. संत एकनाथांचा अनुभव आचाराविषयी संत एकनाथ महाराज म्हणतात, गृहस्थाश्रम म्हणजेच संसार कसा आदर्शमय पद्धतीने करावा, असे ते सांगतात. प्रपंचासाठी अनेक लोक धन जोडतात. परंतु त्यासाठी ते अनीतीचा, वाममार्गाचा अवलंब करतात. धनासाठी धर्म-नीतीचा वापर करून उत्तम शेती, व्यापार करावा त्याचा व्यय स्वार्थ निरपेक्ष बुद्धीने करा. दुसऱ्याची निंदा करण्याने आपले अहितच होईल. परोपकार करा, परस्त्रीला माता भगिनीसारखे माना. अंत:करणामध्ये प्राणिमात्रांविषयी दया असू द्या. गाय व पशूंचे पालन करा.

### संत ज्ञानेश्वर यांचा अनुभव भक्ती मार्ग

संत ज्ञानेश्वरांनी सांगितल्याप्रमाणे उत्तम प्रकारची कर्मे जर आपण सर्वात्मक ईश्वराला अर्पण केली तर ती त्या सर्वात्मक ईश्वराची सर्वोत्कृष्ट भक्ती होईल. कर्जखाते बुडवण्यामागचा संत तुकारामांचा विवेक, त्यांचे कृतीचे संतुलन समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्यांनी दुबळेपणातून हे कृत्य केले नसून समाजामध्ये आचारधर्म मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी केले आहे. सामाजिक मूल्यांच्या संवर्धनार्थ केले आहे. सामाजिक व्यवहारातील जातिनिरपेक्षता समाजातील या गोष्टीकडे लक्ष वेधताना संत तुकारामांनी आपल्या व्यवहाराशीच लक्ष केंद्रित करावे, अशी शिकवण देऊन जातिनिरपेक्ष सिद्धांताची मांडणी केली आहे. तो सिद्धांत म्हणजे वाण्याच्या दुकानातून गूळ विकत घेताना पैसे मोजा आणि गूळ खरेदी करा. त्यासाठी त्याची जात कोणती आहे, हे पाहण्याची गरज नाही. समाजामध्ये वागताना अशा प्रकारचे व्यवहार जातिनिरपेक्ष पद्धतीने करा, असा संदेश ते देतात. त्यांनी सांगितलेले तुळशीचे उदाहरणही लक्षवेधक आहे.



(पान ६ वर)

# जीना यहाँ, मरना यहाँ, इसके सिवा जाना कहाँ..!

## सिने -रंगीला राज कपूर

सिनेजगत
देवेंद्र प्रभुणे

१९६० च्या दशकात, भारतीय समाजात व विशेषत: भारतीय चित्रपटसृष्टीत बदलाचे वारे वाहू लागले. स्वतंत्र भारतात तरुण झालेल्या रसिकांच्या आशा-आकांक्षा, स्वप्ने व मानसिकता यांचे प्रतिबिंब चित्रपटांमध्ये दृष्टिगोचर होऊ लागले होते. प्रस्थापित महानायक व संगीतकार महारथींना काळानुरूप आपल्या प्रस्तुतीमध्ये यथोचित बदल घडवावे लागले. भव्य-दिव्य सिनेस्वप्न पाहणे व ते पडद्यावर साकारणे हा राज कपूरचा ध्यास होता. चित्रपटसृष्टीत आपला अभिनेता, दिग्दर्शक व निर्माता म्हणून उच्च स्थान प्राप्त केल्यानंतर राज कपूर यांच्या महत्त्वाकांक्षेस नवपंख प्राप्त झाले, स्वप्नांना धुमारे फुटले. कलात्मक व संवेदनशील चित्रपट निर्माता, दिग्दर्शक या भूमिकेतून नेत्रदीपक, चकचकीत चित्रपटांचा प्रथितयश आणि यशस्वी निर्माता हा प्रवास राज कपूर यांच्या चित्र-कारकीर्दीचे १९६० च्या दशकातील प्रधान वैशिष्ट्य होते. या परिवर्तनाची ठसठशीत सुरुवात झाली ती १९६४ साली प्रदर्शित झालेल्या 'संगम' चित्रपटापासून.



१९४९ साली हिंदी चित्रपटसृष्टीत मन्वंतर घडवून आणणाऱ्या 'अंदाज' चित्रपटाच्या वेळीच राज कपूरच्या डोक्यात 'संगम' सदृश चित्रपटाची कल्पना घोळत होती. पटकथा लेखक इंदर राज आनंद यांनी साने गुरुजींच्या 'तीन मुले' या कादंबरीच्या आधारे 'घरौंदा' ही दोन जीवश्चकंठश्च मित्र व त्यांची बालमैत्रीण यांच्या आयुष्यत्रिकोणावर बेतलेली पटकथा तयार केली होती. 'अंदाज' चित्रपटाची मूळ अभिनेता-अभिनेत्री ही प्रभावळ कायम ठेवून 'घरौंदा' चित्रपट हा 'आवारा'नंतर प्रस्तुत करण्याचा राज कपूरचा मानस होता. यास मोडता घातला तो नर्गिससोबतच्या संपुष्टात आलेल्या साहचर्याने..! तद्नंतर दिलीपकुमारने चित्रपटात एकाच अटीवर भूमिका साकारण्यास होकार दिला. ती अट होती, 'राज कपूर चित्रपटाचे दिग्दर्शन करणार नाही' ही! राज कपूरला ही अट मान्य होणे शक्यच नव्हते व अशा प्रकारे 'घरौंदा' चित्रपट बारगळला, पण त्याचे कथाबीज व त्यात दडलेल्या व्यावसायिक यशाच्या शक्यता राज कपूरच्या मनात ठाम रुजल्या होत्या. १९६० च्या दशकात, चित्रपटांमध्ये रंगांचे युग अवतरले. जीवनाचा मन:पूत आनंद घेणाऱ्या राज कपूरला रंग खुणवू लागले. भारतीय रसिकांना अप्राप्य अशी विदेशी स्थळांची मुशाफिरी व रंगात न्हालेल्या संगीतमय प्रणय कथेची भव्य-दिव्य प्रस्तुती 'संगम' चित्रपटाचे खास वैशिष्ट्य ठरले. चित्रपट प्रदीर्घ लांबीचा असल्यामुळे त्यात दोन मध्यंतरे होती, हे विशेष. राज कपूर, वैजयंतीमाला व राजेंद्रकुमार या मुख्य अभिनेत्यांनी आपापल्या भूमिका समरसून वठवल्या. शंकर-जयकिशन यांचे प्रत्ययकारी संगीत एकाच वेळी रसिकप्रिय व लोकप्रिय झाले. 'मै का करू राम मुझे बुड्ढा मिल गया' ही खट्याळ गीते, 'इस लिबे दिझ' हे बहुभाषिक प्रेमगीत अशी भरगच्च संगीत मेजवानी शंकर-जयकिशन यांनी प्रस्तुत केली. 'संगम'ने रंगीत चित्रपटांमधील दृश्य-प्रस्तुतीचे प्रतिमान निर्माण केले. या यशाने राज कपूरला त्याचा अतिशय महत्त्वाकांक्षी व लाडके कथाबीज 'मेरा नाम जोकर' चित्रपटाच्या पडद्यावर आणण्यास स्फुरित केले. हा प्रदीर्घ लांबीचा चित्रपट तुकड्या-तुकड्यात अतिशय प्रभावशाली होता. या चित्रपटाचा सुरुवातीचा भाग केवळ अप्रतिम होता. पण कोठेतरी काहीतरी न्यून जाणवत होते. गीतामध्ये माधुर्य नव्हते. 'मेरा नाम जोकर' व्यावसायिकदृष्ट्या अयशस्वी ठरला.

राज कपूर कर्जाच्या खाईत लोटल्या गेले. मुख्य म्हणजे, राज कपूरचा आत्मविश्वास पार डळमळला. ज्येष्ठ सुपुत्र रणधीर कपूरला अभिनेता व दिग्दर्शक म्हणून 'कल, आज और कल' (१९७१) या चित्रपटात राज कपूर यांनी मोठ्या उमेदीने व अपेक्षेने प्रस्तुत केले, पण तेथेही ते फार यशस्वी ठरले नाही. पण, जिंदादिल व आक्रमक पंजाबी मनोवृत्तीच्या राज कपूरने हार मानली नाही. आपल्या लाडक्या सुपुत्र ऋषी कपूरला नवोदित डिंपल कपाडियासोबत त्यांनी आधुनिक युगास साजेशा बंडखोर व शारीर प्रेमकथा 'बॉबी' (१९७३) या अतियशस्वी चित्रपटात प्रस्तुत केले. लक्ष्मीकांत-प्यारेलाल हे पहिल्यांदाच प्रतिष्ठित आर. के. चित्रपट निर्मिती संस्थेसाठी संगीतकार म्हणून नेमस्त झाले होते व त्यांनी 'बेशक मंदिर मस्जीद तोडो', 'अखियों को रहने दो' अशी विरह व्यथा मांडणारी पंजाबी लोकसंगीत आधारित गीते 'घे घे घे घेरे सायबा' हे गोव्याच्या लोकनृत्यावर आधारित गीत, 'मै शायर तो नही', 'हम तुम एक कमरे मे बंद हो' ही आधुनिक संगीताधारित गीते सादर केली. 'बॉबी' चित्रपटाने पुन्हा एकदा राज कपूर हे नाव चित्रपटसृष्टीत दिमाखाने तळपू लागले. 'आग' चित्रपटाची कथा कल्पना नव्या परिवेशात मांडणारा 'सत्यम शिवम सुंदरम' (१९७८) हा चित्रपट सांगीतिकदृष्ट्या अतिउत्तम होता. पण विसंगत पात्र निवडीने चित्रपटाचा पार विचका केला. झीनत अमान ही पाश्चात्त्य वळणाची अभिनेत्री ग्राम-सुंदरी म्हणून कोणत्याच अंगाने पचनी पडली नाही. पंडित नरेंद्र शर्मा या सुप्रसिद्ध हिंदी कवी व गीतकाराच्या प्रासादिक व स्तरीय गीतरचना विशेष उल्लेखनीय. मुकेश यांनी ध्वनिमुद्रित केलेले शेवटचे हिंदी चित्रपट गीत 'चंचल शीतल निर्मल कोमल' हे याच चित्रपटात होते. राज कपूर यांनी या दशकात 'धरम-करम' व १९८१ साली 'बीबी ओ बीबी' या चित्रपटाची निर्मिती केली. दोन्ही चित्रपट यथातथा होते व त्यांना मर्यादित व्यावसायिक यश मिळाले. राज कपूर यांच्या प्रतिष्ठेला साजेसा चित्रपट होता तो १९८२ सालचा 'प्रेमरोग'. ऋषी कपूर व पद्मिनी कोल्हापुरे यांचा दमदार अभिनय व त्यास शम्मी कपूर आणि नंदा यांची समर्थ साथ चित्रपटाचा दर्जा उंचावून गेले. १९८५ साली प्रदर्शित झालेला 'राम तेरी गंगा मैली' हा राज कपूर यांचा दिग्दर्शक म्हणून शेवटचा चित्रपट. राजीव कपूर व मंदाकिनी ही अभिनयशून्य मंडळी केवळ आणि केवळ राज कपूरच्या परिसस्पर्शाने उजळून निघाली. रवींद्र जैन या संगीतकाराचे आर. के. चित्रपटनिर्मिती संस्थेत पदार्पण झाले व त्यांनी चित्रपटास भारतीय धाटणीचे सुश्राव्य


(पान ६ वर)


# आसक्तीने पुनर्जन्म, आत्मज्ञानी-विरक्तीने मुक्ती!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१. ब्रूस आणि आंद्रिया यांना १० एप्रिल १९९५ ला मुलगा झाला. त्याच्या दुसऱ्या वाढदिवसानंतर १२ दिवसांनी पहाटे ३ वाजता तो मुलगा रात्री किंचाळून उठला. 'आग-आग वाचवा-वाचवा' असे ओरडू लागला. तो झोपेतून किंचाळत उठण्याच्या घटना वाढू लागल्या. डॉक्टरांनी सांगितले, त्याच्याशी प्रेमाने बोलून माहिती घ्या. जे दिसतं त्याचे चित्र काढायला सांगा. मुलाने एक विमानाने दुसऱ्या विमानावर बॉम्ब टाकतानाचे चित्र व नंतर आग लागलेल्या विमानाचे चित्र काढले. मग ब्रुसने आपल्या मुलाला विचारले, 'कोण अडकला जळत्या विमानात?' तो म्हणाला, 'मीच अडकलो.'

'तू त्या जळत्या विमानात कसा अडकला?' तो म्हणाला, 'युद्धात मी फायटर प्लेनने कामगिरीवर असताना जपानी पायलटने माझे विमान पाडले.' 'तुला कसे कळले की ते जपानचे विमान आहे.' तो म्हणाला, 'लाल सूर्य!' (म्हणजे जपानच्या ध्वजावर व विमानावर असलेले लाल वर्तुळ) मग त्याच्या वडिलांनी विचारले, 'तू कुठून प्लेन उडवीत आलास?' तो म्हणाला, 'नटोमा बोटीवरून!' वडिलांनी तपास केला तर कळले, खरोखरच दुसऱ्या विश्वमहायुद्धात USZQmomoCE-62 नावाच्या बोटीवरून टेकऑफ घेतलेल्या एका विमानाच्या पायलटचा जळून मृत्यू झाला होता. त्यांनी त्याच्या विमानाचे नाव विचारले तर तो म्हणाला, 'कोर्सेअर.' त्यांनी आणखी तपास केल्यावर त्यांना कळले की, जो पायलट त्या युद्धात मारला गेला त्याचे नाव होते 'जेम्स हुस्टन.' हुस्टनच्या पायलट मित्राला भेटल्यावर मुलगा सांगतोय ते सर्व प्रत्यक्ष घडलंय, याची त्याच्या पालकांना खात्री पटली. मग त्याच्या आईने त्या पायलटच्या ८० वर्षे वय असलेल्या बहिणीला






शोधले व त्या मुलाला तेथे नेले. त्याने लगेच धावत जाऊन 'ॲनी' म्हणून तिच्या नावाने हाक मारून तिला आनंदाने मिठी मारली. जेम्सच्या पूर्वजन्माच्या आठवणीतून व त्रासातून सुटका करण्यासाठी त्याचे पालक त्याला तो ११ वर्षांचा झाल्यावर; जेथे पूर्वजन्मात त्याचा मृत्यू झाला होता त्या जपानच्या समुद्रकिनाऱ्यावर घेऊन गेलेत व त्यांच्या संस्कृतीनुसार त्याचा पूर्वजन्माचा अंत्यविधी करून त्याला त्या जन्माला निरोप देण्याचे त्याला समजावले. तेव्हा तो पूर्ण २० मिनिटे रडला. आता तो २६ वर्षांचा तरुण आहे. पूर्वजन्माच्या स्मृती असूनही नवीन जीवनाशी त्याने जुळवून घेतले आहे. अनेक मानसशास्त्रज्ञांनी वैज्ञानिक तपासण्या करून 'ही पुनर्जन्माची केस आहे' असे निश्चित केले.

२. सुमित्रा ११ वर्षांची असतानाच तिची आई देवाघरी गेली. वडील गरीब मजूर असल्यामुळे सतत पैसे मिळविण्याच्या प्रयत्नात तिच्यापासून दूरच राहिले. घरी बोलायला कुणीच नाही. वयाच्या १३ व्या वर्षी लग्न झाले. घरी सासू-सासरे होते; पण इथेही तिचा गरीब नवरा कामामुळे तिच्यापासून दूरच राहायचा. शेवटी पाच वर्षांनी तिला मुलगा झाल्यावर ती बाळाच्या सोबतीने सुखावली. ती सतत बाळाला आपल्या जवळच ठेवायची. पाच महिन्याचा मुलगा कडेवर व डोक्यावर पाण्याची कळशी घेऊन ती घरी येत होती; आणि अचानक तिचे शरीर ताठ झाले. एक हात आकाशाकडे केला, डोळे फिरवले, दातावर दात करकर वाजवू लागली.

कवेतल्या मुलाला आवळले व ती विचित्र आवाज करू लागली. सोबतच्या स्त्रियांनी तिला आवाज दिला, पण तिने प्रतिक्रिया दिली नाही. पाच मिनिटांनी ती सामान्य झाल्यावर तिला आपल्या भोवती गर्दी दिसली. पण तिला काहीच आठवत नव्हते. ती घरी आली. नंतर अनेकदा तिला तसाच त्रास झाला. आधीपेक्षा प्रत्येकवेळी अटॅकचा अवधी वाढत गेला. १६ जुलै १९८५ रोजी तिला आलेल्या अटॅकच्या दरम्यान तीन दिवसांनी तिचे निधन होणार, अशी तिने भविष्यवाणी केली. यावेळीसुद्धा नेहमीप्रमाणे तिला काय झाले काहीच आठवत नव्हते. पूर्ण शहरात ही भविष्यवाणी कळली.

तिसऱ्या दिवशी संध्याकाळी तिला खूप ताप आला व खरोखरच तिचे निधन झाले. वैद्यांनी येऊन तिची तपासणी करून तसे निश्चित केले. तिच्या अंत्यविधीची तयारी सुरू होती. ४५ मिनिटांनी तिला ठेवले होते त्या खोलीतून दोन बायका घाबरून



सुमित्रा — शिवा/ सुमित्रा

ओरडत बाहेर आल्या. कारण मृत पावलेल्या सुमित्राने डोळे उघडले व ती उठून बसली. 'तुम्ही कोण आहात? सगळे माझ्या भोवती असे का बसले आहात' म्हणून चौकशी करू लागली. बाहेर लोकांची प्रचंड गर्दी आधीपासूनच जमलेली असताना अशी बातमी कळल्यावर गर्दी आणखी वाढली. काही क्षणातच दुःखाचे वातावरण आनंद आणि आश्चर्याने भरून गेले. वैद्यांनी पुन्हा येऊन तपासले व तिला कुठलाही रोग नसल्याचे स्पष्ट केले. सुमित्राच्या नवऱ्याला खूप आनंद झाला. तो धावत आत आला व त्याने अत्यानंदाने सुमित्राला मिठी मारायचा प्रयत्न केला. पण सुमित्राने त्याला दूर ढकलले. तिच्या देहबोलीत व भाषेत कमालीचा बदल झाला. तिने रागावून नवऱ्याला म्हटले, 'परक्या स्त्रीच्या असे जवळ जाणे योग्य नाही.' तिने तिच्या बाळाला व घरातील कुणालाच ओळखले नाही.

'गर्दी कशाला? तुम्ही कोण?' असे ती विचारू लागली. सगळ्यांना वाटले, तापाने तिच्या डोक्यावर परिणाम झाला असावा. काही दिवसांनी तिने पत्र लिहिण्यासाठी कागदपेनची मागणी केली. दर काही दिवसांनी पोस्टाच्या डब्यात टाकायला पत्र देऊ लागली. सगळ्यांना आश्चर्य वाटले. कारण सुमित्रा अशिक्षित होती, पण तिची भाषा व साडी घालण्याची पद्धत अतिशय सुशिक्षित बाईसारखी सुधारली होती. ती सगळ्यांशी एकदम परकेपणाने वागत होती. नवऱ्याला जवळ येऊ देत नव्हती. मुलाला तर तिने एकदाही जवळ घेतले नाही. तिला समजवायचा प्रयत्न करता करता तीन महिने झाले आणि एक दिवस त्यांच्या घरी सुमारे ६५ वर्षे वयाचे एक गृहस्थ आलेत. त्यांच्या हातात एक जाड अल्बम होता. त्यांनी चौकशी केली की, 'तुमच्या घरात मानसिक त्रास असलेली अशी कुणी स्त्री आहे का?' सुमित्राच्या घरच्यांनी त्यांना बैठकीत आणून बसवले. त्यांनी सांगितले की, 'मी येथून ८० किलोमीटर दूर असलेल्या दिव्यापूर गावात राहतो.


एका कॉलेजमध्ये प्रोफेसर आहे. तुमच्या पत्त्यावरून मला गेल्या तीन महिन्यांपासून सारखे पत्र येत आहेत.' विचारल्यावर त्यांनी सांगितले की, 'माझे नाव रामसिया त्रिपाठी आहे.' जसे आतल्या खोलीतून सुमित्राने हे ऐकले तशी ती धावत बाहेरच्या खोलीत आली आणि 'पप्पा' म्हणून तिने त्या गृहस्थाला मिठी मारली व जोरात रडू लागली. अचानक हे घडल्यावर सगळेच चकित झाले. घरच्यांनी तिला त्यांच्यापासून दूर केले. सुमित्रा म्हणाली, 'मी सुमित्रा नाही. पप्पा, मी तुमची मुलगी शिवा त्रिपाठी आहे. मला सुमित्रा म्हणू नका.' तिचा भावनिक आवेग पाहून राम त्रिपाठी मानसिक धक्क्याने स्तब्ध झाले. त्यांनी सांगितले, 'माझी मुलगी शिवा त्रिपाठीचा तीन महिन्यांपूर्वीच मृत्यू झाला, पण हिने मला सतत पत्रे लिहून 'पप्पा या व मला इथून घेऊन जा' असा आग्रह केला. सुरुवातीला हिचे पत्र वाचून आम्ही दुर्लक्ष केले. हिचे हस्ताक्षर माझ्या मुलीच्या हस्ताक्षराशी एकदम जुळले म्हणून प्रत्यक्ष खरे-खोटे पाहण्यासाठी मी इथे आलो.' मग त्यांनी त्यांच्याजवळचा अल्बम काढला व म्हणाले, 'माझ्या मुलीच्या लग्नाचा हा अल्बम आहे.'

मग सुमित्राला म्हणाले, 'तू जर माझी मुलगी शिवा असशील तर या अल्बममधील सर्व नातेवाईकांचे फोटो ओळखून त्यांची नावे मला सांग.' सुमित्राने अगदी पटापट सर्वांना ओळखले व विचारले, 'माझी मुले रिंकू व टिंकू कसे आहेत?' एक क्षण तिने थांबून सांगितले, 'माझ्या सासरी मी सर्वात जास्त शिकलेली असल्यामुळे ते माझा राग करीत व घरून पैसा आण म्हणून त्रास देत असत.' मात्र, एक फोटो पाहून तिच्या चेहऱ्यावर भीती, राग या दोन्ही भावना दाटल्या... 'ही नणंद असून हिनेच डोक्यावर वीट मारून माझा जीव घेतला,' असे म्हणाली.

खात्री पटताच वडिलांनी आपल्या मुलीला आवेगाने मिठी मारली व रडू लागले. नंतर त्रिपाठींनी सांगितले की, 'रेल्वेच्या रुळाजवळ तिचे शरीर ठेवून अपघाताचा देखावा करण्यात आला. घाईघाईने अन्त्यविधी आटोपल्यामुळे त्रिपाठी परिवाराला तिचे अन्त्यदर्शनसुद्धा घेता आले नव्हते. कुठलाही पुरावा मिळाला नाही म्हणून तिच्या सासरची मंडळी निर्दोष सुटली. नंतर सुमित्रा उर्फ शिवा त्रिपाठींच्या सोबत जाऊन पूर्वजन्मीच्या माहेरच्या लोकांना व मुलांना भेटली. पुढे सर्वानुमते ती सुमित्राच्या नवऱ्याचा व त्याच्या मुलाचा स्वीकार करून त्यांच्या सोबत राहिली व १९९८ साली मरण पावली. प्रचलित मान्यतेनुसार शिवाचा हा पुनर्जन्म म्हणता येणार नाही. कारण तिच्या मृत्यूच्या नंतर काही तासातच तिने सुमित्राच्या देहात प्रवेश केला. सुमित्रा म्हणून नवीन जन्म घेतला नाही. अमेरिकेतील तज्ज्ञ लोकांनी पायलट जेम्स व शिवा-सुमित्रा या दोन्ही घटनांचे रीतसर सूक्ष्म परीक्षण करून या घटना सत्य आहेत, हे मान्य केले. यातून काय शिकायचे? आपला देह म्हणजेच 'मी' असे आपण समजतो, ते खरे नाही. आपला आत्मा सदैव स्वतंत्र व पवित्रच असतो.

मात्र, जीवनात आपण आपल्या शरीराच्या व भोवतालच्या जगातील व्यक्ती, वस्तू, सत्ता, यश, कीर्ती, पैसा, सुखोपभोग यांच्या प्रेमात पडतो किंवा कुणाचा बदला घेणे, वसुली करणे अशा भावनांमध्ये गुरफटतो. मृत्यूच्या वेळी यापैकी ज्या गोष्टीच्या असक्तीमध्ये किंवा चांगल्या-वाईट भावनेमध्ये आपला जीव अडकलेला असेल ते प्राप्त करण्यासाठी मृत्यू झाल्यावर लगेच किंवा काही काळानंतर आपण पुन्हा जन्म घेतो व दुःख भोगतो. हिंदू धर्मानुसार हा कर्मविपाक-चक्राचा भाग आहे. म्हणजे एका जन्मात जे कर्म केले त्याचे फळ त्याच किंवा पुढच्या जन्मात भोगावे लागते. हे बौद्ध, शीख आणि हिंदू या भारतीय धर्मांचे केंद्रीय तत्त्व आहे. मृत्यूनंतर मुक्ती मिळाली नाही तर तो आत्मा, भूत झाला नाही तर, दुसरे शरीर धारण करतो, अशी समजूत काही काही धर्मांत आहे. मागील जन्मातील कर्मानुसार ऊर्जा शरीर धारण करते व जन्म, मृत्यू आणि पुनर्जन्म या संसारचक्रात अडकतो. मात्र आत्मज्ञानी-विरक्तीने मृत्यूपूर्वीच जो मुक्त असतो त्यालाच मुक्ती प्राप्त होते.

'संस्कारसाक्षात्करणात पूर्वजातिज्ञानम।' म्हणजे ध्यानाच्या विशिष्ट अवस्थेत योगसाधक आपल्या आधीच्या अनेक जन्मातील स्मृती जागृत करू शकतो, असे पतंजल योगसूत्रात वर्णन केले आहे. पण सामान्यांना मागच्या जन्माचे विस्मरण हे खरे तर वरदानच असते. 'पास्टलाईफ रिग्रेशन थेरपी' म्हणजे पूर्वजन्मातील स्मृती जागृत करून या जन्मातील समस्या सोडवा, असे काही थेरपिस्ट म्हणतात. पण त्याने समस्या वाढूही शकते हे आपण वरील उदाहरणात पाहिले आहे. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)



## 'विश्राम'ही आज । शांत झाला ।।

ऐसा कैसा खेळ । खेळशी विठ्ठला ।।
कोडे या जीवाला । आकळेना ।।१।।

सुखाच्या लहरी । विरूनिया जाती ।।
दुःख का संगती । सोडियेना?।।२।।


देह निरंजनी । तेवी आत्मज्योत ।।
तरी पंचत्वात । विलीन होई ।।३।।

पंचमहाभूते । वाटेकरी झाले ।।
दुःख टांगलेले । भिंतीवरी ।।४।।

हंबरडा फोडी । माय दीनवाणी ।।
काय खेळपाणी । खेळतोसी?।।५।।

व्याकूळला जीव । ऐसा कैसा राज ।।
'विश्राम'ही आज । शांत झाला ।।६।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८




## रे दांभिक पुरुषा

सोड हा दुटप्पीपणा इकडे स्त्रीत्वाचा जागर करतोस,
तिला मखरात बसवतोस, स्तवनं गातोस,
पूजा-बिजा करतोस,
अन् तिकडे तिच्याच प्रतिकृतीची विटंबना करतोस!
रे दांभिक पुरुषा,
सोड हा दुटप्पीपणा तिला सगुण रूपात साकारतोस,
सजवतोस अन् त्याच हातांनी
तिच्याच प्रतिरूपाला निर्वस्त्र करतोस!
रे दांभिक पुरुषा,
सोड हा दुटप्पीपणा तिच्या मूर्तीपुढे
भक्तिभावाने डोळे मिटतोस अन्
तिच्याच लेकींच्या सर्वांगावरून
मात्र आसक्तीने नजर फिरवतोस...
रे दांभिक पुरुषा, सोड हा दुटप्पीपणा
तिला कळतात तुझे अर्थपूर्ण कटाक्ष
अन् अजाणतेपणी झालेले भासवून
जाणतेपणाचे स्पर्श... वरून स्त्री औदार्याचा,
रक्षकाचा, कनवाळूपणाचा वर्ख
आतून मात्र वासनांचा अर्क...
खूप त्रास होतो तिला
तुझ्या अशा वागण्याचा सतत दडपणाखाली
जगण्याचा अन् बंधनात राहण्याचा
रे दांभिक पुरुषा,
सोड हा दुटप्पीपणा अन् पिता,
भाऊ, मैत्र, पती अन् गुरू रूपातलं
तुझं 'खरं रूप' दिसू दे जगाला...

डॉ. सुमेधा हर्षे

# उद्योगांची जोमदार लगबग

अर्थोद्योग
महेश देशपांडे



देशातील अनेक मोठ्या उद्योगांनी अलिकडे महत्त्वाच्या बातम्या दिल्या. अदानी समूहाने धारावीमध्ये दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असल्याचे जाहीर केले. याच सुमारास 'ॲपल' भारतात महिलांना दीड लाख रोजगार देणार असल्याची बातमी आली. दरम्यान, 'रिलायन्स जिओ' जगातील सर्वात मोठी डेटा कंपनी बनली तर 'पिकॅडेली ॲग्रो' या मद्य कंपनीने शेअरधारकांना मालामाल केल्याची माहितीही समोर आली.


सरता आठवडा विविध उद्योगसमूहांमधील जोमदार घडामोडींसाठी लक्षात राहील. देशातील अनेक मोठ्या उद्योगांनी या काळात महत्त्वाची कामगिरी बजावली. सर्वप्रथम अदानी समूहाने धारावीमध्ये दोन हजार कोटींची गुंतवणूक करणार असल्याचे जाहीर केले. याच सुमारास 'ॲपल' भारतात दीड लाख महिलांना रोजगार देणार असल्याची बातमी पुढे आली. दरम्यान, 'रिलायन्स जिओ' जगातील सर्वात मोठी डेटा कंपनी बनली असून 'पिकॅडेली ॲग्रो' या मद्य कंपनीने शेअरधारकांना मालामाल केल्याची रंजक माहितीही समोर आली.

अदानी समूहाने धारावी पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी) मध्ये दोन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. मुंबईतील ६४० एकरांवर पसरलेल्या आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीच्या पुनर्विकासासाठी अदानी समूह आणि महाराष्ट्र सरकार एकत्र काम करत आहेत. एका अहवालानुसार, या संयुक्त उपक्रमाचे नेतृत्व अदानी समूह करत आहे. हा समूह धारावीमध्ये निवासी आणि व्यावसायिक युनिट्स बांधणार आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे सीईओ एसव्हीआर श्रीनिवास सांगतात की, हा माझ्या कारकीर्दीतील हा सर्वात आव्हानात्मक प्रकल्प आहे. आव्हाने असूनही पुढील दोन ते अडीच वर्षांमध्ये पात्र कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पासाठी दिलेल्या २७ एकर जमिनीसाठी अदानी समूहाने भारतीय रेल्वेला यापूर्वीच एक हजार कोटी रुपये दिले आहेत. धारावीमधील सदनिकांच्या मोजणी आणि तपशीलवार सर्वेक्षणासाठी अतिरिक्त निधी वापरला जात आहे. पुढील एक-दोन महिन्यांमध्ये येथे बांधकाम सुरू होण्याची शक्यता आहे. पुढील चार ते सहा महिन्यांमध्ये रेल्वेच्या जमिनीवर पुनर्वसन इमारतींचे बांधकाम सुरू करण्याचे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. १५ ते २० हजार घरे बांधण्याची योजना आहे. या प्रकल्पात १०० हून अधिक कर्मचारी विविध भूमिकांमध्ये कार्यरत आहेत. यात अनेक आव्हाने आहेत. यात लोकसंख्येची उच्च घनता, विमान उड्डाण ऑपरेशन्समुळे निर्बंध, कोस्टल रेग्युलेशन झोनचे नियम, निवासी आणि व्यावसायिक मालमत्तांचे एकत्रीकरण आणि मिठी नदीचे सान्निध्य यांचा समावेश आहे. अनेक सरकारी संस्थांनी जमीन देण्यास नकार दिल्याने येथे प्रकल्पासाठी अतिरिक्त जमीन संपादन करणेही अवघड झाले आहे. धारावीमध्ये ३५० चौरस फुटांची मोफत घरे उपलब्ध होणार आहेत. ज्यांनी १ जानेवारी २००० किंवा त्यापूर्वी भाड्याच्या निवासस्थानावर कब्जा केला होता आणि सध्या तळमजल्यावर राहतात, त्यांना धारावीमध्ये ३५० चौरस फुटांचे विनामूल्य अपार्टमेंट मिळेल. १ जानेवारी २००० ते १ जानेवारी २०११ दरम्यान येथे राहणाऱ्या रहिवाशांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मुंबईत २.५ लाख रुपये भरून घरांचे वाटप केले जाईल. दरम्यान, 'आयफोन' बनवणारी ॲपल पुढील वर्षी मार्चपर्यंत भारतात दोन लाख थेट नोकऱ्या देणार आहे. यातील ७० टक्के नोकऱ्या महिलांसाठी असतील. 'ॲपल' आणि



त्यांच्या भारतातील पुरवठादारांनी ही आकडेवारी केंद्र सरकारला दिली आहे. 'ॲपल'ला उत्पादनाच्या बाबतीत चीनवरील अवलंबित्व कमी करून भारतावर लक्ष केंद्रित करायचे आहे. 'ॲपल'चे कंत्राटी उत्पादक फॉक्सकॉन, विस्ट्रॉन आणि पेगॉट्रॉन यांनी भारतात ८०,८७२ लोकांना थेट नोकऱ्या दिल्या आहेत. याव्यतिरिक्त टाटा ग्रुप, सालकॉम्प, मदरसन, फॉक्सलिंक (तामिळनाडू), सुनवोडा (उत्तरप्रदेश), एटीएल (हरयाणा) आणि जबिल (महाराष्ट्र) या पुरवठादारांनी मिळून सुमारे ८४ हजार थेट नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. २०२० पासून विक्रेते आणि पुरवठादारांनी १.६५ लाख नोकऱ्या दिल्या आहेत. २०२० मध्ये स्मार्टफोन पीएलआयपासून 'ॲपल'च्या विक्रेतेपुरवठादारांनी भारतात १.६५ लाख थेट नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. 'ॲपल' भारतात सतत उत्पादन क्षमता वाढवत आहे. सरकारचा अंदाज आहे की, इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात प्रत्येक थेट नोकरीसाठी तीन अतिरिक्त नोकऱ्या निर्माण होतात. याचा अर्थ 'ॲपल' इको सिस्टिममध्ये मार्चअखेर पाच ते सहा लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकतात. २०१७ पासून भारतात 'आयफोन' बनवले जात आहेत. 'ॲपल'ने २०१७ मध्ये 'आयफोन एसई' या मॉडेलची निर्मिती भारतात सुरू केली. आयफोन एसईनंतर आयफोन ११, आयफोन १२ आणि आयफोन १३ देखील भारतात तयार करण्यात आले. फॉक्सकॉनचा प्लांट चेन्नईजवळील श्रीपेरंबदुर येथे आहे.

जगातील एकूण मोबाईल डेटा ट्रॅफिकपैकी आठ टक्के तिच्या नेटवर्कवर होत आहे. हा आकडा विकसित बाजारपेठांसह सर्व प्रमुख जागतिक ऑपरेटरपेक्षा जास्त आहे. कंपनीचा ग्राहकवर्ग आणि डेटा वापर सातत्याने वाढत आहे. रिलायन्सने १.७ लाख नवीन नोकऱ्या दिल्यानंतर एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ६.५ लाखांवर पोहोचली. 'रिलायन्स जिओ' लाँच होऊन फक्त आठ वर्षे झाली. या काळात जगातील सर्वात मोठी मोबाईल डेटा कंपनी बनण्याचा पराक्रम रिलायन्सने केला आहे. डिजिटल होम सेवेच्या बाबतीत, जिओ ही जगातील सर्वात मोठ्या कंपन्यांमध्ये आहे. 'जिओ' तीन कोटींहून अधिक घरांना डिजिटल सेवा पुरवते. दर ३० दिवसांमध्ये १० लाख घरांपर्यंत पोहोचण्याचे 'जिओ फायबर'चे उद्दिष्ट आहे. जिओ वापरकर्त्यांना लवकरच १०० जीबी स्टोरेज मोफत मिळणार आहे. जिओ एआय क्लाऊड येत्या दिवाळीच्या सुमारास लाँच होणार असून वापरकर्त्यांना १०० जीबी स्टोरेज मोफत मिळणार आहे. आता एक रंजक बातमी. 'इंद्री' ही जगातील सर्वोत्तम व्हिस्की तयार करणाऱ्या पिकॅडेली ॲग्रो कंपनीच्या शेअरमध्ये तुफान तेजीचे सत्र आहे. पिकॅडेली ॲग्रोचा शेअर मल्टिबॅगर ठरला आहे. या शेअरमध्ये शुक्रवारी पाच टक्क्यांची तेजी दिसून आली. मुंबई स्टॉक एक्सचेंजवर हा शेअर ८००.९५ रुपयांवर पोहोचला. त्यामुळे मद्यप्रेमींसोबतच गुंतवणूकदार मालामाल झाले. ही कंपनी लवकरच दोन नवीन व्हिस्की ब्रँड्स बाजारात आणणार आहे. कंपनीच्या दोन मेन व्हिस्की ब्रँड्सना सेंट्रल ऑर्म्ड पुलिस फोर्सेज कँटिनमध्ये पुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. पिकॅडेली ॲग्रोच्या शेअरमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये १० हजार टक्क्यांपेक्षा अधिक उसळी आली. या कंपनीच्या शेअरचा ५२ आठवड्यातील उच्चांक ९१०.७० रुपये आहे तर पिकॅडेली ॲग्रोच्या शेअरचा ५२ आठवड्यातील नीचांक ९५ रुपये आहे. एकाच वर्षात कंपनीने




गुंतवणूकदारांना ५९३.१० टक्क्यांपेक्षा अधिकची कमाई करून दिली आहे. दारू तयार करणाऱ्या पिकॅडेली ॲग्रोमध्ये ९५ रुपये प्रतिशेअर या दराने एक लाख रुपयांचे शेअर खरेदी करणाऱ्यांना ५९३ टक्क्यांचा फायदा झाला. एक वर्षापूर्वी कंपनीचा शेअर ९५ रुपये होता. आता हा शेअर ८०० रुपयांवर पोहोचला आहे. याशिवाय कंपनीत सहा महिन्यांपूर्वी गुंतवणूक करणाऱ्यांना दुप्पट फायदा झाला. गेल्या सहा महिन्यांमध्ये पिकॅडेली ॲग्रोच्या शेअरमध्ये ११५ टक्क्यांहून अधिकचा फायदा झाला आहे. पिकॅडेली ॲग्रोचा शेअर ५ वर्षांमध्ये १० हजार ४०० टक्क्यांहून अधिक उसळला आहे. या कंपनीचा शेअर ३० ऑगस्ट २०१९ रोजी ७.३४ रुपयांवर होता. हा शेअर २९ ऑगस्ट २०२४ रोजी मुंबई स्टॉक एक्सचेंजवर ७८८.४५ रुपयांवर पोहोचला. चार वर्षांमध्ये कंपनीच्या शेअरमध्ये ८३०० टक्क्यांहून अधिकची तेजी आली. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

स्वत:लाच
स्वत:च्या न्यायालयात उभे करून
स्वत:च्या जीवनाकडे त्रयस्थपणे पहात स्वत:चा शोध घेणे आणि तो तितक्याच प्रभावीपणे शब्दबद्ध करणे हे कसब मराठीमध्ये लीलया पेरणारे लेखक म्हणजेच विश्राम बेडेकर हे होय. १३ ऑगस्ट १९०६ मध्ये अमरावती या गावाचा जन्म झालेले विश्राम बेडेकर आपल्या 'रणांगण' व 'टिळक आणि आगरकर' यासारख्या साहित्यकृतीसह पटकथाकार, दिग्दर्शक म्हणून सर्व परिचित होते. एक झाड आणि दोन पक्षी हे त्यांचे आत्मचरित्र म्हणजे माणसाच्या एका मनाने जीवनाचा अनुभव घेणे आणि दुसर्या मनाने त्या अनुभवाचे विश्लेषण चिंतन करणे असा प्रकार आहे. जीवन वृक्षाला झाड म्हणून दोन मनाच्या संकल्पनेला दोन पक्षी म्हणून संबोधने हा विश्राम बेडेकरांचा प्रयोग त्या काळात कमालीचा यशस्वी ठरला. १९८४ मध्ये प्रकाशित झालेल्या या आत्मचरित्राला १९८५ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे.


# 'एक झाड आणि दोन पक्षी' मधील आत्मविभोर शैक्षणिक संदर्भ

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

'एक झाड आणि दोन पक्षी' या आत्मचरित्रात विश्राम बेडेकर यांचे १९०६ च्या ऑगस्ट महिन्यापासून सुरू झालेले चिंतन असल्यामुळे यात त्यांच्या शैक्षणिक कालखंडाचे वर्णन आलेले आहे. त्याशिवाय १९०६ म्हणजे सव्वाशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील शैक्षणिक परिस्थिती कशी होती? हेही या कादंबरीच्या अनुषंगाने लक्षात येते.

१९२० मध्ये हिंदू हायस्कूलमध्ये विश्वनाथ (पुढे हे नाव बदलून त्यांनी विश्राम असे केले) बेडेकर आणि त्यांचा मित्र श्रीराम यांच्या शालेय मैत्रीच्या अनुभवातून येणाऱ्या प्रसंगाचे वर्णन केले आहे. श्रीराम पहिला येणे आणि आपण दुसरा येणे याबाबत वर्णन करत असताना लेखक म्हणतात, कदाचित श्रीराम मागे पडला असता तर न जाणो आपल्या मैत्रीला मत्सराची कीड लागली असती. यावरून शैक्षणिक वातावरणात निकोप मैत्री जोपत असताना त्या मैत्रीतही एक व्यक्त अव्यक्त चुरस सुरू असते असे लेखक सुचवतात. वर्गात एका बाकावर बसले, शक्यतो एकाच पुस्तकाचा वापर करणे अशा काही सुखद शालेय आठवणी सोबतच विश्वनाथ आणि श्रीराम या दोन नावांच्या संयोगातून विश्राम असे नाव वापरणे यातून शालेय जीवनातील मैत्रीला किती मोठा अर्थ असतो, हे लक्षात घ्यावे लागते. विश्राम बेडेकर ह्यांची शालेय जीवनात असताना आर्थिक परिस्थिती बेताची होती. त्या काळात क्रिकेट खेळण्याची आवड असल्याने ए. व्ही. स्कूलच्या शाळेत जुन्या सामानाचा लिलाव होणे आणि लेखकाने त्यातून बॅट विकत घेणे असे वर्णन आलेले आहे. लेखकाचा मामा शिक्षक असल्याने मामाकडून भाषण लिहून मिळाल्यामुळे वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक आला. मात्र, त्याचे खरे श्रेय कुणाला आहे? याचा विसर पडला. त्याशिवाय महाराष्ट्रातील नामांकित वक्ते म्हणजे शिक्षक किंवा प्रोफेसर आहे तर त्यांना बोलण्याची संधी मिळत नाही तरी ते सभा जिंकून घेतात ते होत. असे स्पष्ट मत लेखक आपल्या लिखाणात व्यक्त करतात. या वक्तृत्व स्पर्धेत विश्राम बेडेकर आणि त्यांचा मित्र श्रीराम प्रतिस्पर्धी असतांना श्रीराम पुढे आपण कमी पडू म्हणून स्पर्धेत उभे राहण्याची लेखकाची वृत्ती स्पर्धेला घाबरणाऱ्या विद्यार्थ्यांची मनोवृत्ती अधोरेखित करणारी आहे. विद्यार्थ्याला फी माफीची नादारी दिली आणि त्या विद्यार्थ्याला विद्यार्थी सुलभ धिंगामस्ती केली तर त्या विद्यार्थ्याला नादारीची जाणीव करून दिली जाई. त्यामुळे त्या विद्यार्थ्याला कमीपणा वाटत असेल या बाबीचे वर्णनही लेखकाने केले आहे. गरिबीमुळे विश्राम बेडेकर वऱ्हाडात राहिले तर श्रीमंत असलेला श्रीराम पुढील शिक्षणासाठी कॉलेजात गेला. मात्र, सुट्टीच्या दिवसात हे मित्र एकमेकांना आवर्जून भेटत असत. पुण्या- मुंबईच्या मुला- मुलींची कॉलेजमधील प्रेम




प्रकरणे त्या काळात विशेष गाजत हे सुद्धा आवर्जून सांगितले आहे. इंटरसायंसच्या पहिल्या दुसऱ्या वर्षात असताना लेखकाने ब्रह्मकुमारी हे नाटक लिहिलेले. त्याच काळात त्यांचे लग्न झाले आणि त्यांचा मित्र श्रीराम आणखी पुढच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेला. या सर्व बाबीतून त्या काळात विद्यार्थ्यांचे शिक्षणाची स्वप्न आणि श्रीमंत विद्यार्थ्यांचे शिक्षणाची स्वप्न यातील तफावत दिसून येते. भारतीय शिक्षण प्रणाली सातत्याने आर्थिक परिस्थिती गरीब विद्यार्थ्यांना लायकी आणि सिद्धता असूनही शिक्षणापासून वंचित ठेवते हे अगदी अर्जुन आणि कर्ण किंवा एकलव्य यांच्या उदाहरणापासून एक झाड आणि दोन पक्षीमधील दोन मित्रांच्या शिक्षणात आणि जीवनात होणाऱ्या घडामोडीमुळे गडदपणे दिसून येते. लेखकाची वाचनाची आवड बघून पुस्तके पुरवले मात्र तो आपल्या स्वाभिमानावरचा हल्ला समजून लेखकाने ती नाकारली. मात्र पुन्हा मित्राच्या सांगण्यावरून स्वीकारली. या सर्व गोष्टींची आठवण झाली. ब्रह्मकुमारी नाटकाचे पुस्तक जेव्हा आले तेव्हा त्यांनी ते नाटक मैत्रीच्या काही मधुर स्मृतीला अर्पण केलेले दिसून येते. गावातील ग्रंथालयाची हालाखीची परिस्थिती आणि मुलांनी नाराज बनवलं त्या वाचनालयात जाणे या घटनेतून आपल्या देशात ग्रंथालयाची परिस्थिती शंभर वर्षांपूर्वीही आजच्या इतकीच बिकट होते. मात्र बोटावर मोजण्या इतक्या का होईना पण वाचक प्रेमी मंडळींमुळे ती ग्रंथालय तेव्हाही सुरू होती आणि आजही सुरू आहे असे म्हणावे लागते. त्या काळात आगरकर, हरिभाऊ आपटे अशा लेखकाचे पुस्तके लेखक वाचत असत. लेखकाच्या वडिलांनी त्यांच्या परीक्षेच्या अगदी वेळेवर 'मंदिरात रामाचा नैवेद्य द्यावा लागतो आणि तुझ्या आईच्याने आता होत नाही त्यामुळे तू लग्न कर' असे सांगितले. मुलाची परीक्षा आणि तीन तारखेनंतर लग्नाचा मुहूर्त नसणे या कारणावरून त्यांनी मुलाचे लग्न करून दिले. लेखकाची आई मात्र या मुद्द्यावरून तुम्ही माझ्या मुलाचा सत्यानाश केला असे सांगून भांडली. मात्र, या सर्व गडबडीत लेखक प्रथमच नापास झाले. यावरून शिक्षणापेक्षा देवधर्म आणि मुहूर्त या गोष्टींना त्या काळातील लोक प्राधान्य देत आणि त्यामुळे सुद्धा अनेकांचे शिक्षण तुटत असे, हे लक्षात घ्यावे लागेल. कॉलेजच्या मासिकाच्या संपादनात उर्दूसाठी इतके पाने मराठीसाठी इतकी पाने वगैरे चर्चेतून त्याही काळात बौद्धिक पातळीवरही धर्मातील हेवेदावे अस्तित्वात होते असे दिसून येते. तसेच एका प्रसंगी त्यांनी लेखकाला अगदी स्पष्ट शब्दात, आम्ही इथे या देशात तुमच्यावर राज्य करण्यासाठी आलेले आहोत, असे सांगितले. यावरून इंग्रज अधिकारी विद्यार्थ्यांनाही त्रास द्यायचे असे दिसून येते. त्याचप्रमाणे इंग्रज या देशात आल्यावर आपल्यासाठी शिक्षणाची सुविधा घेऊन आले होते हा भ्रमही या ठिकाणी दूर होतो. त्यांनी शिक्षण दिले ते फक्त त्यांची व्यवस्था चालवण्यासाठी असे या ठिकाणी म्हणावसे वाटते. अपघाताने मास्टर मोशाय यांच्याकडे शिक्षक म्हणून कार्य करायला सुरुवात झाल्यावर शिक्षणाचा वेगळा पैलू या ग्रंथात आपल्याला वाचायला मिळतो. बारा महिने अभ्यास करायचा आणि तीन तास पेपर सोडवून त्याची सिद्धता सिद्ध करायचे ही अतिशय चुकीची पद्धत असल्याची जाणीव आपल्याला या ठिकाणी काही प्रसंगातून लेखकाने करून दिली आहे. पुढे नाटकात आणि सिनेमात काम करत असताना त्या सिनेसृष्टीतील काही अनुभव आणि अनौपचारिक शिक्षण या बाबी लेखकाने मांडल्या आहेत. कृष्णाबाई खरे इंग्लंडहून परत आल्यावर हरी मोटे यांच्या सोबत लग्न करणार असे ठरवतात. मात्र, हरीचे शिक्षण कृष्ण बाईच्या मानाने कमी होते. तेव्हा त्यांना मनात सुद्धा आपली लाज वाटू नये असे कर्तृत्व केले पाहिजे असे त्यांच्या मनात ठरलेले होते. यावरून शिक्षणाने नाही जमले तर किमान कर्तृत्वाने का होईना पण आपण पत्नी पेक्षा वरचढ ठरलो पाहिजे ही भावना सुशिक्षित मंडळीही पुरुषप्रधान संस्कृतीचे दर्शन घडवणारी होय. सुशिक्षित समजूतदार माणसाच्या मनात सुद्धा स्त्री ही केवळ आपले मालमत्ता आहे या भावनेची मुळे खोलवर रुसलेली असतात तसेच पुरुष शहाणा आणि सुसंस्कृत झाला तरी मुळात रानटी नरवृतीचा असतो हेच खरे. अशा शब्दातही लेखकाने शिक्षणामुळे माणसाची पुरुष प्रधानवृत्ती आणि प्रवृत्ती बदलत नाही हे उलगडून सांगितले आहे. दीनानाथरावांनी नाट्य क्षेत्रात असताना रडण्याचे कसब तर शिकवले शिवाय कुणाच्याही अश्रूंना न हसण्याची शिकवणी सुद्धा दिली. दामोदर नावाचा मुलगा लेखकाकडे सिनेमाची कथा लिहायला शिकता येईल या आशेने नोकरी सोडून छोट्या पगारावर (पान ६ वर)

पान १ वरून

## मोदींचा लक्षवेधी अमेरिका दौरा

अमेरिकेतल्या निवडणुकांत ट्रम्प आणि कमला हॅरिस यांच्यातील चुरस तीव्र असून, या लढतीत पराभूत उमेदवार आपला पराभव मान्य करणार का, हा प्रश्न आहे. अमेरिकेतल्या निवडणुकांमध्ये तेथील भारतीय कोणाला मतदान करणार, त्यांच्या मतदानामुळे निकालात किती फरक पडणार आणि मुख्य म्हणजे नरेंद्र मोदी भारतीयांशी संवाद साधताना तटस्थ राहाणार का, याबद्दल उत्सुकता आहे. नरेंद्र मोदी अमेरिरकेच्या अंतर्गत राजकारणात ढवळाढवळ करणार नसले तरी, तिथे बांगलादेशमधील हिंदूंचा मुद्दा उपस्थित करुन सूचक इशारा देऊ शकतात. जगात ठिकठिकाणी चाललेल्या घटनांचा मागोवा घेतला की, मोदींच्या अमेरिका दौऱ्यात होणाऱ्या गोष्टींची कल्पना येते.

## राहुल गांधींची असत्याची फॅक्टरी!

इतकेच नव्हे, तर मोदी यांच्याकडे जग एक जागतिक नेता म्हणून आशेने बघते. रशिया-युक्रेन युद्धात मध्यस्थी करण्याची विनंती या राष्ट्रांच्या प्रमुखांनी मोदी यांना केली आहे, यावरून मोदी यांचे जागतिक व्यासपीठावरील स्थान काय आहे, ते कोणालाही कळून येईल. अशा या मोदींवर राहुल गांधी वाटेल तशी टीका कशी करू शकतात आणि केली, तरी त्यांना तिथे कोणी अडवीत कसे नाही, ही आश्चर्याची बाब आहे. पुरस्कार किंवा दान हे सत्पात्री द्यावे, हे वैश्विक सत्य. लायकी नसलेल्यांना सन्मान किंवा पुरस्कार दिल्यास त्या पुरस्काराची आणि तो बहाल करणार्याची विश्वासार्हता आणि प्रतिष्ठा घटते, हेही त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. नोबेल पुरस्कारांनी गेल्या काही वर्षांत ही गोष्ट सिद्ध केली आहे. राहुल गांधी यांच्यासारख्या उच्छृंखल व्यक्तीला भाषणासाठी आमंत्रित करणार्या संस्था आणि विद्यापीठांच्या चालकांचे बुध्यांक तपासून पाहाण्याची गरज आहे. या संस्थांनी राहुल गांधी यांचा पूर्वेतिहास तपासून पाहिला होता का, असा प्रश्न पडतो. तसे असूनही राहुल गांधी यांना या कथित नामवंत विद्यापीठांकडून आमंत्रणे मिळत असतील, तर त्यामागे त्यांचा भारतविरोधी छुपा अजेंडा आहे, असे म्हणावे लागते. याचे कारण राहुल गांधी आपल्या भाषणात केवळ मोदींवर टीका करीत नाहीत, तर ते भारताची बदनामी करीत आहेत.

राहुल गांधी हे विरोधी नेते आहेत, ते भारतात. परदेशात ते एक भारतीय आहेत, ही गोष्ट ते विसरतात. दिवंगत पंतप्रधान नरसिंह राव यांनी काश्मीरसंबंधी भारताची भूमिका जगाला ठासून समजविण्यासाठी संयुक्त राष्ट्रांमध्ये भारताच्यावतीने तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांना पाठविले होते, हे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. काश्मीरबाबत काँग्रेस आणि भाजप यांच्या दृष्टिकोनात फरक असला, तरी वाजपेयी यांनी तेथे एक राष्ट्रप्रेमी भारतीय म्हणूनच आपल्यावरील जबाबदारी पार पाडली होती. अर्थात या दोन दूरदृष्टीच्या नेत्यांची तुलनाही राहुल गांधींशी होऊ शकत नाही. यावरून विरोधी पक्षनेत्याने परदेशात कसे आणि काय बोलले पाहिजे, ते लक्षात येईल. पण, ते राहुल गांधी यांना सांगून काय उपयोग!

## पसमांदा मुस्लिमांना हक्क देणार नवा 'वक्फ' कायदा

भारतात सध्यादेखील जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, अलीगढ विद्यापीठ, मदरसा बोर्ड, वक्फ बोर्ड ही त्याची उदाहरणे. यामध्ये आपल्याला एकाच समाजाचे वर्चस्व दिसून येते. धक्कादायक म्हणजे, आरक्षणासारखा भारतीय राज्यघटनेने देशवासीयांना दिलेला हक्क नाकारण्याचाही प्रकार घडताना दिसतो. वक्फ बोर्डदेखील असाच प्रकार असून, यामध्ये मुस्लिमांतील मागास अर्थात पसमांदा मुस्लिमांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय होत आला आहे. वक्फ बोर्ड माफियांनी ताब्यात घेतल्याचे केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटले आहे. गरीब आणि असाहाय्यांना मदत व्हावी, म्हणून सरकारने वक्फला अधिकारही दिला. मात्र, त्या अधिकाराचा दुरुपयोग झाला. भारतातील बहुतेक मुस्लीम नेते अश्रफ आहेत आणि त्यांनी मुस्लिमांच्या संस्थांवर आपला एकाधिकार प्रस्थापित केला. त्यामुळेच वक्फच्या गैरकारभाराविषयीदेखील एकाही मुस्लीम नेत्याने आतापर्यंत 'ब्र' देखील काढलेला नाही. वक्फने अनेक ठिकाणी हिंदूंच्या संपत्तीचा ताबा घेतल्याचे समोर आले आहेच. मात्र, मुस्लीम समाजाच्या संपत्तीवरही वक्फ बोर्ड दावा करत आहे. ही संपत्ती प्रामुख्याने पसमांदा मुस्लिमांची असल्याचे सांगण्यात येते. आतापर्यंत मुस्लीम समाजातून वक्फच्या विरोधाचा आवाज उठताना दिसत नाही, यामागे अनेक कारणे आहेत. मुस्लीम लोक त्यांच्या नेत्यांचे ऐकतात. त्यांची दिशाभूल केली जाते आणि अश्रफ समुदायातील नेते अतिशय चातुर्याने वक्फ बोर्डावर कब्जा करून आपला स्वार्थ साधत राहातात, असा आरोप आता होऊ लागला आहे. पसमांदा समाजातील मुस्लिमांना वक्फमधून जे लाभ मिळायला हवे, ते त्यांना देऊ केलेले नाहीत. 'वक्फ सुधारणा विधेयक' आल्यानंतर आता एकाएकी सत्ता आणि अधिकार असलेला अश्रफ मुस्लिमांचा वर्ग समान अधिकाराची भाषा बोलू लागला आहे. महिला आणि पसमांदा समुदायास आम्ही वक्फ बोर्डामध्ये येण्यापासून कधीही अडवले नव्हते, असेही सांगण्यात येत आहे. मात्र, नव्या कायद्याच्या भीतीने अश्रफ वर्ग ही भाषा बोलू लागला आहे. आता मात्र मुस्लीम समाजातील मागास जाती आणि समुदाय आपल्या हक्काची भाषा बोलू लागला आहे. 'वक्फ सुधारणा विधेयका'मध्ये पसमांदा मुस्लिमांसह अन्य संख्येने अगदी कमी असलेल्या जातीदेखील प्रतिनिधित्वाची भाषा बोलू लागल्या आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने मुस्लिमांमध्ये आपल्या हक्कांविषयी जाणीव निर्माण होऊन जागृती होत असल्याचे दिसून येत आहे. 'वक्फ सुधारणा विधेयका'वर चर्चा करण्यासाठी संयुक्त संसदीय समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत 'भारतीय पुरातत्व खात्या'ने वक्फ ताबा सांगितलेल्या संपत्तीची यादीच सादर केल्याचे समजते. त्यामुळे 'एएसआय'ने जुन्या वक्फ कायद्याविषयीच्या त्यांच्या अडचणी समितीसमोर मांडल्या. 'एएसआय'नुसार, यापूर्वी भारत सरकारने संरक्षित केलेल्या अनेक मालमत्तांवर कोणत्याही पुराव्याशिवाय वक्फने दावा केला आहे. 'वक्फ कायदा, १९९५' वक्फ बोर्डाला धर्मादाय नावावर असलेली कोणतीही मालमत्ता किंवा इमारत वक्फ मालमत्ता म्हणून घोषित करण्याचा अधिकार देतो. या अधिकाराचा वापर करून वक्फ बोर्डाने संरक्षित स्मारकांना 'वक्फ मालमत्ता' म्हणून घोषित करणाऱ्या अधिसूचना जारी केल्या आहेत, ज्यामुळे 'प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष कायदा, १९५८' अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा परस्परांशी संघर्ष होत असल्याचे 'एएसआय'ने म्हटले आहे. वक्फ अधिकाऱ्यांनी संरक्षित स्मारकांच्या मूळ संरचनेत बदल केल्याची अनेक उदाहरणे आहेत, ज्यामुळे संरचनेच्या मूळ ओळखीवर परिणाम झाला आहे. राष्ट्रीय महत्त्वाच्या स्मारकांवर 'एएसआय' वक्फ बोर्ड दोघांचेही दावे असतात. त्यामुळे प्रशासनात अडचणी निर्माण होतात. वक्फ सदस्य कधीकधी एकतर्फी निर्णय घेतात, जे पूर्णपणे धोरणांच्या विरोधात असतात. परिणामी 'एएसआय'ला काम करणे शक्य होत नसल्याचा दावा 'एएसआय'ने केला आहे. त्याचप्रमाणे अनेकदा वक्फ सदस्य 'एएसआय' कर्मचार्यांना संरक्षित स्मारकांमध्ये जाऊ देत नाहीत. त्यामुळे स्मारकाच्या व्यवस्थापनात अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत, असेही 'एएसआय'ने संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत सांगितले आहे.

कथा

## साखरसाय

ज्योती पुजारी

संकरची सहावी शिट्टी झाली तसा दिवाकररावांनी हळूहळू किचनमध्ये येत कुकर खालचा गॅस बंद केला. नलिनीबाई हातात पोथी घेऊन देवासमोर खुर्चीत बसल्या होत्या. ''किती शिट्ट्या झाल्या त्या, लक्ष नव्हतं तुमचं... हल्ली सुचत नाही तुम्हाला. मी म्हणालो दुर्गाबाईंना सगळा स्वयंपाक करायला सांगा तर तुम्हाला पटतही नाही.''

दिवाकररावांची बडबड चालू होती. नलिनीबाई गहन विचारात दडल्या होत्या. काही उत्तर न देता फक्त मान हलवली त्यांनी. ''काय झालं, मी काय बोलतोय याकडेही लक्ष नाही तुमचं. बरं वाटत नाही का? आज सकाळच्या थालिपिठांना नेहमीसारखी चव नव्हती. कालच ताजं लोणी केलंत, पण तेही द्यायला विसरलात. बरं वाटत नाही का, बोला तरी घडाघडा...'' दिवाकररावांचा काळजीयुक्त बडा स्वर ऐकून नलिनीबाईंनी डोळ्याला पदरच लावला; त्या रडू लागल्या तशी आपल्या आवाजाची पट्टी अगदीच खालच्या लेव्हलला नेट दिवाकरराव पुन्हा म्हणाले, ''काही होतंय का, सांगा तरी.. आज बोलतसुद्धा नाही आहात तुम्ही नेहमीप्रमाणे. नक्कीच काहीतरी दुखतंय तुमचं. मी जातो आणि डॉ. तांबोळींना घेऊनच येतो.'' ''नको हो, बरं आहे मला. काही होत नाहीये, खरंच...'' दिवाकररावांनी त्याच्या हातातली पोथी घेऊन देवघर खालच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवली. त्यांना हाताला धरून बळेच हॉलमध्ये नेत दिवाणावर बसवलं. त्यांच्या हातात पाण्याचं भांडं दिलं. ''चहा ठेवतो घोटभर, बरं वाटेल.'' ''नाही हो, नको खरंच. बसा बरं जरा इथे.'' घसा खाखरत त्या म्हणाल्या, ''आज पहाटे विचित्रच स्वप्न पडलं.'' ''स्वप्न! म्हणून एवढ्या अस्वस्थ आहात. काय माझं देहावसान बघितलंत की काय?'' ''काहीतरी अभद्र बोलू नका.'' ''अहो आता पिकली फळं आपण, कधीतरी गळणारच ना.'' नलिनीबाई शून्यात बघत म्हणाल्या, ''एक गोंडस बाळ दिसलं हो! आंघोळीच्या आधीची मालिश चालली होती त्याची. पायावर पालथं करताना हातातून निसटलं, कळवळून रडत होतं एवढुसं लेकरू.'' ''हं... आईच्या हातातून असाच निसटला होता ना तो, कपाळ काळंनिळं झालं होतं. पण म्हणून एवढ्या अस्वस्थ आहात होय. तुम्हाला नेहमीच तर पडतात त्याची स्वप्न. तेच ते विचार करता मग काय.'' ''यावेळी मालिश करणारी मी होते...'' क्षणभर निःशब्द शांतता पसरली. दिवाकररावांना काय बोलावं कळत नव्हतं. आवाज जरा कापरा झाला होता, समजावणीच्या सुरात म्हणाले ते... ''स्वप्नांचा एवढा विचार करू नये. पहाटेची सगळीच स्वप्न खरी होतात असं नव्हे अन् एकदा घडलाय ना प्रसंग. त्यावरून दिसलं असेल असं काहीतरी.'' ''हो; पण मी काय म्हणते, जाऊया का त्याच्याकडे...?'' पुन्हा तीच निःशब्द शांतता. नलिनीबाई आशाळभूत नजरेने त्यांच्याकडे बघत होत्या. ''मी येतो जरा कोपऱ्यावर जाऊन. एक गोळी आणायची होती.'' ''थांबा बरं, अजिबात पळवाटा शोधू नका, मला बोलू तरी द्या...'' ''त्याला नाहीये गरज आपली.'' ''असं फक्त तुम्हाला वाटतंय. प्रत्येक वेळी फोन येतो त्याचा. येतो की नाही सांगा. इथे शिफ्ट झाले त्यावेळीही आला होता ना तो. तो आला अन् तुम्ही शब्दही न बोलता निघून गेलात. आता गरज आहो हो त्याला आपली. घरात बाळ आलं की किती मदतीचे हात लागतात. काही कल्पना आहे का तुम्हाला?'' ''लावल्या असतील की मदतनीस बाया कामाला. भरपूर कमावतात दोघे.'' ''असं बोलताना एकदा स्वतःचा चेहरा आरशात बघा बरं; तुम्हाला तो नसल्याचा किती त्रास झालाय ते स्पष्ट दिसतंय मला.'' ''का हट्ट करताय उगाच. मी येतो जाऊन.'' ''मी, मी हट्ट करते. हो, करत असेनही; पण तुम्ही तो पुरवावा. आयुष्यभर तुम्ही म्हणाल तसं वागत आलोय.'' नलिनीबाई त्यांचा हात धरत त्यांना थांबवत म्हणाल्या. ''मग करायचा होतात ना. करायचा होतात हट्ट मी त्याचे लग्न अमान्य केले तेव्हा. करायचा होतात हट्ट मी त्याला वर्षभरापूर्वी घरात घेतले नाही तेव्हा. त्यावेळी काहीही बोलला नाही. तोही तसाच, सगळं सगळं माझ्या मताप्रमाणे केलं, करीअर मी सांगीन तसं निवडलं. माझ्या मनाविरुद्ध लग्न करायचं तेवढं म्हणाला फक्त. मी तुझं तुझं वेगळं बिऱ्हाड वेगळं मांड म्हणालो तर गेला निघून. हट्टाने इथे राहिला असता तर काय मी हाकलून दिलं असतं का? नसतो बोललो चार दिवस. पण तुम्ही दोघांनीही कधीतरी मला विरोध करून तर बघायचात.'' दिवाकररावांचा संयम सुटला होता. राग, चिडचिड, दुःख, पोकळी सगळ्या भावनांचा विस्फोट झाला होता जणू. ते बाजूला खुर्चीत बसले अन् एखाद्या लहान मुलासारखे रडायला लागले. दिविज; म्हणजे नलिनीबाई-दिवाकररावांचा एकुलता एक मुलगा. दिवाकरराव प्राचार्य होते. दिविजला डॉक्टर व्हायचे असताना दिवाकररावांनी त्याला इंजिनीअरिंगला पाठवले. नोकरीच्या पहिल्या वर्षीच त्याला बाहेर देशात जाण्याचा योग आला अन् तिकडेच त्याची ओळख त्याची कलीग असलेल्या निधीशी झाली. दिवाकररावांना त्याचे लग्न आपल्या सहकाऱ्याच्या मुलीशी व्हावे असे फार वाटत होते. पण तिथपर्यंत जाण्याची वेळच आली नाही, त्या आधीच दिविजने निधीशी लग्न करण्याचे जाहीर केले. परप्रांतातली, इतकी अनोळखी मुलगी निवडल्याबद्दल त्यांची नाराजी होती. बाबांनी एकदा सांगितल्यावर ते बधणार नाहीत, हे त्याला माहीत होते. नलिनीबाईंनी आपल्यापरीने समजावण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ! निधीशी रजिस्टर मॅरेज करून दिविज तीन वर्षांसाठी परदेशात गेला. नलिनीबाईंशी संवाद होता त्याचा. निधीदेखील बोलायची, पण शेवटी खऱ्या सहवासातून वाढणारी ओल अन् नाती इतक्या अंतराहून कशी बरं जमवून आणायची. वर्षभरापूर्वी दिविज जेव्हा पुन्हा भारतात आला तेव्हा त्याने घरी परतण्याचा प्रयत्न केला, पण निष्फळ. त्यांच्याकडे गोड बातमी असल्याचे नलिनीबाईंनी सांगितले त्यावेळी खरं तर खूप आनंद झाला होता दिवाकररावांना. दिविजचा जन्म, त्याचे ते लुटुलुटू उभे राहणे, सगळं काही आठवत होतं त्यांना; पण त्याने आईशी संपर्क ठेवला अन् आपला विचारदेखील केला नाही, हा मनाला पडलेला ओरखडा ठसठसत राहिला. सारखा इगो आडवा येत राहिला. नात झाल्याचं कळलं तेव्हा तर त्यांना किती आनंद झाला होता! लेक नसल्याची उणीव भरून निघणार होती. दिविज तिला घेऊन घरी येईल अन् आपण आनंदाने तिचे स्वागत करू, असे त्यांनी मनोमन ठरवले; पण झाले उलटेच. दिवाकररावांचा ताठरपणा अधिकच वाढला. कधी कधी आपण मोठी माणसं अशी का वागतो, हा विचार हजारवेळा त्यांच्या डोक्यात आला, पण मनातली ओढ, अस्वस्थता तळमळ काही केल्या कोणाला दाखवता आली नाही. ''अहो, किती तळमळत होतात तुम्हीसुद्धा. किती त्रास करून घेतलात स्वतःला. झालं बघा बरं तुमच्या अडेल स्वभावामुळे.'' ''आता तेच तेच बोलून अजून लाजवणार आहात का आम्हाला. त्या दिवशी दवाखान्यात गेलात बाळाला बघायला तर साधं विचारलंसुद्धा नाहीत.'' ''ते जाऊ द्या आता सगळं, चला बरं भरभर आटोपून जाऊ त्याच्याकडे. मी फोन करते त्याला. तो येईल घ्यायला आपल्याला.'' ''नको नको. जाऊ आपणच. १५ दिवसांची पॅरेंटल लिव्ह संपवून दिविज आजच जॉईन झाला होता. पहिला आठवडाभर निधीची आई होती, पण फार दिवस राहणे त्यांनाही शक्य झाले नाही. नवख्या आईबाबांना त्या इवल्याशा जिवाबद्दल अजून फारसं काही कळत नव्हतं. दुखतंय का, खुपतंय का, भूक लागली का, सगळं अगदीच अंदाजाने चाललं होतं. त्यामुळे दोघांचीही खूप तारांबळ उडत होती. काही वेळा त्या दोघांना घाबरायलासुद्धा होत होतं. तो ऑफिसमधून आला अन् घरातून येणारे दरवळ त्याच्या लक्षात आले. आई सहाणेवर काहीतरी उगाळत होती. निधी तिथेच किचनमध्ये खुर्चीवर बसून गप्पा मारत होती व त्याचे बाबा... त्याचे बाबा झोका देत बसले होते त्याच्या लेकीला. दिवाकरराव लगेचच काही बोलले नाही त्याच्याशी. तोही त्यांच्या पाया पडत आईशी बोलायला निघून गेला. ''आई, काय जादूची कांडी फिरवलीस तू, खरंय ना हे सगळं. मला चिमटा काढ बघू.'' ''अरे, जादूची कांडी मी नाही काही फिरवली, ती आहे ना साखरसाय. ती सगळं गोड करणार आहे बघ आता.'' नलिनीबाईंच्या या वाक्यावर तिघेही मन भरून हसले. पाणावलेल्या डोळ्यांच्या कडा

**कोकणाच्या निसर्गरम्य सावंतवाडीच्या भूमीत, नाथपंथीय संत सोहिरोबा अंबिये यांचा जन्म झाला. ते व्युत्पन्न कवी व साक्षात्कारी योगी सत्पुरुष होते. त्यांच्या भक्ती रचना भक्ती, विवेकाचा प्रबोध आहे. 'नाही माळ, मुद्रेचे काम। अंतरी ज्याच्या पूर्ण राम।' अशा सार्थ-समर्पक शब्दात 'भक्तीमंजरीमाला' मध्ये सोहिरोबांची थोरवी वर्णन केलेली आहे. त्यांचे अवघे जीवन राममय होते. ते थोर संस्कृत रचनाकारही होते. त्यांचे उत्तरकाळात मध्यप्रदेश मधील ग्वाल्हेर, इंदूर, उज्जैयनी या मराठी मुलखात अनेक वर्षे वास्तव्य होते. उज्जैयनीत यांचा मठ होता. तेथेच क्षीप्रा नदीकाठी ते अंतर्धान पावले.**

लेखांक ३७

# कोकणातील संत सोहिरोबांच्या पदांमधील 'रामस्मरण'

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

**हरिभजनाविन काळ घालवू नको रे।**
**दोरीच्या सापा भिऊनी भवा।**
**भेटि नाही जीवा शिवा।**
**अंतरीचा ज्ञानदीप मालवू नको रे।।१।।**
**विवेकाची ठरेल ओल।**
**ऐसे बोलावे बोल।।**
**आपुल्या मते उगीच**
**चिखल कालवू नको रे।।२।।**
**संत संगतीने उमज।**
**आणुनि मनी पुरते समज।**
**अनुभवाविण मान हालवू नको रे।।३।।**
**सोहिरा म्हणे ज्ञानज्योती।**
**तेथे कैंची दिवसराती।**
**तयाविन नेत्रपाती हालवू नको रे ।।४।।**

पंडित जितेंद्र अभिषेकींच्या आवाजातील हे भक्ती पद मराठी माणसांमध्ये सर्वश्रुत व लोकप्रिय आहे. हे पद कोकणातील साक्षात्कारी संत सोहिरोबा यांचे आहे. १८ व्या शतकात सावंतवाडी परिसरात ही महान विभुती होऊन गेली. इ.स. १७१४ साली त्यांचा जन्म झाला आणि १७९३ मध्ये मध्यप्रदेश मधील उजैनी येथे क्षीप्रा तीरावरील महाकाल शिवमंदिर परिसरातून ते सदेह गुप्त झाले. नाथसंप्रदायी सोहिरोबा साक्षात्कारी संत, योगी होते.

**सोहिरोबा अंबिये धन्यसंत।**
**अवतार प्रत्यक्ष गहिनीचा।।७७।।**

अशा शब्दात त्याचे वर्णन संतचरित्रकार राजाराम प्रासादी याने 'भक्तमंजरीमाला' मध्ये केलेले आहे. **'नाही माळ मुद्रेचे काम। अंतरी ज्याच्या पूर्ण 'नाही माळ मुद्रेचे काम। अंतरी ज्याच्या पूर्ण 'नाही माळ मुद्रेचे काम। अंतरी ज्याच्या पूर्ण 'राम'।।'**

असे त्याचे जीवन राममय झालेले होते. ईश्वरी अनुभूतीने रंगलेले होते.

संत सोहिरोबा हे सावंतवाडीच्या भोसले संस्थानिकांकडे दरबारी सेवक होते. त्यांच्याकडे कुलकर्णीपदाची जबाबदारी होती. पण ईश्वरी सेवेसाठी त्यांनी राज दरबारीच्या नोकरीचा राजीनामा दिला. संत सोहिरोबाची साहित्य रचना विपुल आहे. १८ अध्यायाचे दोन मोठे ग्रंथ त्यांनी लिहिलेले आहेत. त्यांच्या 'महनुभवेश्वरी' या ९०२२ ओव्यांच्या १८ अध्यायी ग्रंथास तर 'प्रति ज्ञानेश्वरी' मानले जाते.



त्याशिवाय त्यांचे सिद्धांत संहिता, अद्वयानंद, पूर्वाक्षरी, अक्षयबोध हे ग्रंथ आणि शेकडो अभंग, ओव्या, पदे प्रसिद्ध आहेत. त्यांच्या पदांमध्ये राम नामाचा अपार महिमा वर्णन करणारी पदे आहेत. मराठीतील थोर कवी बा.भ. बोरकर यांनी सोहिरोबांच्या पदामधील आशयघनता व रागधारी माधुर्य लक्षात घेऊन त्यांच्या अनेक पदांचे संकलन- संपादन केलेले आहे, ही संत सोहिबांच्या साहित्याची मूल्यात्मक थोरवी आहे.

**त्यांच्या पदांमधून घडणारे राम दर्शन पाहू-**

संत साहिरोबांच्या भक्ती पदांचे तीन संग्रह प्रसिद्ध आहेत. पद संग्रह १ मधील क्र. ११३ चे हे पद, आत्मारामाचे निर्देशक आहे.

**तू राम राम स्मर रे।**
**आगम अगोचर अनादि सिद्ध।**
**अच्युत करूणाकर रे।।धृ.।।**
**असोनि न दिसे, देही कसा वसे।**
**चालवी हे अंतर रे।**
**साधुसमागम करोनी पुस रे।**
**भवसागर हा तर रे।।१।।**
**तू राम राम स्मर रे।।**

सोहिरोबांनी इथे निर्गुण रामाचे म्हणजेच आत्मारामाचे अनादि, अगम्य आणि अगोचर, अच्युत असे वर्णन करून त्याला करूणाकर म्हटले आहे. निर्गुण ईश्वरी तत्त्वाचे असे व अशाच शब्दात वर्णन आपणास अनेक संतांच्या रचनामधून दिसून येते. सर्व संतांचा उपदेश, हेतू व निर्देश हा सगुणरूपाकडून निर्गुणाकडे नेणाराच असतो. राम हा आपल्या देहात असूनही दिसत नाही पण संतांच्या संगतीने त्याची यथार्थ जाणीव- प्रचिती मात्र आपण घेऊ शकतो. हे सत्संगाचे महत्त्व आहे. आणि त्या आत्मारामाला जाणले की हा भवसागर तरून जाणे सहज सोपे आहे पण त्यासाठी राम नामाचे स्मरण करा असे संत सोहिरोबा सूचवतात.

**विषयापासूनी सुटेल।**
**केवळ संसारासी विटेल।**
**मन हे होईल निष्काम।।**
**श्रीराम जय राम जय जय राम।**

श्रीराम नामाच्या जपाने काय काय परिवर्तन होईल ते एका अन्य पदामध्ये संत सोहिराबा सांगतात. राम नामाने मन विषय वासना विकार यापासून सुटेल, त्याला संसाराच्या असार भोगामध्ये रस न वाटून ते संसाराला विटेल आणि मन निष्काम झाले की सारे जीवन आनंद राम होईल.

**सोहिरा म्हणे शिव स्मरतो।**
**वाल्मिकी पतीत पावन होतो।**
**ऐसे सकळा तारक नाम।।**
**श्रीराम जय राम जय जय राम।।**

राम नामाचा महिमा कसा थोर आहे हे सांगताना सोहिरोबा आपणास भगवान शिवशंकराचे व ऋषी वाल्मिकींचे दृष्टांत, उदाहरणे, दाखले देतात. भगवान शिवांनी समुद्रमंथनातून निघालेले विष प्राशन केल्यावर जो दाह झाला तो रामनामाने शमला. तसेच राम नामामुळे वाल्याचा वाल्मिकी ऋषी झाले.

**विष शमुनि संतोष पावला।**
**जपता शिवशंकर रे।।**
**तू राम राम स्मर रे।।**

वाल्मिकी, शिवशंकर याच प्रमाणे अहिल्या उद्धार, वानरगण उद्धार, दानव वध असे रामायणातील सर्व प्रमुख घटनांचे स्मरण घडवीत घडवीत सोहिरोबा राम नामाकडे भाविकभक्तांना वळवतात. नाम नाम महिमा हा एकूण संत साहित्याचा प्राण आहे. सोहिरोबांच्या भैरवी रागातील **'रामा काय तुज विसरू रे।'** असे पद विलक्षण भावपूर्ण आहे.


'हे राम प्रभो। तुला मी कसा विसरेन? तु यासाठीच मी आयुष्याचा क्षण न् क्षण ध्यासाने जगलो आहे. मी राममय झालो आहे. तु या दर्शनाने मला स्थितप्रज्ञता लाभली, माझी वाणी मौन झाली. तू सदेह मुक्ती दाता आहेस.' असे म्हणणार्या सोहिरोबांचे उज्जैयनीच्या क्षीप्रा काठी सदेह अंतर्धान पावणे, गुप्त होणे ही एक थक्क करणारी सत्य घटना आह. संत तुकोबांनंतरचे हे आणखी एक संतांचे सदेह वैकुंठगमन, रामधाम गमन आहे.

**सोहिरा म्हणे देहीच तरू रे।**
**रामा काय तुज विसरू रे।**

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग १४)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



रवींद्रनाथ म्हणजे बहुमुखी प्रतिभा लाभलेलं व्यक्तिमत्व होतं. खरं तर त्यांना त्यांच्या घरच्या मंडळींनी वकिलीचं शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला पाठवलं होतं. परंतु त्यांचं मन तिथे फारसं रमत नव्हतं. मात्र नाट्य, संगीत, कला इ. विषयांची आवड त्यांच्या रक्तातच असल्यानं त्याचा आस्वाद त्यांनी इंग्लंडमध्येही घेतला. त्यातल्या बर्याच गोष्टींचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर आणि पुढील काळात त्यांच्या साहित्यावर काही अंशी परिणाम नक्कीच झाला. ते पाश्चात्य संगीत शिकले. इंग्लंडमध्ये असताना ते स्कॉट कुटुंबात राहिले होते. त्या कुटुंबातील मिसेस स्कॉट या अत्यंत प्रेमळ होत्या. त्यांनी रवींद्रनाथांवर आईसारखी माया केली. त्यांची आपल्या कुटुंबाप्रती असलेली निष्ठा, मुलींवर आणि आपल्या पतीवर असलेलं प्रेम पाहून रवींद्रनाथांना स्त्रीमधील प्रेमभावना सर्वत्र सारख्याच आणि वैश्विक असतात याची खात्री पटली. त्याच कुटुंबात असताना पाश्चात्य संगीताशी देखील त्यांचा संबंध आला. परंतु इंग्लंडमधील औपचारिक शिक्षणात फारशी रुची नसल्याने ते भारतात परत आले. भारतात परत आल्यावर त्यांनी 'वाल्मिकी प्रतिभा' या नावाचे एक नाटक लिहिले. या वेळी त्यांचे वय अवघे वीस वर्षांचे होते. रवींद्रनाथांना नाट्य, संगीत आणि काव्यलेखनाचे बाळकडू त्यांच्या घरातच अगदी लहानपणापासून मिळाले होते. त्यांचे भाऊ ज्योतिरिंद्रनाथ नाटके लिहीत आणि बसवत असत. गुणिंद्रनाथ म्हणून त्यांच्या एका चुलतभावाला पण नाटकांची आवड होती. ज्योतिदांनी रवींद्रनाथांना नेहमीच उत्तेजन दिले. त्यामुळे रवींद्रनाथांची प्रतिभा साहित्यक्षेत्रात मुक्तपणे संचार करू लागली होती. 'वाल्मिकी प्रतिभा' हे नाटक अनेक अर्थांनी आगळेवेगळे आहे. वाल्या कोळी वाल्मिकी ऋषी होण्याआधी एक दरोडेखोर होता हे सगळ्यांना माहिती आहे. ब्रह्मदेव आणि नारदांच्या आज्ञेनुसार त्यांनी 'रामायणाची' रचना केली. परंतु ही रचना करण्याआधी क्रौंच पक्षाचे एक जोडपे एका झाडावर बसलेले पाहिले. त्या आपल्या आनंदात निमग्न असणाऱ्या एका पक्ष्याला एका शिकाऱ्याने बाण मारला. त्यामुळे त्या दुसऱ्या पक्ष्याचा विलाप पाहून वाल्मिकींचे हृदय द्रवले आणि त्यांच्या तोंडून रामायणातील तो प्रसिद्ध श्लोक बाहेर पडला.

**मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः।**
**यत्क्रौंचमिथुनादेकमवधी काममोहितम्।।**

कधी नव्हे तो आपल्या तोंडून अशा प्रकारची सुंदर रचना कशी काय बाहेर पडली याचे त्यांना नवल वाटले. त्यानंतर त्यांनी ब्रम्हदेव आणि नारदांच्या आशीर्वादाने रामायणाची रचना केली हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. ही जी मूळ घटना आहे, ती रवींद्रनाथांना मान्य होती. पण आपल्या नाटकात त्या घटनेला त्यांनी वेगळीच कलाटणी दिली. त्यांच्या 'वाल्मिकी प्रतिभा' या नाटकात वाल्या आणि त्याचे साथीदार यांची दरोडेखोरांची एक टोळी असते. ही सगळी मंडळी अत्यंत क्रूर आणि आडदांड असतात. ते प्रतिभा नावाच्या एका निरागस मुलीला पकडून आणतात आणि कालीमातेपुढे तिचा बळी देण्याचं ठरवतात. या निष्पाप मुलीचा आक्रोश ऐकून वाल्याचे हृदय द्रवते. तो स्वतः विषयी विचार करू लागतो. अंतरात्म्याचा शोध घेतो. त्याची ही तळमळ पाहून ती मुलगी म्हणजे प्रतिभा आपल्या खऱ्या रूपात त्याच्यासमोर प्रकट होते. ती म्हणजे प्रत्यक्ष साहित्य, कला आणि विद्येची देवता सरस्वती असते. ती त्याला म्हणते, ' तुझ्यातील माणुसकी जागृत होते की नाही याची परीक्षा मी पाहिली. तुझ्या पाषाणहृदयाला ज्या आर्त करुणेच्या स्वरांमुळे पाझर फुटला, त्याच तुझ्या हृदयातून आणि वाणीतून आता माणुसकीचे संगीत जन्म घेईल आणि लक्षावधी मनांना कोमल भावनांनी शुद्ध करेल. तुझी वाणी देशोदेशी चिरकाल घुमत राहील आणि त्यातून अनेक कवींना प्रेरणा मिळेल.' या नाटकात रवींद्रनाथांनी वाल्या कोळी लुटारूंपासून सरस्वतीला मुक्त करतो हे जे दाखवले आहे, प्रतिकात्मक आणि अतिशय महत्वाचे आहे. त्याचा अर्थ असा की 'सरस्वती' आज साहित्यरूपाने लुटारुंच्या, धनदांडग्यांच्या ताब्यात आहे. तिला त्यांच्यापासून मुक्त केले पाहिजे. राजकारणी, धनदांडगे यांच्यापासून ते मुक्त असले पाहिजे. तरच ते सर्वसामान्यांना उपयुक्त ठरेल. समाजाच्या प्रगतीची दिशा त्यामुळे सापडू शकेल. साहित्यिकांना मोकळे आकाश मिळेल. रवींद्रनाथांनी त्याकाळी जे प्रतीकात्मक रूपाने सुचवले ते आजदेखील तेवढेच महत्वाचे आहे. या नाटकाने रवींद्रनाथांनी जणू प्रायोगिक रंगभूमीची पायाभरणी केली. अनेक गोष्टी नवीन आणल्या. नाटकांवर इंग्रजी नाट्यभूमीचा प्रभाव होता, संगीताचा आणि रागदारीचा प्रभाव होता, त्या चौकटीतून नाटकाला बाहेर काढण्याचाच त्यांचा हा प्रयत्न होता. त्याला एक प्रकारची आंतरिक लय होती. गाण्याच्या आणि रागदारीच्या बंधनांपासून काही अंशी मुक्त होत हवा तसा नाट्याविष्कार सादर करण्याचे आणि स्वरांच्या प्रकटीकरणाचे स्वातंत्र्य त्यांनी घेतले होते. (पान ६ वर)

अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

# कोल्हटकरांचे चोरांचे संमेलन आणि वर्तमान स्थिती




ब्रिटिश कालावधीतील साम्राज्यशाही गुलाम देशातील लोकांना लोकशाहीचे महत्व पटवून देण्यासाठी आहे. हे भारतीय जनतेच्या मनावर बिंबविण्यासाठी त्यांच्या राजवटीत वेगवेगळ्या प्रकारची संमेलने भरविण्यास उत्तेजन दिल्या जात होते. अशी संमेलने इस्लाम राजवटीत भरविण्यास बंदी होती. त्यामुळे पूर्वीच्या तुलनेत आपल्याला मोकळा श्वास घेण्यास वाव आहे याची जाणीव भारतीय लोकांना होवू लागली. सहित्यिकांचे, शिक्षकांचे, वकिलांचे, डॉक्टरांचे संमेलने भरु लागले.

संमेलनात संबंधितांचा होणारा मानसन्मान पाहून विनोदाचे आद्य शंकराचार्य श्री. कृ. कोल्हटकर यांनी आपल्या कल्पनाशक्तीला बहर आला, सर्वांचे हे कौतुक सोहळे पाहून चोरांच्या मनात सवतीमत्सर नक्कीच निर्माण झाला असावा अशी कल्पना करुन प्रतिभेला त्यांनी चालना दिली. ते त्या पाठात लिहीतात. असंख्य अडचणींवर मात करुन आणि त्यांच्या व्यवसायाची संपूर्ण प्रतिष्ठा जोपासून चोरांनी ते संमेलन यशस्वी केले. त्यामुळे त्यांचे संमेलन तर बहारदार झालेच. त्यावेळी अगदी प्रतिकूल परिस्थितीत जे संमेलन त्या चोर महाशयांनी घेतले. त्याचा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांच्या वंशजांना किती मोठा लाभ झाला, त्यांच्या व्यवसायाला किती प्रतिष्ठा प्राप्त झाली. यावर थोडा विचार करायला काहीच हरकत नाही असे मला वाटते. फार चिंतन करुन शोध आणि बोध घेण्याच्या भानगडीत पडून फार काही उपयोग होणार नाही. त्यावेळी मोठ्या संख्येने चोर एकत्र आले तर पोलीस आपल्याला पकडतील अशी भिती त्यांना होती. सर्व चोर एकत्र आल्यावर तिथे सज्जन जाऊ शकत नाही. समजा चोरांच्या आग्रहाखातर तो तिथे गेला तरी एकही चांगला विचार त्याने त्यांच्यासमोर मांडल्यास तिथून तो जीवंत परत येवू शकेल की नाही. याची हमी नेमके कोणीच देवू शकत नाही. सभ्य लोकांना कोणताही त्रास होवू नये यासाठी संपूर्ण सौजन्य दाखवून संमेलन त्यांनी विंध्य पर्वत रांगांच्या जवळ घ्यायचे असे ठरविले होते. पोलीस आले तर त्वरित पोबारा करायचा. याचा अर्थ पोलीसांना घाबरायचे हा संकेत त्यांना मान्य होता. आज एकविसाव्या शतकात चोरांना किती प्रतिष्ठा प्राप्त झाली. राजकारण, समाजकारण, शिक्षणक्षेत्र, सांस्कृतिक क्षेत्र, वैद्यकिय क्षेत्र, साहित्य, अध्यात्म, नौकरशाही सर्वत्र चोरांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. शंभर वर्षापूर्वी त्या चोर महाशयांनी जे आक्रोडाचे झाड लावले त्याला आज कशी भरभरून फळे आली आहेत. संपत्तीचे स्थलांतर करण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी एवढी मेहनत अन्य कुणी घेत असेलं असे आम्हाला वाटत नाही. अर्थशास्त्रज्ञ तर फक्त विचार मांडतात. मोठमोठे ग्रंथ लिहीतात. तरीही विचारी जग त्यांचा फक्त सन्मानच करते. अहो एवढेच काय प्रतिष्ठित चोर संघटना सुद्धा त्यांच्या सन्मानच करतात. त्यांचा विचार त्यांना कळतच नसल्यामुळे तो स्विकारण्याचा काही प्रश्नच येत नाही. अहो लोकशाही आहे. त्यामुळे ते स्वीकारावे की नाकारावे हे आम्ही पाहूत, असा इशारा देवून लोकशाही केवळ आपल्या सोयीनुसार वापरण्यासाठी ते सदैव सतर्क असतीलं तर त्यांच्या त्या ईश्वरी कार्यात कोणत्याही विचारवंतांनी लूडबूड करण्याची गरजच काय? असे परखड मत प्रत्यक्ष मांडले नाही तरी ते राबविणे त्यांच्या हातीच असते. ते मत त्यांच्यापैकी कुणीही खोडून काढत नाही. एखाद्याने चूकुनही हिम्मत केली तर त्याला चोर संघटनाचे कोणतेही फायदे मिळणार नाहीत आणि त्याच्या भवितव्याची व जीविताची जबाबदारी त्याच्यावरच असेलं. हे समजून घेणे ही जबाबदारी विचारी माणसांचीच आहे.

कोल्हटकरांच्या चोरांच्या संमेलनात चोरांच्या संगतीचा परीणाम असा झाला की गावातील लोक चोऱ्या करु लागले. पांडूतात्यांनी बंडूनानाचा जोडा चोरून आणला. तेव्हा लक्षात आले की बंडूनानांनी तो पूर्वी पांडूतात्यांचा चोरला होता. किती छोट्या चोऱ्यामधून मोठी तयारी करता येते. याचा अनुभव आज घेतल्यास एका राज्याचा प्रकल्प दुसरे राज्य चोरुन नेते. त्याविषयी कुणी आवाज उठवण्याचा प्रयत्न केल्यास त्यापूर्वी तो प्रकल्प आमचाच होता. तो आम्ही परत मिळवून आम्ही आमच्या पातळीवर न्याय प्राप्त करुन घेतला असे छातीठोकपणे सांगितले जाते. यारुन बंडूनाना व पांडूतात्या यांच्या वारसदारांनी आता किती भन्नाट प्रगती केली आहे, हे आपल्या निदर्शनास येते. हे श्रेय त्या चोरांच्या संमेलनास द्यावेच लागणारं. त्या संमेलनाचा स्वागताध्यक्ष प्रसिद्ध दरोडेखोर संभ्या होता. त्या बिचाऱ्याला मिरवणूक काढण्यासाठी फक्त बैलगाडीची व्यवस्था झाली होती. त्याच्या जीवलग कार्यकर्त्यांनी बैलांना सोडून दिले. सारांश त्यांना मुक्त स्वातंत्र्य दिले. स्वागताध्यक्षाच्या गाडीचे बैल ते स्वतः झाले. बैलाचे खाद्य स्वतःच हडप करु लागले. मिरवणूकीदरम्यान अध्यक्षाचे घड्याळ चोरीला गेले. ते त्यांनी चोरलेलेच होते. असा प्रसंग कोल्हटकरांनी रंगविलेला आहे. आपल्या साहेबांनी केलेल्या चाऱ्यातील हिस्सा कुठे, कसा हडप करता येईल व वेळ येताच त्याच्या मानगुटीवर कसे बसता येईल. ही त्यांची स्वामीनिष्ठा सर्वज्ञात झाली आहे. त्यामुळेच अनेक नेत्यांचे पी. ए. त्यांना बाजूला करुन पुढे नेते झालेले आपल्याला दिसतात. चोराच्या संमेलनातील स्वागताध्यक्ष मनोगत व्यक्त करतांना म्हणाले होते, चोरीच्या व्यवसायाला समाजाकडून उत्तेजन मिळत नाही. ही शरमेची बाब आहे. अर्थशास्त्राचा सिद्धांत सांगतो की संपत्ती फिरत राहिली पाहिजे. कंजूष लोक जमिनीखाली पैसा दडवितात. सावकार तिजोरीत धन साठवतात. दागिन्यामुळे भांडवल अडते. हा तुंबलेला धनाचा प्रवाह आपण फोडतो आणि तो वाहता ठेवतो. आपण करीत असलेल्या पवित्र कार्याचा गौरव अध्यक्षांनी आपल्या वाणीने केला. त्यामुळे शंभर वर्षांनंतर या क्षेत्रात किती प्रगती झाली. आता कुणीही सत्ता, अधिकार हाती आल्यावर आपल्या माणसाचं हितं सर्वात अगोदर पाहाणं यात काय चूक आहे? तो निसर्ग नियमच आहे.

देशाचा आणि समाजाचा विकास करायचा हे आम्ही सांगत असतांना आपणं गृहीत धरायचं, सर्वात अगोदर आणि सर्वात जास्त आमचा आणि आमच्या माणसांचा विकास. या विकेंद्रीकरणाचे केंद्रीकरण आम्हाला केंव्हाही करता येते. आमच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी हा अमाप पैसा कोणत्याही क्षणी आमच्याकडे येवू शकतो. पूर्वी आमच्या व्यवसायात हा धोका नव्हता पण अलिकडच्या कालावधीत खूप वाढला आहे. जनसेवा करण्यासाठीच आम्हाला हे पवित्र कार्य करावे लागते, यावर लोकांनी विश्वास ठेवावा. नेहमी अविश्वास दाखवून आपलेच प्रश्न त्यांनी कृपया वाढवून घेवू नयेत. अशी विनंती उर्फ निर्वाणीचा इशारा या निमित्ताने द्यावासा वाटतो. असे आजचे चोरमहाशय बिनधास्तपणे सांगू शकतात. चोरीमुळे तिजोऱ्या कुलपे तयार झाली. आता तर डोअरलॉक, सायरन याशिवाय बरेचसे आधुनिक यंत्रे तयार झाली. वॉचमनला नोकरी, प्रत्येक घरातील जेष्ठ नागरिकांकडे दुर्लक्ष करुन कुत्र्याचे लाड प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. असे प्रचंड परिवर्तन समाजात आपणास पहावयास मिळते. हे केवळ चोरांच्या भितीमुळे. त्यावेळी लाभलेल्या अध्यक्षांचे वर्णन करण्यासाठी मला आयुष्यभर कागद आणि पेनाची चोरी करावी लागेल, असे परिचय करून देणारी व्यक्ती म्हणाली होती पण आजच्या प्रतिष्ठीत चोरांचे वर्णन मात्र सुवर्णाक्षरांनी करणे काहीही कठीण नाही. त्याने नोटांच्या गड्डुया फेकल्यावर विश्वविख्यात सर्व क्षेत्रातील नामवंत एका पायावर त्यांचे गोडवे गायला तयारच असतात एवढेच नव्हे, ते व्यासपीठ मिळविण्यासाठी लाळघोटेपणा करायला सुद्धा तयार असतात. शंभर वर्षांपूर्वी चोरांच्या संमेलनाचे अध्यक्ष सर्व उपस्थित चोरांना उद्देशून असेही म्हणाले होते. चोरीमुळे कल्पकता वाढते. चोरीचे फायदे आपणास सांगणे म्हणजे सागरात चूळ भरुन टाकण्यासारखे आहे. तुम्ही तुमच्या व्यवसायात एवढे निष्णांत आहात हे त्यांचे प्रोत्साहनपर शब्द खूप प्रभावी ठरले. आज प्रत्येक क्षेत्रात ते भौतिक सुखाच्या परमोच्च शिखरावर आहेत. कोल्हटकरांनी विनोदाने लिहीलेले चोरांच्या संमेलनातील वास्तव शोधून फक्त विनोद करणे एवढाच माझाही हेतू आहे. दुसरे काहीच नाही.

# ग्रहसंकेत

**(रविवार, १५ सप्टेंबर ते शनिवार, २१ सप्टेंबर २०२४)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १५ सप्टेंबर-** प्रदोष, वामन जयंती, डॉ. सर विश्वेश्वरय्या जयंती, अभियंता दिन, श्रवणोपवास, बालमुकुंद बालावधूत पादुका स्थापन दिन कोल्हापूर, जागतिक लोकशाही दिन, दाधीदान, क्षीरव्रत ✻ **सोमवार, १६ सप्टेंबर-** ईद- ई- मिलाद, रवि कन्या (१९:४३), गोविंद प्रभू जयंती (महानुभव), महम्मद पैगंबर जयंती ✻ **मंगळवार, १७ सप्टेंबर-** अनंत चतुर्दशी, प्रोष्ठपदी पोर्णिमा, अन्वाधान, कुलधर्म पोर्णिमा श्राध्द (या तारखेस किंवा २१, २४, २९ सप्टेंबर किंवा २ आक्टोंबर रोजी करावे.), सूरदास ढेरे महाराज पुण्यतिथी, विश्वकर्मा दिन, मराठवाडा मुक्तिदिन ✻ **बुधवार, १८ सप्टेंबर-** इष्टि, भागवत सप्ताह समाप्ती, महालयारंभ, प्रतिपदा श्राध्द, संन्यासिना चातुर्मास्य समाप्ती, श्रीगणेश यात्रा मसूर (कराड), खंडग्रास चंद्र ग्रहण (भारतात दिसणार नाही) ✻ **गुरुवार, १९ सप्टेंबर-** द्वितीया श्राध्द, नारायणांलकार पूजा, म्हार्दोळ ✻ **शुक्रवार, २० सप्टेंबर-** बध्द गौरी (डोरली व्रत), तृतीया श्राध्द, श्री आंबिकामाता किरणोत्सव प्रारंभ ममदापूर ✻ **शनिवार, २१ सप्टेंबर-** संकट चतुर्थी ( मुंबई- २१:०३, नगर- २०:५५, कलबुर्गी- २०:४९, कोल्हापूर- २१:०१, जालना- २०:४९, धाराशीव- २०:५१, नांदेड- २०:४४, पंढरपूर- २०:५५, परभणी- २०:४६, पुणे- २१:०३, बीड- २०:५१, बीदर- २०:४६), लातूर- २०:४९, विजयपूर- २०:५५, छत्रपती संभाजीनगर- २०:५१, सांगली- २१:०७, सातारा- २१:०१, सोलापूर- २०:५३) भरणी श्राध्द, चतुर्थी श्राध्द.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १५, १६ सप्टेंबर (१७ पर्यंत) ✻ **डोहाळ जेवण-** १५ सप्टेंबर (१९ पर्यंत) ✻ **बारसे-** १५, १६ सप्टेंबर (१५ पर्यंत) ✻ **जावळ-** १५, १६ सप्टेंबर ✻ **गृहप्रवेश-** १५, १६ सप्टेंबर

### मेष :- कलागुणांचा सन्मान

फुलं दिसायल कितीही सुंदर असली तरी ओळख ही सुगंधानेच होते. आपण माणसांची पारखही याप्रमाणेच करायला हवी. रविवारचा शुक्र- गुरू त्रिकोण योग आर्थिक स्थितीत सुधारणा करणारा आहे. उपजत कला -गुणांना सन्मान मिळेल. उत्साह, धडाडीने विविध कामे मार्गी लावू शकाल. यांत्रिक, विधी, जनसंपर्क क्षेत्रात नव्या संधी लाभतील. अपेक्षित प्रगती साधता येईल. शुभ ता. १५, १९

### वृषभ:- वाहन खरेदीचे योग

माणसाची ओळख त्याचा स्वभाव व वागणुकीवरच होते. राशीतील गुरूचा राशी स्वामी शुक्राशी होणारा त्रिकोण योग सुखस्वास्थ मिळवून देणारा आहे. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच समाधानकारक राहणार आहे. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. नवीन वाहन खरेदीचे योग आहेत. मोजकेच व विचाराने बोलावे, म्हणजे वितंडवाद टळतील. शुभ ता. १६, १६, २१

### मिथुन:- शुभ घटना

बर्याचदा पाहिजे तसं जगता येत नाही कारण बरेच छंद जबाबदारीकडे गहाण ठेवावे लागतात. सुखस्थ शुक्राचा गुरूशी होणारा त्रिकोण योग स्थावर बाबतीत शुभ घटना घडविणार आहे. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. फार चिंता करणे टाळावे. कार्यक्षेत्रात विचारपूर्वक निर्णय घ्यावेत. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. फार चिंता करू नका. शुभ ता. १६, २१

### कर्क:- आर्थिक गणित बिघडेल

जो दुसऱ्यांना इज्जत देतो, तो स्वतःच प्रथम इज्जतदार असतो. अष्टमात शनि, व्ययात मंगळ त्यामुळे आपले आर्थिक गणित बिघडण्याची शक्यता आहे. अनावश्यक खर्च टाळणेच योग्य ठरेल. कमिशनवर चालणाऱ्या व्यवसायात चांगली प्राप्ती होईल. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. १५, १९

### सिंह:- चिंता नको, चिंतन करा

अपण दुसऱ्यांना तेच देऊ शकतो, जे आपल्या जवळ असते. धनस्थ शुक्राचा कर्मस्थ गुरूशी होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. कला-गुणांतून अर्थार्जन घडेल. नव्या संधी लाभतील. अंगच्या हुशारीने विविध समस्यांवर मात करू शकाल. नव्या कामांना गती मिळेल. वैद्यकिय, मेकॅनिकल क्षेत्रात विशेष चांगल्या संधी लाभतील. चिंता करू नका. चिंतन करा. शुभ ता. १५, १८

### कन्या:- अडचणी सुटत जातील

जीवनात असे लोक जोडावेत, जे वेळप्रसंगी ते आपली सावली आणि आरसा बनून राहतील. राशीतील शुक्राचा भाग्यातील गुरूशी होणारा त्रिकोण योग आता आपणास थोडे तरी स्वास्थ मिळवून देईल. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. नव्या योजना मार्गी लावता येतील. सर्व प्रतिकुलतेवर मात करू शकाल. अडचणी सुटत जातील. शुभ ता. १६, १९

### तुला:- सुख समाधान

खरे बोलणारा व सत्याच्या मार्गाने चालणारा माणूस एकटाच जीवन प्रवास करू शकतो. राशीस्वामी शुक्र राशीत येणार आहे. त्यामुळे आनंददायी घटना घडतील. जनसंपर्क वाढता राहिल्याने उद्दिष्टे साध्य करू शकाल. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित फलप्राप्ती होईल. कौटुंबिक जीवनात सुख समाधान लाभेल. शुभ ता. १६, १९, २१

### वृश्चिक:- नव्या ओळखी पारखून घ्या

जोपर्यत तुम्ही स्वतः खुष नाही, तोपर्यत सर्व गोष्टींची किंमत शून्य असते. लाभातील शुक्राचा गुरूशी होणारा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. सरकारी कामे करून घ्यावीत. वाहतूक, माहिती तंत्रज्ञान अशा क्षेत्रात प्रगती साधता येईल. नव्या ओळखी पारखून घ्या. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १६, २१

### धनु:- सामंजस्याने रहावे

ऐकलेल्या गोष्टींवर भरवसा विचारपूर्वक ठेवला पाहिजे. कर्मस्थ शुक्राचा गुरूशी होणारा त्रिकोण योग सुख स्वास्थ मिळवून देणारा आहे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. प्रशासन सेवेत अनुकूलता राहिल. प्रगतीच्या घटना घडतील. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. अडचणींवर मात करू शकाल. विचाराने निर्णय घ्यावेत. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल. शुभ ता. १६, २१

### मकर:- अपेक्षित कामे होतील

आयुष्यात लोकांकडे जास्त लक्ष देऊ नका. प्रत्येकजण त्यांच्या मानसिकतेनुसारच पाहत असतो. शुक्र- गुरूचा त्रिकोण योग आर्थिक प्रगती करणारा आहे. व्यवसायात प्रगतीचे मार्ग खुले होतील. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. नव्या कामांना गती मिळेल. नव्या संधी लाभणार आहेत. लाभ उठवावा. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित कामे मनासारखी होतील. शुभ ता. १५, १९

### कुंभ:- अपेक्षित घटना घडतील

जीवनात आपले कर्मच आपली दशा व दिशा ठरवित असते. शुक्र- गुरूचा त्रिकोण योग आपल्या आर्थिक विवंचना कमी करणारा ठरेल. चिकाटीने केलेली वाटचाल शुभ फलदायी ठरेल. भाग्यवृध्दिंगत करणाऱ्या घटना घडतील. चांगल्या संधीची प्रतिक्षा करावयास हरकत नाही. इच्छित ते ते साध्य करता येईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १९, २१

### मीन:- जपून असावे

जीवनाच्या प्रत्येक वळणावर धोकेबाज भेटतात. त्यात बाहेरचे कमी पण, आपलेच जास्त असतात. जपून असावे. राशीतील राहू, नेपच्यूनमुळे एखादी चिंता मनात घर करून राहिल. द्विधा मनस्थिती टाळून ठाम विचाराने रहावे. चौथा मंगळ, बारावा शनि आपली सत्त्व परिक्षा पाहणारा आहे. कुशलतेने येणाऱ्या संधी स्विकारा. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. शुभ ता. १९

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## सिने -रंगीला राज कपूर

संगीत प्रदान केले. 'हीना' चित्रपटाची घोषणा राज कपूर यांनी १९८७ साली केली व त्याचे प्राथमिक कार्य त्यांनी सुरू केले असता त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यात खंड पडला. १९८८ साली दादासाहेब फाळके पुरस्कार स्वीकारण्याच्या वेळीच त्यांना दम्याचा प्राणांतिक आघात झाला. राष्ट्रपती आर. व्यंकटरमण यांनी राजशिष्टाचार बाजूला सारून स्वत: त्यांच्या जागेवर जाऊन पुरस्कार प्रदान केला. तोच राज कपूर यांच्या जाणिवेचा शेवटचा क्षण..! त्यानंतर ते शुद्धीवर आलेच नाही व बरोबर एक महिन्यानंतर २ जून १९८८ रोजी त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्या कल्पनेतील 'हीना' चित्रपट १९९१ साली रणधीर कपूर यांच्या दिग्दर्शनात प्रदर्शित झाला. व्याप्त काश्मीरमध्ये चित्रित झालेला हा पहिला हिंदी चित्रपट. राज कपूर हे अंतर्बाह्य चित्रपट जगणारे व्यक्ती होते. त्यांच्यामध्ये अतिशय उत्तम संगीतकार व नृत्य-दिग्दर्शक लपलेला होता. संगीतकार कोणीही असो त्यांच्या चित्रपटातील संगीतावर त्यांचीच अमीट छाप असे. नायिकेस पडद्यावर प्रस्तुत करण्याची त्यांची शैली केवळ अतुलनीय..! आर. के. स्टुडिओच्या प्रतिवर्षी होणाऱ्या होलिकोत्सवाच्या दंतकथा झाल्या. खऱ्या अर्थाने ते 'शो-मॅन' होते. 'झाले बहु, होतीलही बहु, पण या सम हा' रणबीर राज कपूर..! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

## संत साहित्यातील अनुभव सिद्धांत

तुळस उकिरड्यावर उगवली तर ती टाकून द्यायची काय? तर नाही, ती स्वीकार्य असते. तुळशीचे माहात्म्य तिच्या उगवण्यावर अवलंबून नसते तर तिच्या अंगी असलेल्या औषधी गुणधर्मावर असते. तसेच फणसाचे आहे. त्याच्या सालीकडे पाहून, ओबडधोबड आकाराकडे पाहून त्याला टाकून दिले तर त्याच्यामधील मधाळ गाभा व चविष्ट बियांपासून आपण वंचित राहू. त्याचप्रमाणे वर्ण, जात, पंथ या गोष्टी फणसाच्या वरच्या सालीसारख्या आहेत. तर आचार, विचार, गुण त्याच्या बियासारख्या आहेत. म्हणून गुणवान व्यक्ती हलक्या जातीत जन्मला तर त्याला दूर सारायचे नसते तर त्याला जवळ करायचे असते. जातीसारख्या बाह्य गोष्टींकडे पाहिले तर गुणी व्यक्तीच्या संगतीला आपण मुकल्याशिवाय राहणार नाही. संत चोखोबांनीही जातिनिरपेक्षतेचा एक दाखला आपल्या अभंग वाङ्मयात दिला आहे. तो असा- ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा।।१।। कमान डोंगी परी तिर नोहे डोंगा काय भुललासी वरलिया रंगा समाजामध्ये व्यवहारातील सचोटी सांगताना कसे वागावे, वरवरच्या गोष्टीवर भुलून न जाता आतील गाभा-गुणधर्म तपासून पाहावा. अन्यथा आपली फसगत होईल किंवा चांगल्या गोष्टीच्या प्राप्तीपासून दूर राहू, असे व्यवहारज्ञान संत तुकारामांसहित सर्व संत सांगतात.

विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले



# शांतिवादी, व्यवहारवादी आणि युद्धे

१९४८ साली राम गबाले यांच्या दिग्दर्शनात एक मराठी चित्रपट आला होता. त्याचे नाव होते 'वंदे मातरम्.' कथा, पटकथा, संवाद आणि गीते ग. दि. माडगूळकरांची. संगीत सुधीर फडके यांचे, तर नायक आणि नायिका म्हणून चक्क पु. ल. देशपांडे आणि सुनीताबाई देशपांडे. चित्रपटाची कथा १९४२ च्या भारत छोडो आंदोलनावर आधारित होती. १९४२ चे आंदोलन मुंबईतून सुरू झाले आणि देशभर पसरले. युरोपात दुसरे महायुद्ध ऐन भरात होते. तीच संधी साधून काँग्रेसने हे आंदोलन छेडले होते, पण ब्रिटिश सरकार मूर्ख नव्हते. त्यांनी झाडून सगळ्या पुढाऱ्यांना उचलून तुरुंगात टाकले आणि गोळीबार, लाठीमार आदी मार्गांचा पाशवी वापर करीत आंदोलन चिरडून टाकले. महाराष्ट्रासह देशभरातले आंदोलन दोन-तीन महिन्यांत थंडावले. अपवाद फक्त सातारा-सांगली जिल्ह्याचा.

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, किसन वीर इत्यादी नेत्यांनी ब्रिटिश सरकारला थेट १९४५ सालापर्यंत चांगलेच झुंजवले. अखेरच्या काळात नागनाथ नायकवडी यांनी तर सशस्त्र सैन्य उभे करण्याची जोरदार तयारी केली होती. यावरून तुमच्या लक्षात येईल की, अहिंसा, शांती वैश्विक प्रेम वगैरे जडजड शब्द वापरणारे नेते तुरुंगात गेल्यावर जनतेने मिळेल ते शस्त्र हाती घेऊन ब्रिटिश सरकारविरोधात लढाई पुकारली होती. गोळीबारात एकूण १०६४ माणसे ठार झाली, असा सरकारी आकडा आहे. वरील चित्रपटाचे लेखक ग. दि. मा. यांच्यावर या आंदोलनाचा प्रचंड प्रभाव होता; नव्हे, ते स्वत:च या आंदोलनात सहभागी होते. वर उल्लेख केलेले सर्व नेते हे ग. दि. मा. उर्फ अण्णा आणि त्यांचे बंधू व्यंकटेश उर्फ तात्या यांचे मित्रच होते. दोघाही माडगूळकर बंधूंच्या आत्मचरित्रपर लेखनात याबद्दल भरपूर उल्लेख आहेत. फक्त आश्चर्याची गोष्ट अशी की, मिळेल ते शस्त्र हातात घेऊन आंदोलनात उतरलेल्या या लोकांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही स्वत:ला शांतिवादी, अहिंसक म्हणवून घेणे पसंत केले. वरील 'वंदे मातरम्' चित्रपटात अण्णा माडगूळकरांनी लिहिलेले आणि सुधीर फडक्यांनी स्वत:च संगीतबद्ध करून गायलेले एक विलक्षण ओजस्वी गीत आहे- 'वेदमंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्!' पहिल्या कडव्यात कवी लिहितो'माउलीच्या मुक्ततेचा यज्ञ झाला भारती, त्यात लाखो वीर देती जीवितांच्या आहुति, आहुतिंनी सिद्ध केला मंत्र वंदे मातरम्.' आता या कडव्यानंतर कवी जणू एकदम सावध झालाय की, अरे आपण तर क्रांतिकारक वीरांची प्रशंसा करतोय. मग तो पुढच्या कडव्यात म्हणतो- 'या मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले, शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतिवादी झुंजले.' आता तुम्हीच विचार करा की, याला भाबडेपणा म्हणायचे की ढोंगीपणा? शांतिवाद्यांचे सगळे प्रमुख नेते वेगवेगळ्या तुरुंगात चरखा फिरवत होते, सूत कातत होते, कुणी पुस्तके लिहीत होते आणि अनुयायी हिंसक मार्गांनी सरकारला हैराण करत होते. तरी शांतिवादी झुंजले असेच म्हणायचे? या मराठी चित्रपटानंतर सहा वर्षांनी म्हणजे १९५४ साली 'जागृती' नावाचा हिंदी चित्रपट आला. त्यातलेच ते प्रसिद्ध गोणे- 'दे दी हमें आझादी, बिना खड्ग बिना ढाल!' आज हे सगळे वृत्तांत वाचताना माझ्या तरी मनात चक्क असे विचार येतात की, या शांतिवादी नेत्यांना 'मास हिप्नॉटिझम' म्हणजे 'सामुदायिक मोहिनीविद्या' अवगत होती की काय? अरे, लोकांनी आपले रक्त शिंपडून आंदोलने लढवली, स्वातंत्र्य मिळवले आणि तुम्ही म्हणता, 'आमच्या देशाला पूर्णपणे अहिंसक मार्गाने स्वातंत्र्य मिळाला.' गंमत म्हणजे तेच लोक, तीच जनता ही धडधडीत खोटी विधाने करणाऱ्यांना डोक्यावर घेते. हा भाबडेपणा म्हणायचा की सामुदायिक मोहिनीविद्येचा परिणाम? असो. तर अल्बर्ट आईन्स्टाईन हा महान शास्त्रज्ञ-सुद्धा शांतिवादी होता. ज्याच्या भौतिकशास्त्रातील संशोधनावरून पुढे अण्वस्त्रे बनवण्यात आली आणि त्या अण्वस्त्रांच्या प्रत्यक्ष वापराने लाखो माणसे ठार झाली. तो महान भौतिक शास्त्रज्ञ आईन्स्टाईन चक्क शांतिवादी होता. आईन्स्टाईन हा मूळचा जर्मन ज्यू. त्याचा जन्म १८७९ सालचा. आईन्स्टाईन कुटुंबाने पुढे स्वित्झर्लंडमध्ये स्थलांतर केले. १९१४ साली युरोपात पहिले महायुद्ध भडकले तेव्हा आईन्स्टाईन २५ वर्षांचा होता.

१९१४ ते १९१८ या काळात झालेले पहिले महायुद्ध हे आधुनिक मानवजातीच्या तोवरच्या इतिहासातले सर्वाधिक संहारक आणि विध्वंसक युद्ध होते. त्या विध्वंसामुळे अतिशय अस्वस्थ झालेल्या अनेक नेत्यांमध्ये अमेरिकेचा तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन हा प्रमुख होता. जगात यापुढे कधीच युद्धे होऊ नयेत, अशा विचारांतून वुड्रो विल्सनने पुढाकार घेऊन 'लीग ऑफ नेशन्स' या संस्थेची स्थापना केली. सध्याच्या 'युनो'ची ही पूर्वज संस्था होय. जगभरच्या शांतिवादी नेते, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ अशा मंडळींनी 'लीग ऑफ नेशन्स'च्या व्यासपीठावरून जागतिक शांततेचा जोरदार पुरस्कार केला. देशा-देशांमधले मतभेद युद्धाच्या टोकापर्यंत जाऊ नयेत म्हणून ही लीग सतत कार्यरत राहिली. १९३१ साली 'लीग ऑफ नेशन्स'च्या माध्यमातून अल्बर्ट आईन्स्टाईनने एक प्रश्न उपस्थित केला. 'युद्धाच्या विध्वंसापासून मानवजातीला कायमची मुक्ती देण्याचा काही उपाय आहे का?' आता हा प्रश्न मूलभूत मानवी प्रवृत्तीशी निगडित आहे.

एक माणूस दुसऱ्या माणसाशी भांडण करतो, एक लोकसमूह दुसऱ्या लोकसमूहाशी भांडतो, त्याला ठार मारून त्याची संपत्ती लुटू पाहतो, त्याला गुलाम बनवून त्याच्यावर वर्चस्व गाजवू पाहतो. असे का होते? ही प्रवृत्ती नाहीशी होऊन माणूस शांततेने सहजीवन जगू शकणार नाही का? मानवी मन आणि त्याच्या मूलभूत प्रवृत्ती यांच्याशी निगडित असे हे प्रश्न विचारायला आईन्स्टाईनने तितकाच भारी माणूस शोधून काढला. तो म्हणजे सिग्मंड फ्रॉईड. प्रोफेसर फ्रॉईड हा पण मूळचा जर्मन ज्यू. त्याचा जन्म १८५६ सालचा. तो ऑस्ट्रियात व्हिएन्ना इथे राहात असे. बहुभाषाकोविद आणि असंख्य क्षेत्रांमध्ये अफाट संशोधन करणारा फ्रॉईड मानसशास्त्र या विषयातील 'सायकोॲनलिसीस' सिद्धांतामुळे जगभर प्रसिद्ध झाला. माणसाचे मन विशिष्ट प्रसंगात विशिष्ट तऱ्हेनेच का विचार करते आणि त्यानुसारच का कृती करते? याबद्दल फ्रॉईड आयुष्यभर संशोधन, चिंतन आणि अध्यापन करत होता. कदाचित त्यामुळेच तो अजिबात शांतिवादी वगैरे नव्हता. आईन्स्टाईनने वरील प्रश्न उपस्थित करणारे एक जाहीर पत्र 'लीग' मार्फत फ्रॉईडला पाठवले. या पत्राला उत्तर पाठवताना फ्रॉईडने लिहिले, 'युद्ध करणे, हिंसा करणे, विध्वंस करणे, आपल्या सारख्याच असलेल्या दुसऱ्या माणसाला मारण्याची इच्छा होणे, ही माणसाची एक सहजप्रवृत्ती आहे. तिला लगाम घालता येईल, पण ती नाहीशी करता येणार नाही.' १९३३ साली आईन्स्टाईन आणि फ्रॉईड यांच्यातला हा पत्रव्यवहार पुस्तिका रूपात प्रसिद्ध झाला. गंमत म्हणजे त्याच वर्षी जर्मनीत हिटलर सत्तारूढ झाला.

आपल्याला आता जर्मनीत राहता येणार नाही, हे समजून चुकलेल्या ज्यू आईन्स्टाईनने अमेरिकेत आश्रय घेतला. पुढे १९३८ साली हिटलरच्या सैन्याने ऑस्ट्रिया व्यापला. तेव्हा ज्यू फ्रॉईडला व्हिएन्ना सोडून इंग्लंडमध्ये आश्रय घ्यावा लागला. माझ्या मनात येते, १९६२ साली माओचे चिनी सैन्य नेफा (आता अरुणाचल प्रदेश) च्या सीमेवरून परत गेले म्हणून बरे. त्यांनी जर आसाम आणि बंगाल व्यापला असता तर तिथले हिंदू शांतिवादी कुठे बरे गेले असते? असो. तर स्वप्नाळू शांतिवादी आईन्स्टाईन आणि रोखठोक प्रॅक्टिकल फ्रॉईड यांचा वरील पत्रव्यवहार 'व्हाय वॉर' अशा नावाच्या पुस्तिकेत उपलब्ध आहे. आता याच नावाचे ताजे पुस्तक रिचर्ड जेम्स ओव्हेरी या ब्रिटिश लष्करी इतिहासकाराने लिहिले आहे. हे त्याचे ३१ वे पुस्तक आहे. आधुनिक शिक्षण, मानवी प्रगती, वाढलेले दळणवळण इत्यादींमुळे माणसाचा हिंसक स्वभाव खूपच नियंत्रणात आला आहे, असे हल्लीचे शांतिवादी म्हणत असतात. ओव्हेरी म्हणतो, दुसरे महायुद्ध जेव्हा धडाडून पेटले, तेव्हा सर्वच युद्धमान राष्ट्रांनी आपल्या व्यावसायिक सैन्याच्या जोडीला नवीन भरती केलेले सैन्य मोठ्या संख्येत युद्धात आणले. या नव्या सैनिकांना अगदी माफक प्रशिक्षण दिलेले होते. सर्व देशांचे असे नवे रंगरूट मिळून किमान १० कोटी माणसे युद्धात उतरली होती आणि ती सर्व आपल्या शत्रूला म्हणजे आपल्या सारख्याच माणसांना बॉम्बने उडवून द्यायला, गोळ्या घालायला किंवा प्रसंगी बायोनेटने भोसकून ठार मारायला अगदी उत्साहाने तयार झालेली होती. महायुद्धानंतरचे शीतयुद्ध हे जागतिक वर्चस्वासाठी चालूच होते. आजची मध्यपूर्वेतला धुमसती स्थिती, रशिया आणि युक्रेन युद्ध, तैवानच्या प्रश्नावरून अमेरिका आणि चीन यांच्यात सतत वाढणारा तणाव हे सर्व मोठी युद्धे पेटवू शकणारे मुद्दे आहेत. यात सहभागी असणाऱ्यांना युद्धातला विध्वंस आणि संहार यांचे भान नाही, असे तर म्हणता येणार नाही. कुणाला दुसऱ्याची साधनसंपत्ती हडप करायची आहे, तर कुणाला दुसऱ्यापासून सुरक्षितता हवी आहे. तात्पर्य, आईन्स्टाईनचा शांतिवाद हा गप्पा मारायला ठीक असला, तरी फ्रॉईडचा रोखठोक व्यवहारवादच खरा होणार आहे. युद्धाला जर खूप प्राचीन असा इतिहास असला, तर त्याला तितकेच लांबलचक भविष्यही असणारच आहे. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

पान ४ वरून

## एक झाड आणि दोन पक्षी...

लंडन मधल्या एका संस्थेत अभ्यासासाठी प्रवेश मिळाला त्या वेळच्या प्रसंग शिक्षणासाठी लेखकाचे आसुसलेलपण दाखवणारे आहे. एक झाड आणि दोन पक्षी या आत्मचरित्राला मैत्रीचे धुके आणि मी माझा सांगाती अशा दोन भागात लेखक मांडतात. मी माझा सांगाती या भागात इंग्लंड म्हणजे सुशिक्षित तरुणांच्या लेखी एक यक्षभूमी, सामान्यांना तिचे दर्शन दुर्लभ होते अशा शब्दात लेखकाने इंग्लंडचे वर्णन केले आहे. तिथे गेल्यावर भाषेचा अडसर लेखकाला मोठ्या प्रमाणात जाणवला. मात्र, इंग्लंडचे पोलीस आणि भारतातील पोलीस यांची कर्तव्यनिष्ठता यातील लाख मोलाचा फरक लेखकाने एका प्रसंगात सांगितला आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळातील विद्यार्थी दिसत असताना दिगंबर लोणकरसारख्या हुशार विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या आदेशावरून कॉलेज सोडले. परीक्षेवर बहिष्कार घालणे अशा गोष्टी सोबतच विश्राम बेडेकर यांनी मात्र स्वतः इंग्रजांकडून अवहेलना पचवत शिष्यवृत्ती घेणे अशा बाबी त्या काळातील विद्यार्थ्यांच्या मानसिक दशेतील फरक दाखवणाऱ्या ठरतात. हस्ताक्षर परीक्षेची विद्या म्हणजे अक्षरावरून माणसाचा स्वभाव ओळखण्याची कला या संदर्भात एका शाळेतील शिक्षिकेला एक उच्च पदवीधर शिक्षक अश्लील पत्र लिहितो यावरून त्या काळातही वासनाधं शिक्षक आणि प्रवृत्ती त्यामुळे शिक्षण क्षेत्र डागाळलेले होते असे दिसून येते. त्याचप्रमाणे हरिभाऊ आपटे, नाथ माधव, खांडेकर, गडकरी यासह बालकवी, विनायक अशी कवी मंडळी लोकप्रिय असले तरी पदवीधर नव्हते असे एक अधोरेखन करून लेखकाने प्रतिभा आणि शिक्षण या दोन वेगवेगळ्या बाबी असल्याचे सांगितले आहे. एकंदरीत विश्राम बेडेकर यांचे एक झाड आणि दोन पक्षी हे आत्मचरित्र विश्राम बेडेकरांच्या लहानपणापासून, परदेश शिक्षण, चित्रपट सृष्टीतील अनुभव, लेखक म्हणून गाठीला आलेले अनुभव, संसारातील वेगवेगळ्या अनुभव या अशा अनेक पातळ्यांवर त्यांनी जे शिक्षण घेतले, अनुभव घेतले जगण्यातील शहाणपण शोधले आणि वापरले त्या सर्वांचा धावता आढावा आपल्या आत्मचरित्रात घेतला आहे.

पान ५ वरून

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ते नुकतेच इंग्लंडहून परतल्यामुळे या त्यांच्या प्रायोगिक नाटकावर काही अंशी पाश्चात्य संगीत आणि आयरिश संगीताचा प्रभावही होताच. हे नाटक केवळ वाचण्यासाठी नव्हेतच तर ते पाहावे आणि अनुभवावे अशा प्रकारचे होते. या नाटकाने वयाच्या केवळ विसाव्या वर्षी रवींद्रनाथांचे नाटककार म्हणून दमदार पदार्पण झाले. या नाटकातून साहित्यिक म्हणून आपल्या पुढील प्रवासाची दिशा रवींद्रनाथांना गवसली. आपले पुढील साहित्य कसे असेल याची जणू झलकच त्यांनी या नाटकाद्वारे दाखवली. दरोडेखोरांच्या किंवा धनदांडग्यांच्या तावडीतून सरस्वतीला मुक्त केल्याशिवाय कलावंताला सरस्वती प्रसन्न होत नाही हे त्यांना जाणवले होते. वाल्मीकींच्या अंतःकरणात जो दयेचा, करुणेचा झरा वाहू लागला, त्यामुळे जगाकडे आणि त्यातील क्रौर्याकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी वाल्मिकींना प्राप्त झाली.'वाल्मिकी प्रतिभा' हे नावच खरोखर अगदी सुंदर आहे. त्याच्या नावातच रवींद्रनाथ यांच्या प्रतिभेचाही विलास आपल्याला दिसतो. त्यांच्या प्रतिभेची झेप आपल्याला दिसते. या नाटकात वाल्मिकींची भूमिका स्वतः रवींद्रनाथांनी केली तर सरस्वतीची भूमिका त्यांची एक भाची प्रतिभा म्हणून होती तिने केली. त्या काळात नाटकात किंवा रंगभूमीवर आपल्या घरातील मुलींना सनातनी विचारांचे लोक पाऊल ठेवू देत नसत. असे करणे म्हणजे प्रतिष्ठेला बाधा आणण्यासारखे होते. पण रवींद्रनाथांनी ही सुरुवात स्वतःच्या घरापासूनच केली. ही एक प्रकारची सामाजिक क्रांतीच होती. या नाटकात खरं तर त्यांच्या घरातील बहुतेक सदस्यांचा या ना त्या कारणाने सहभाग होता. हे नाटक पहिल्यांदा सादर झाले ते सुद्धा टागोर कुटुंबियांच्या जोराशंको वाडी इथेच! कला, साहित्य इ प्रांतात पुढील काळात रवींद्रनाथांची जी वाटचाल होणार होती, त्याची सुरुवात आणि दिशादर्शन करणारे नाटक म्हणजे 'वाल्मिकी प्रतिभा! '

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# स्वप्नांचा पाया, कर्तृत्वाचे इमले !

लहानपणापासून एक महत्वाचा प्रश्न सगळ्यांना भंडावत असतो. तू मोठेपणी कोण होणार आहेस? स्वतःच्या,विशेषतः पालकांच्या स्वप्नांची पायाभरणी तेथून सुरु होते. विशेषतः स्वतःला जे जमलं नाही, ते मुलांच्या करवी करवून घ्यायचं आणि स्वप्न मुलांबद्दल पण डोळे पालकांचे अशी सगळीकडे परिस्थिती दिसते. स्वतःच्या विकासामध्ये व्यक्तिगत वाढ आणि सकारात्मक बदल अभिप्रेत असतात. कर्तृत्वाचे, कारकिर्दीचे उंच इमले असावेत असं सगळ्यांना वाटणं स्वाभाविक आणि म्हणूनच अपरिहार्य असते. इंग्रजीत एक सुवचन आहे- स्वतःचा विकास कोणावरही सोपवून चालत नाही. पण आपल्या कनिष्ठांना निर्णय घेण्याचे अधिकार बहाल केलेत तर त्यांचा विकास होऊ शकतो.

मानसशास्त्रात एक मूलभूत संकल्पना मानली जाते- ती म्हणजे व्यक्तिगत वाढ आणि म्हणूनच ती जन्मभराची स्वतःला सुधारण्याची प्रक्रिया असते, स्व-जागृतीची टप्प्याटप्प्याने वाढणारी असते. भावनिक भरभराट, नाती, कारकीर्द आणि एकुणात आनंद वाढविणारी ही संकल्पना आहे. असंख्य मानसशास्त्रीय संरचना बदलांना आधारभूत असतात असे संशोधन सांगते. आयुष्यातील सकारात्मक बदलांना लागणारी यंत्रणा कर्तृत्वाला आकारमान बहाल करते. मानसिक आणि व्यावसायिक रचनांमागील खालील संकल्पना समजून घेतल्या तर त्यांचे प्रभाव स्पष्ट होतात-

**(१) मॅस्लोची गरजांची उतरंड -**

व्यक्तींना आयुष्यात पुढे जाण्यासाठी मदत लागते आणि त्यासाठी लागणारी आवश्यक मानव केंद्रित प्रक्रिया मॅस्लो ने प्रथम सुचविली. त्याच्या उतरंडीने एक मुद्दा अधोरेखित केला. माणसांच्या गरजांना टप्प्याटप्प्याने साधायचे असते. या शिडीची सुरुवात मूलभूत शारीरिक आणि सुरक्षा गरजांनी होते आणि ती स्व-विकासाच्या टप्प्यावर येऊन थबकते. हा शेवटचा टप्पा असतो- आत्मसन्मान आणि आत्मगौरव/ आत्मबोध यांचा.

**(२) एरिक्सन यांचे सामाजिक घटक आणि वैयक्तिक विचार यांच्यातील विकासाचे प्रारूप-**

१९६३ मध्ये एरीक एरिक्सन यांनी मानव आपल्या आयुष्यात आठ टप्पे पार करत स्व-विकास साधू शकतो असे मत मांडले. आणि येथे पदोपदी आव्हाने आणि पेचप्रसंग असतात, त्यांचा जे यशस्वीपणे सामना करतात, त्या वादळांमधून जे समर्थपणे नाव वल्हवतात त्यांची आपोआप ओळख तयार होते. मात्र फक्त डोळ्यांत स्वप्ने ठेवून जगायचे नसते. डॉ कलाम म्हणतात तसे- मिटल्या डोळ्यांनी, झोपेत स्वप्ने जरूर बघावीत पण त्यांना साकार करायचे असेल, साध्य करायचे असेल तर मात्र डोळे उघडेच ठेवावे लागतात.

**(३) पिगेट यांचे आकलन विकासाचे प्रारूप-**

जीवशास्त्रज्ञ आणि ज्ञानरचनाकार जीन पिगेट यांनी १९५९ साली बालकांच्या आकलन विकासाचे प्रारूप मांडले आणि जगाचे आकलन बालकांना कसे होत जाते यांवर मूलवादी संशोधन केले. त्यांनी बौद्धिक वाढ, परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, स्वतःचा




विकास अशा टप्प्यांचा समावेश त्यांत केला.

**(४) बंडुरांची सामाजिक आकलन संकल्पना-**

१९७७ साली अल्बर्ट बंडुरा यांनी सामाजिक शिक्षणाची परिभाषा आणि स्वावलंबनातून विकास कसा साधायचा या विषयावर मतप्रदर्शन केले. या संकल्पनेचा पाया आहे निरीक्षणशक्ती, स्वतःवरील मर्यादांचे आकलन, आणि बदल घडवून आणण्याची क्षमता! यातून माणसे शिकतात हे सिद्ध होते.

**(५) स्व-निर्धाराची शक्ती-**

रायन आणि डेसि यांनी २०१८ साली मानवाच्या प्रवृत्तीकरणाची पार्श्वभूमी अभ्यासताना असे शोधून काढले की आयुष्यातील स्वायत्तता, मानवामधील अपार क्षमता आणि व्यक्तिविकास हे परस्परांना जोडलेले असतात. एकदा मूलभूत गरजांची पूर्तता झाली की मानवांना विकास आणि भरभराटीची अनुभूती यायला सुरुवात होते आणि याला स्वतःचा निर्धार कारणीभूत असतो.

**(६) सकारात्मकता-**

मानवाच्या विकासात सकारात्मकता महत्वाची भूमिका पार पाडत असते. मार्टीन सेलिग्मन यांनी २०११ साली सकारात्मक मानसशास्त्र हा विचार मांडला. आनंदाचा पाठपुरावा करताना मानवी बलस्थ-ाने, विकास आणि भरभराट यांचा विचार व्हायला हवा. सेलिग्मन यांनी त्यासाठी पाच टप्प्यांचे प्रारूप विकसित केले - सकारात्मक भावना, गुंतवणूक, नातेबंध आणि त्यांचे अर्थ या साऱ्यांमधून मानवी कर्तृत्व विकसित होऊ शकते हे ते टप्पे आहेत. लोमस यांनी २०१४ मध्ये ते जाहीरपणे मान्य केले, फक्त त्यासाठी सकारात्मकतेची मशागत करावी लागते हे विसरून चालत नाही. येणारे अनुभव आपोआप सकारात्मक आणि दीर्घकालीन होत जातात.

**(७) आकलन-वर्तन शैली -**

आरोन बेक यांनी २०१४ साली आणि त्याही आधी अल्बर्ट एलिस यांनी २००० साली या शैलीच्या माध्यमातून मानवी विचार, भावना आणि त्यातून जन्माला येणारे वर्तन यांच्यातील नातेबंधावर प्रकाश टाकला होता. ही शैली व्यक्तिविकासासाठी आवश्यक असलेल्या व्यवहार्य तोडग्यांवर प्रकाश टाकते आणि माणसाला नकारार्थी संवेदना शोधून त्यांना उध्वस्त करण्याचे मार्ग दाखवते.

वरील सात संकल्पना आणि अशा बऱ्याच विचारपद्धती अनेक मानसशास्त्रीय प्रक्रियांकडे अंगुलीनिर्देश करीत मानवी विकासाच्या आत काय दडलंय आणि तो कसा साधता येतो याबद्दल उत्तरे देतात. स्वतःला अधिक चांगले समजून घेण्या करता, स्वतःला कशापासून प्रेरणा मिळतात आणि कोणत्या मार्गाने गेल्यास आयुष्यात सकारात्मक सुधारणा शक्य होतात याचे दिशादर्शन करतात.

**स्व-विकासाचे नियोजन**

प्रत्येकाचे स्वप्न वेगळे असते, म्हणून त्या ध्येयापर्यंत पोहोचण्याचे मार्गही वेगवेगळे असतात. एखाद्याला उच्च शिक्षणाचा ध्यास असतो, एखाद्याला व्यवसाय सुरु करून शिखर गाठायचे असते तर एखादी व्यक्ती जगावेगळ्या स्वप्नाचा पाठपुरावा करीत नवेच मार्ग धुंडाळत असते. नजरा जितक्या, मार्ग तितके. पण प्राथमिक पायरी असते. नीलप्रत (ब्ल्यू प्रिंट) तयार करणे. म्हणजे त्या स्वप्नांना आधार मिळतो, पायाभरणी होते. स्वतःच्या ध्येयांबद्दल सुस्पष्ट चित्र निर्माण होते आणि अंगीकारायचा मार्गही दिसायला लागतो. ध्येय एक असले तरी तेथवर जाण्याचे असंख्य मार्ग असतात, त्यातील सुयोग्य, कमी खाचखळग्याच्या मार्गाची निवड करायची असते, गरज पडल्यास एखाद्या मार्गदर्शकाची, विकसकाची मदत शोधायची असते. या नियोजनाची काही वैशिष्ट्ये स्टार यांनी **२०२१ साली नोंदवून ठेवली आहेत-**

**(अ)** संक्षिप्त पण सुस्पष्ट

**(ब)** सहजासहजी उपलब्ध होऊ शकणारे संदर्भ, उदाहरणे, दीपस्तंभ

**(क)** गरजेनुसार सुधारून अद्ययावत केलेले

यापुढे जाऊन स्टार म्हणतात, अशा नियोजनासाठी काही महत्वाचे घटक विचारात घेणे गरजेचे असते.

**(१) विकासाचे क्षेत्र -** ज्या क्षेत्रात जाऊन प्रगती करायची असते त्याची आगाऊ निवड करणे गरजेचे असते. या कौशल्याची/ क्षमतेची कायम आठवण ठेवावी लागते.

**(२) विकासाचे हेतू- जीवनात नेमके काय साध्य करायचे आहे-** ते अल्पकालीन आहे की (उदा. तणावाची पातळी कमी करायची आहे) दीर्घकालीन (वैद्यकीय व्यवसायात एम डी ही पदवी प्राप्त करायची आहे) हे मनाशी स्पष्ट हवे.

**(३) हे साध्य करण्यासाठी स्वत:मध्ये काय बदल करावे लागतील-** अधिक सराव, जीवनशैलीत बदल, दिवसाचे चांगले व्यवस्थापन, पोषणयुक्त आ-हार इ.

**(४) कृती आराखडा -** प्रगतीचे मापन करण्यासाठी आपल्या हेतूंवर काम करणे, उदा.- व्यायामशाळा / पोहोण्याच्या तलावाच्या व्यवस्थापकाशी भेट/नांव नोंदणी, आहारतज्ञाकडून तक्ता आणणे

**(५) पुनरावलोकन-** ठरल्याप्रमाणे कृती होते आहे की नाही, अपेक्षित प्रगती होते आहे की नाही याचे निरीक्षण

**मदत-**

**व्यावसायिक समुपदेशकाकडून खालील प्रकारे मदत उपलब्ध होऊ शकते-**

व्यक्ती-केंद्रित प्रशिक्षण हे व्यक्ती-विकासातील महत्वाचे साधन मानले जाते. फक्त या वाढीसाठी आणि जीवनहेतूंच्या सिद्धीसाठी समुपदेशक आणि सल्लार्थी यांच्यातील नाते अधिक महत्वाचे मानले जाते. समुपदेशक खालील तीन प्रकारे मदतीचा हात आपल्या पक्षकाराकडे करू शकतो-

**(अ) वास्तवातील प्रवृत्ती / कल -** सल्लार्थीची विचारधारा विचारात घेतल्यावर कार्ल रॉजर्सने ही संकल्पना मांडली आहे. त्यानुसार वैश्विकदृष्ट्या मानवी प्रवृत्तीकरण मानवाची वाढ, विकास, स्वायत्तता याभोवती फिरत असते. स्वतःची उन्नती व्हावी ही मानवाची मूलभूत मागणी /अपेक्षा असते.

**(ब) नातेबांधणी बदल घडवून आणण्यास कारणीभूत असते-** स्वतःची करुणा, समन्वय (मेळ) आणि विनाअट सकारात्मकता यांचा शोध ज्याचा त्यालाच घ्यावा लागतो. मदतनीस स्वतःचे बाह्य प्रतिसाद नेहेमीच आपल्या आंतरिक संवेदनांशी जुळवून घेत सल्लार्थीला पुढे नेत असतो. आणि आपण कसे होऊ इच्छितो याची त्याला नव्याने तोंडओळख करून देतो. तसे साध्य झाल्यावर निर्माण झालेले नाते दीर्घकालीन बदल घडवून आणतात.

**(३) सकारात्मक दृष्टिकोन-** प्रत्येकामध्ये सुधारणेच्या, बदलण्याच्या, अधिक चांगले होण्याच्या शक्यता असतात. आणि ते संभाव्य सद्गुण पूर्णतया कार्यरत करण्याची मानवात इच्छा असते.

या कर्तृत्वाच्या इमारतीवर इमले चढवायचे असतील तर काही आस्था अंगीकारून त्यांच्याप्रती समर्पणभाव विकसित होणे गरजेचे असते. समुपदेशकाने सदैव लक्षात ठेवायचे असते. दोघांच्या संयुक्त कष्टाचे चीज होण्यासाठी फक्त आणि फक्त सल्लार्थी जबाबदार असतो. या प्रक्रियेत महत्वाची तत्वांचे पालन होणे गरजेचे असते-

**(१)** प्रयत्न, चिकाटी, समर्पण, कष्ट आणि शिस्त यांचे पालन

**(२)** आरंभीचा कणखरपणा अंतिम टप्प्यावर पोहोचेपर्यंत टिकून राहणे अत्यावश्यक असते. समोर येणाऱ्या सर्व आव्हानांना ताकतीने सामोरे जावेच लागते.

**(३)** प्रशिक्षण निःस्वार्थ, निवडा न करणारे असावे.

**(४)** व्यक्तिगत विचार किंवा इतरांच्या मतावर आधारित मदत करण्यापेक्षा वर्तन आणि त्यांचे परिणाम यांच्यातील संबंधांवर आधारित कार्य करावे.

**(५)** विश्वासार्हता, खुलेपण आणि सचोटी या स्तंभांना कायम जपावे.

**(६)** सल्लार्थी सुरक्षित असावा आणि सदैव स्वतःच्या अभिव्यक्तीशी प्रामाणिक असावा.

**(७)** जबाबदारी घेण्याऐवजी दोषारोपण करणाऱ्या व्यक्तींपासून परिस्थितीवर अधिक घातक परिणाम होत असतो.

**(८)** कायम अधिक चांगले साध्य करणे हेच जीवनहेतू असावेत.

**(९)** सल्लार्थीचे विचार आणि अनुभव कधीही नजरेआड करू नयेत.

**(१०)** सहकार्याच्या भावनेतून वाटचाल केली की विकास आणि समृद्धी साकार होते आणि गंतव्य स्थानी पोहोचणे संभव होते.

**(११)** चांगले शक्य असते.


**(१२)** कोणीही असाध्य ते साध्य करून दाखविले तरी अंततोगत्वा समुपदेशकच यशस्वी होतच असतो. निराकरण हे सल्लार्थी साठी असते, समुपदेशकासाठी नाही. मात्र समुपदेशक आणि सल्लार्थी (पक्षकार) हे सगळ्या प्रवासातील समसमान भागीदार असतात. सल्लागार किंवा इतर भूमिकेतून अशी युती होऊ नये.

स्व-विकासासाठी तयार करण्यात आलेले तीन प्रकारचे प्रारूप सर्वमान्य आहेत. त्यांच्याबद्दल पुढील भागात सविस्तर चर्चा करू या. तसेच स्वप्न दरवेळी सत्यात उतरतेच असे नसते. स्वप्नाचे रूपांतर कर्तृत्वात होतेच असे विधान ठामपणे करणे थोडेसे धार्ष्ट्याचे होईल. बरेचदा यश हाताशी आल्यासारखे वाटते आणि ते निसटून जाते.

मराठीत म्हण आहे, चहाचा कप आणि ओठ यांच्यामध्ये अंतर असते. जर स्वप्नं साकार झाली नाही तर त्याचे दुःख जरूर होते/व्हावे पण अपयशाचे पृथःकरण केले तर उत्तर मिळू शकते. ठरविलेले जीवनहेतू शक्य होतातच असेही नाही पण त्या हेतूंना परिस्थितीनुरूप बदलणे, अडचणींचे रूपांतर संधीमध्ये करणे हे महत्वाचे असते. मात्र एक सत्य अढळ आहे. पाया जितका खोलवर तितकी उंच इमारत बांधणे शक्य होते.



# दुर्वा आणि आघाडा



आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

**विष्णुस तुळशी, गणपतीस दुर्वा, महादेवाचे पिंडीवर बेल शोभे हिरवा.**

सध्या सर्वत्र श्रीगणेशोत्सव साजरा केला जात आहे. मंगलमुर्तीची पूजा करण्यासाठी दुर्वा आणि आघाडा आवश्यक असतो. भारतीय संस्कृतीत दुर्वास फार महत्त्वाचे स्थान आहे. दुर्वास हरळी असेही म्हणतात. दुर्वा कोठेही व केव्हाही मिळतात. पांढरी आणि निळी अशा दुर्वाच्या दोन जाती आहेत. दुर्वा ही वनस्पती अत्यंत पौष्टीक असून विशेषतः घोड्यांना हरळीचा चारा फार आवडतो. दुर्वाची बेटे सदैव हिरवीगार व सुशोभित दिसतात. कितीही दुष्काळ पडला तरी दुर्वाची मुळे ओलीच असतात.

पटवर्धन घराण्याचे मूळ पुरुष हरभर बाबा ह्यांनी दुवांचा रस पिऊन गणपतीची आराधना केली व गणपतीस प्रसन्न करून घेतले, अशी इतिहासात नोंद आहे. गणपतीस प्रिय असलेल्या दुर्वास आयुर्वेदात महत्व आहे.

**विविध भाषी नावे:-**

संकृत-दुर्वा, हिंदी-हरिदुब, गुजराती- घरो, इंग्रजी डॉग्सरिथ्, लॅटीन- साहनोडोन, डेक्टोलोन अशी दुर्वास विविध भाषेत नावे आहेत. प्राप्तीस्थान सर्वत्र असून सर्वभाग उपयोगी आहे.

**दुर्वाचे गुणधर्म:-**

पांढरी व निळी या दोन्ही दुर्वा मधुर, कडू शीतल, रुचकर, तुरट, रक्तशोधक, तृप्तीकारक असून वांती, दाह, रक्तदोष, रक्तपित्त, अतिसार, ज्वर, पित्तदोष यांचा नाश करते.

**औषधी उपयोग:-**

दुर्वा रक्त शुध्द करणारी असल्याने शारिरास खाज़ सुटणे, अंगावर गांधी उठणे, पुरळ येणे तसेच अंगाची, डोळ्याची आग होणे यावर रुग्णाचे वयोमान पाहून दुर्वाचा रस पोटात द्यावा. थोडा रसही अंगास लावावा. दुर्वाचा रस नियमितपणे पोटात घेतला तर लघवीला वरचेवर होणे किंवा थोडी थोडी होणे यासारखे विकार कमी होतात. अंगातील उष्णतेमुळे लघवी पिवळसर, तांबडी होते. अशावेळी वयोमानानुसार दुर्वाचा रस पोटात द्यावा. कानातून पू येतो, चिकटपाणी येते. त्यामुळे डोळ्यास जडपणा येतो. अशा-वेळी दुर्वा मूळासह उपटून स्वच्छ कराव्या व त्या ठेवून त्याचा रस काढावा. तो रस व त्याचे समभाग तोळाचे अगर खोबऱ्याचे तेल घेऊन चुलीवर तो रस आटवावा. हे तेल ५ थेंब दिवसातून ३ वेळा कानात घालावे.

नाकातील घोणा फुटून रक्त येत असल्यास दुर्वाचा रस २-४ थेंब नाकात घालावा. त्यामुळे रक्त थांबते. तापातील उष्णता कमी करण्यासाठी दुर्वाचा रस द्यावा.

बहुमूत्रमेहावर दुर्वाचा रस व बेलाच्या पानाचा रस प्रत्येकी अर्धा तोळा मिसळून पोटात द्यावा. (सकाळी संध्याकाळी) ओकारीवर तांदुळाच्या धुवणात दुर्वा वाटून रस काढावा. ५ ग्रॅम रसात १० ग्रॅम खडीसाखर घालून तो प्यावा.

लहान मुलांना आगपेण होते. अंग तांबडेलाल होते. त्यातून लस वाहते. अशावेळी दुर्वाचा रस व संगजिऱ्याचे चूर्ण एकत्र करून आगपेणीस लावावे. आगपेण सांबणाने धुवू नये.

जखम बरी होत नसल्यास दुर्वाचा रस १० तोळे तीळाचे तेल १० तोळे एकत्र करून ते मिश्रण गरम करून दुर्वाचा रस आटवावा. फक्त तेल उरले म्हणजे त्या तेलाची पट्टी जखमेवर लावावी. जखम लवकर बरी होते. उचकी सारखी येऊ लागली की, दुर्वाचा रस, मध, कात, लोह भस्म २ गुंजा एकत्र करून द्यावे. उचकी थांबते.

स्त्रियांना वेळचेवेळी मासिक पाळी न येण्याच्या अनेक तक्रारी असतात. पोट दुखणे, कंबर दुखणे यावर पांढर्या दुर्वाचा रस व डाळिंबाच्या तीन कळ्या एकत्र वाटाव्या. भाताच्या पातळ पेजेत घालून प्यावे, म्हणजे वरील तक्रारी दूर होतात.

**आघाडा:-**

हिंदू धर्मियात आघाड्यासही महत्व आहे. श्रीगणपतीची पूजा दुर्वाप्रमाणेच आघाडा वाहून केली जाते. आपल्या धार्मिक आचार विचारामध्ये या वनस्पतींनी प्राधान्य दिल्यामुळे ह्या वनस्पतीबद्दल पूज्य भावना रहावी हाही एक महत्वाचा उद्देश आहे. श्रावणात आघाड्याच्या काडीने दात घासले जातात. आघाडा. दंतरोगावरील अप्रतिम औषध असल्याने त्याने दाताचे सर्व विकार दूर होतात.

**विविध भाषी नावे:-**

आघाड्यास संक्त अपामार्ग, हिंदी- लटजिरा. गुजराती- अघंडो, कन्नड- उत्तरणी, बंगाली- आपांग, इंग्रजी- रफ चेप ट्री, लॅटीन- एचिरेन्थस, एम्पेर आदी विविध भाषेत नावे आहेत.

**गुणधर्म:-**

आघाडा कडू, उष्ण, ग्राहक, सारक क्रांतीकारक. पाचक व अग्निदिपक आहे. कफ, उदर, अर्श (मूळव्याध ) रक्तदोष, वातरोग कासहर आहे. आघाड भारतात सर्वत्र होतो. पंचांग (पान, फूल, मूळ आदी ) उपयोगी आहे.

**औषधी उपयोग:-**

कफ, अरुची, खोकला, छातीत वेदना तोंडास कोरड पडणे यावर आघाड्याची राख वयोमानाप्रमाणे १ ते ४ गुंजा, रेशमाची राख १-२ गुंजा व एक चमचा मध घालून सळाळ - संध्याकाळी प्यावे. त्यामुळे कफ पातळ होतो. खोकला थांबतो व रुग्णास आराम पडतो.

आघाडा हा व्रण रोपण करणारा आहे. आघाड्याचा रस (पानाचा ) व त्याच्या निम्मे तिळाचे तेल मिसळून

विस्तवावर आटवावे. या तेलाची पट्टी दिवसातून २-३ वेळा जखमेवर लावावी. बरी होते.

रक्तदोष आदीमुळे झालेल्या गळव्यावर आघाड्याचा पाला बारीक वाटावा. यामध्ये तेल व हळद घालून गरम करावा. ते पोटीस गळवावर लावावे. गळवे लवकर बरे होतात.

मोडशीवर आघाड्याचा चांगला उपयोग होतो. मुलांना फुटीर शौचास होतो. मलास दुर्गंधी येते. अशावेळी आघाड्याची मुळी पाण्यात उगाळून दिवसातून तीन वेळा द्यावी.

ज्या व्यक्तींना पुष्कळ घाम येतो. त्यांना मानेभोवती, छातीवर भुरकट पांढरे डाग पडतात. त्याला खाज सुटते व कोंडा निघतो. त्यावर आघाड्याचे क्षार लावावे. (क्षार काढण्याची कृती पुढे दिली आहे.) स्नान करतेवेळी अंगास साबण लावू नये. शिकेकाई लावावी.

नासारोगात म्हणजे सारखे पडसे येणे, नाकाचे हाड वाढणे, नाकाची आग होणे, इत्यादी विकारावर आघाड्याचे बी बारीक वाटावे व त्यामध्ये सैधव, मेंदीचा व जाईचा पाला समभाग घाल-ावा. सर्व एकत्र कुटुन त्याचा कतक तयार करावे व कतकाच्या निम्मे तीळाचे तेल घालून अग्निवर तेल सिध्द करावे. हे तेल नियमितपणे दिवसातून २-३ वेळा नाकात घालावे. नासारोग बरे होतात.

आघाड्याच्या पानाचा रस १० ग्रॅम व खडीसाखर १० ग्रॅम घालून पिण्यास दिल्यानंतर लघवी साफ होते. कान दुखत असल्यास आघाड्याचा रस ३-४ क्षेत्र कोमट करून कानात घालावा. कानदुखी थांबते. तसेच मेद (स्थूलता) सूज, अर्श, कर्णनाद पोटशूळ, उपदंश (गरमी) आदी विकारावरही आघाडा उपयोगी आहे.

विंचवाच्या विषावर विंचू चावलेल्या मनुष्यास आघाड्याची मुळी पाण्यात उगाळून ते पाणी पिण्यास द्यावे. विंचू चावलेल्या जागी मुळी उगाळून ते गंध लावावे. विष उतरते. उंदीर, कुत्र्याचे विषावरही हा उपचार लागू पडतो.

**आघाडा क्षार कसा करावा?**

आघाड्याची झाडे मुळासह उपटून आणून वाळवावीत. नंतर ती जाळून राख तयार करावी. ती राख मडक्यात घालून त्यात राखेच्या चौपट पाणी घालून कालवावे. १२ तास ते संथ ठेवावे. नंतर वरील पाणी गाळून घ्यावे. ते पाणी लोखंडाचे कढईत आटवावे. पाणी आटल्यावर तळाला पांढरा स्वच्छ क्षार रहातो. तो आघाडा क्षार होय. आघाड्याची झाडे श्रावण, भाद्रपद महिन्यात मोठ्या प्रमाणात येतात. म्हणून या दोन महिन्यात हा क्षार करून ठेवावा. आघाडा झाडे तुरा आलेली क्षार करताना घ्यावीत.

## श्री गजानन

सरसर शिरव्याने सरतो गारवा श्रावणाचा,
नूपुरांचा झंकार गुंततो भादव्यात गणपतीचा.
श्रींच्या आगमनाने पुलकित होई तन अन् मन..
लाल जर्द जास्वंदी शोभे शिरी गणेशा छान.
गजाननाच्या मस्तकी झळके मुकुट रत्नांकित..
तुंदिल तनुवरी पितांबर साजिरे शोभिवंत.
दुर्वांकुर सोंडेवर साजती कंठी मौक्तिक माळ..
पाशांकुश हाती धरुनी करी दुष्टांचा निर्दाळ.
सद्बुद्धी देण्या भूवर गजानन..
मोदकप्रिय हेरंबाचा करिती हो घोष जन.

संगीता बापट



## बाप्पा

गणेशोत्सव अवलोकूनी बाप्पा
भूवर आले निघूनी स्वस्वरूप मूर्ती
अनंत येथे आनंदाने कसे गेले हरखूनी !
सुंदर ते रूप नटलेले देखणे अलंकृत
सजलेले विविध वेषात,
विविध पोषाख रंगीबिरंगी मूर्ती रूपात असलेले !
मातेची तीव्र आठवण आली
अवती भवती भासू लागली !
स्वप्राणाने प्राण फुंकूनी
पुतळ्यांची सजीव निर्मिती केली....
असाच पुतळ्यातून जन्म
असाच हा अवतार अवतरला !
येथे सुंदर मूर्ती, शिल्प,
पुतळे कलाकारांनी जीव ओतला !
देवपण भक्तांनी बहाल केले !
उल्हास उत्साहास उधाण आले
बाप्पाचे मन आले भरून डोळे

मीना खोंड

## परीकथा

फळ्या लाकडी तुटकी माडी हरखून गेले जुने ढिगारे !
पुस्तक उघडे मान वाकडी दिवस उडाले मोरपिसांचे !
वास जुन्या पानांचा पिवळ्या, शब्द सावल्या सावरल्या
उभ्या रेशमी धाग्यापुरते चक्र रथाचे अडखळले.
पिंचली होती पुढच्या पानी एक गुलाबी मुकी कळी;
खिळखिळल्या पानात दाटल्या परीकथेच्या आठवणी !

राजीवलोचन

**म्यानमारमध्ये सुरू असलेले भयंकर गृहयुद्ध आणि बांगलादेशमधील राजकीय गोंधळाच्या पृष्ठभूमीवर भारताचे 'ॲक्ट ईस्ट' धोरण धोक्यात आले आहे. ईशान्य भारत आणि आग्नेय आशियामधील आर्थिक आणि धोरणात्मक संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने हे धोरण सुरू करण्यात आले होते; परंतु आता म्यानमार आणि बांगलादेशमधील बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे त्यात अडथळे येत आहेत.**

# 'ॲक्ट ईस्ट'ला धोका




नोंद
प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

म्यानमारमध्ये सुरू असलेले भयंकर गृहयुद्ध आणि बांगलादेशमधील राजकीय गोंधळाच्या पृष्ठभूमीवर भारताचे 'ॲक्ट ईस्ट' धोरण धोक्यात आले आहे. भारताच्या ईशान्य आणि आग्नेय आशियामधील आर्थिक आणि धोरणात्मक संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने हे धोरण सुरू करण्यात आले होते; परंतु आता म्यानमार आणि बांगलादेशमधील बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे त्यात अडथळे येत आहेत. म्यानमारमध्ये परिस्थिती बिघडत आहे. सत्ताधारी लष्करी जंटा (तत्माडॉ) आणि विविध जातीय बंडखोर गटांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाने देशाला गृहयुद्धाच्या स्थितीत ढकलले आहे.

भारताच्या महत्त्वाकांक्षी कलादान मल्टी मोडल ट्रान्सपोर्ट (केएमटी) प्रकल्पाचा एक मोठा भाग असलेल्या राखीन (पूर्वीचे अराकान) प्रांतावर म्यानमारचे सैन्य नियंत्रण गमावत आहे. आता राखीन प्रांताचा मोठा भाग म्यानमार-बांगलादेश सीमेवर स्वतंत्र राज्य स्थापन करण्याच्या प्रयत्नात असलेल्या विघटनवादी अरकान आर्मीच्या ताब्यात आहे. राखीन प्रांताचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या सित्तवे (पूर्वीचे अक्कियाब) ताब्यात घेण्यासाठी अरकान लष्कराने मोठ्या प्रमाणावर तैनाती सुरू केली आहे. हे शहर बंडखोरांच्या हाती जाणे हा म्यानमारचा मोठा सामरिक पराभव ठरेल आणि भारतासाठीही गंभीर संकट निर्माण होईल. अरकान आर्मीची ताकद केवळ तिच्या यशापुरती मर्यादित नाही, तर इतर बंडखोर गटांशी युती करून आपली स्थिती आणखी मजबूत करत आहे. जुलैच्या उत्तरार्धात एमएनडीएए या कोकांग बंडखोर गटाने म्यानमारच्या सैन्याचा पराभव केला आणि चीनच्या सीमेवर असलेल्या उत्तर शान राज्यातील लशिओ शहर ताब्यात घेतले. म्यानमारच्या सैन्यासाठी हा मोठा पराभव होता. कारण त्यांच्या उत्तर-पूर्व कमांडचे मुख्यालय लशिओ येथे होते. काचिन इंडिपेंडन्स आर्मी (केआयए) ने बर्मी सैन्याविरुद्ध महत्त्वपूर्ण विजय मिळवला. त्यांनी काचिन राज्यातील बर्मी लाईट इन्फन्ट्री बटालियन (एलआयबी) ४३७ चे मुख्यालय ताब्यात घेतले. या विजयांमुळे प्रेरित होऊन अरकान आर्मीने आता म्यानमारपासून औपचारिकपणे स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी सिटवे ताब्यात घेण्याची योजना आखली आहे. भारतासाठी ही परिस्थिती आणखी गुंतागुंतीची आहे. भारताने राखीन राज्यातील 'कलादान मल्टी मोडल ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट'अंतर्गत सिटवे बंदराच्या आधुनिकीकरणासाठी ४८४ दशलक्ष डॉलरची गुंतवणूक केली आहे. भारतातील ईशान्येकडील राज्यांना म्यानमार आणि त्यापलीकडे दक्षिण-पूर्व आशियाशी जोडण्यासाठी हा प्रकल्प अतिशय महत्त्वाचा आहे; मात्र म्यानमारमधील बिघडलेल्या परिस्थितीमुळे हा प्रकल्प पूर्ण करण्यात अनेक अडथळे निर्माण होत आहेत. अरकान आर्मीने याआधी हा प्रकल्प उधळून लावला होता. भारतीय लष्कराने मिझोराम सीमेवर म्यानमारमधील त्यांच्या तळांवर ऑपरेशन सनशाईन सुरू केले होते. तथापि, गेल्या वर्षी अरकान आर्मीने सत्ताधारी लष्करी जंटाविरुद्धच्या मोहिमेदरम्यान राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर ठरू शकणाऱ्या कनेक्टिव्हिटी प्रकल्पांना विरोध करणार नाही, असे सूचित केले. अरकान आर्मीने म्यानमारपासून आपले स्वातंत्र्य घोषित केले आणि भारताने त्याला मान्यता दिली नाही तर हा प्रकल्प धोक्यात येऊ शकतो.

चीनने राखीन प्रांतातील खोल समुद्र बंदर आणि तेल-गॅस पाईपलाईनसारख्या मोठ्या प्रकल्पांमध्येही गुंतवणूक केली आहे. चीन रागावू नये म्हणून अरकान आर्मी क्यूकफ्यू बंदरावर हल्ला करणे टाळत असले, तरी सिटवे ताब्यात घेण्याची त्यांची योजना चीनसाठी डोकेदुखी ठरू शकते. कोलकाता-बँकॉक महामार्ग हा भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. तो त्रिपक्षीय महामार्ग म्हणून ओळखला जातो. भारत, म्यानमार आणि थायलंडमधील संपर्क वाढवणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे; परंतु म्यानमारमधील बिघडलेल्या परिस्थितीमुळे तो पूर्ण आणि कार्यान्वित करणे आता कठीण होत आहे. शेख हसीना यांना बडतर्फ केल्यानंतर, बांगलादेशमधील विरोधी पक्ष भारतासोबत केलेल्या करारांच्या पुनरावलोकनाची मागणी करत आहेत. त्यामुळे भारताचे ॲक्ट ईस्ट धोरण आणखी अडचणीत येऊ शकते. म्यानमारमधील गृहयुद्ध आणि राखीन प्रांतातील अरकान आर्मीचा वाढता प्रभाव यामुळे भारताच्या कनेक्टिव्हिटी प्रकल्पांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परिणामी, येत्या काही महिन्यांमध्ये भारताला सुदूर पूर्व धोरणांतर्गत आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी नवीन धोरणात्मक उपाय शोधावे लागतील. भारताचे 'ॲक्ट ईस्ट' धोरण हे दक्षिण-पूर्व आशियाई देशांना गुंतवून ठेवण्याच्या उद्देशाने धोरणात्मक चौकट आहे. म्यानमारमध्ये सुरू असलेल्या नागरी अशांततेमुळे व्यापार, सांस्कृतिक आणि जमीन मार्गांद्वारे होणारी देवाणघेवाण मागे पडली आहे. आग्नेय आशियाई देशांना व्यापार, वाणिज्य आणि बहुपक्षीय गुंतवणुकीद्वारे अधिक समंजसपणे जोडण्याचा भारताचा प्रयत्न आहे. प्रादेशिक खेळाडू बनण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेशी या धोरणाचे उद्दिष्ट सुसंगत आहे. या धोरणाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्याची भौगोलिक खोली. भारतीय पंतप्रधान आणि त्यांच्या राजनयिक सहभागामुळे या क्षेत्रामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. प्रारंभी म्यानमार, दक्षिण कोरिया आणि थायलंड हे पूर्व आशियाशी भारताच्या संलग्नतेची जाणीव करून देण्यासाठी महत्त्वाचे भागीदार मानले जात होते. मात्र त्यानंतर लक्षात आले की, या प्रदेशातील अधिक देशांशी आर्थिक संबंध हा या भागावरील वाढत्या प्रभावाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. पूर्वीचे 'एलईपी' फक्त आशियाई देशांशी केंद्रित होते तर पुनरुज्जीवित 'एईपी'ने आशिया पॅसिफिकचा समावेश करून आपली धोरणात्मक खोली वाढवली. पूर्व आणि दक्षिण-पूर्व आशियाशी सागरी मार्गांद्वारे 'कनेक्टिव्हिटी' साधत भारताने प्रगती साधली आहे; परंतु जमिनीवरील मार्गदेखील महत्त्वाचे आहेत आणि ही कनेक्टिव्हिटी सुलभ करण्यात म्यानमारची भूमिका महत्त्वाची आहे. या धोरणात्मक चौकटीत ईशान्य भारताला प्राधान्य देण्यात आले आहे.

'ॲक्ट ईस्ट' धोरणाच्या कोणत्याही यशासाठी आणि पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेची खात्री करण्यासाठी 'नॉर्थ ईस्ट' हा महत्त्वाचा पाया आहे. या धोरणाचे यश, विशेषत: ईशान्येकडील भूमार्गाबाबत म्यानमारशी स्थिर आणि मैत्रीपूर्ण संबंधांवर अवलंबून आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये झालेल्या लष्करी बंडानंतर म्यानमारमध्ये अराजकता पसरली आहे. आंग सान स्यू की यांच्या सरकारने सुरू केलेली युद्धविराम प्रक्रिया कोलमडली आहे. त्यामुळे हिंसाचारात वाढ झाली असून नोव्हेंबर २०२३ पासून अनेक वांशिक बंडखोर गटांनी समांतर प्रशासनाची स्थापना केली आहे. या परिस्थितीमुळे म्यानमारचे तुकडे होण्याच्या मार्गावर आहे आणि जागतिक समुदायापासून ते अलिप्त झाले आहे. म्यानमारचे राजकीय भूदृश्य जटिलतेने भरले आहे. त्यात लष्करी जंटा आणि बहुजातीय राज्यांची नाजूकता यांचा समावेश आहे. त्यामुळे भारताने आणखी अस्थिरता आणि संघर्ष वाढण्याची शक्यता कमी लेखू नये. काही अंदाजांनुसार, राखीन राज्याचा ६० टक्के आणि शेजारील राज्याचा ३० टक्के भाग अरकान लष्कराच्या ताब्यात आहे. म्यानमारच्या अंतर्गत संकटात आजघडीला प्रभावीपणे हस्तक्षेप करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाच्या त्वरित कारवाईची आवश्यकता आहे. भारत प्रादेशिक प्रभाव आणि मुत्सद्दी कौशल्याद्वारे संकटाचे निराकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. भारताने अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याची हीच वेळ आहे. याच सुमारास म्यानमारसह १६४३ किलोमीटर सीमारेषेवर कुंपण घालण्याचा भारताचा अलिकडील निर्णय अधिक बचावात्मक भूमिकेकडे बदल दर्शवतो. हा निर्णय 'ॲक्ट ईस्ट' धोरणांतर्गत खुल्या प्रतिबद्धतेच्या तत्त्वांच्या विरोधात आहे. या प्रदेशात चीनचा वाढता प्रभाव आणि लष्करी जंटा आणि वांशिक गटांमधील चर्चेत त्याचा सहभाग यामुळे भारताला त्याचे 'ॲक्ट ईस्ट' वचन पूर्ण करण्यासाठी आव्हानात्मक स्थिती दिसते. परिस्थिती आणखी जटिल बनून 'केएमएमटी'सारख्या भारतअनुदानित पायाभूत सुविधा प्रकल्पांना विलंब होत आहे. म्यानमारशी संपर्क आणि व्यापार संबंध मजबूत करण्याच्या प्रयत्नांना अडथळा आणत आहेत. काही भागात संघर्षही हे प्रकल्प सुरू होण्यात अडथळा ठरत आहे. परिस्थिती भरून येण्यासारखी नसली, तरी भारताकडून निर्णायक कारवाईची गरज आहे. धोरणात्मक निष्क्रियता चुकीचे निर्णय घेण्याइतकीच हानीकारक असू शकते. त्यामुळे भारताने या आव्हानांवर मात करण्यासाठी निर्णायक कृती केली पाहिजे आणि 'ॲक्ट ईस्ट पॉलिसी'शी आपली वचनबद्धता कायम ठेवली पाहिजे.



**अक्षय ऊर्जा ही अमर्यादित आणि प्रदूषणमुक्त ऊर्जा आहे. तिचे सतत नूतनीकरण होत राहते. क्षय होत नसलेल्या अशा नैसर्गिक ऊर्जा प्रकारांना अक्षय ऊर्जेचे स्रोत म्हणतात. असे महत्त्वाचे स्रोत म्हणजे सूर्य, पाणी, वारा, भरती-ओहोटी आणि भूऔष्णिक प्रकल्प. सौर ऊर्जेचा मुख्य स्रोत असलेल्या सूर्याचा प्रकाश आपोआप पृथ्वीवर पोहोचतो. आता केंद्र सरकारने सौर वीज निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे धोरण आखल्यामुळे पर्यावरणाचेही रक्षण होईल.**

# अक्षय ऊर्जा हाच एकमेव शाश्वत पर्याय

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

जगभरातील पारंपरिक ऊर्जेपेक्षा अक्षय ऊर्जेची मागणी सातत्याने वेगाने वाढत आहे. सध्या संपूर्ण जग गंभीर पर्यावरणीय आव्हानांना तोंड देत आहे आणि पारंपरिक ऊर्जा स्रोत ही समस्या अधिक गंभीर बनवत आहेत. या गंभीर आव्हानांना तोंड देण्यासाठी अक्षय ऊर्जा प्रभावी ठरू शकते. यामुळेच भारततही अक्षय ऊर्जा उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात असून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा इत्यादींचे उत्पादन वाढविण्यासाठी मोठे प्रकल्प उभारले जात आहेत. विविध प्रसंगी पंतप्रधानांनी सौर ऊर्जेचे निश्चित, शुद्ध आणि सुरक्षित असे वर्णन करून अक्षय ऊर्जेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

देशात नवीकरणीय ऊर्जेबद्दल जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने २००४ पासून दरवर्षी २० ऑगस्ट रोजी 'अक्षय ऊर्जा दिन' साजरा केला जातो. प्रदूषक आणि मर्यादित पारंपरिक ऊर्जा स्रोतांऐवजी अक्षय ऊर्जेच्या माध्यमातून ऊर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी देशाच्या विविध भागांमध्ये आता विविध अक्षय ऊर्जा प्रकल्प स्थापन केले जात आहेत. या प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या विजेमुळे वातावरणात दरवर्षी लाखो टन कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन कमी होणार आहे. नवीकरणीय ऊर्जा उत्पादनाच्या दृष्टीने ही दखलपात्र बाब आहे की, भारत या बाबतीत जगातील चौथा महत्त्वाचा देश असून नवीन अक्षय ऊर्जा प्रकल्पांसह या दिशेने वेगाने पुढे जात आहे.

पावागडा, कर्नाटक येथील दोन हजार मेगावॉटपेक्षा जास्त क्षमतेच्या सौर पार्कसह, देशातील इतर काही सौर पार्क सौर ऊर्जेचे जोमदार उत्पादन करत आहेत आणि देशातील अक्षय ऊर्जा उत्पादनातही महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. सूर्य हा सौर ऊर्जेचा मुख्य स्रोत आहे. त्याचा प्रकाश आपोआप पृथ्वीवर पोहोचतो. या सूर्यप्रकाशाचे आपण सौर ऊर्जेत रूपांतर केले नाही तरी हा प्रकाश पृथ्वीवर येतच राहील.

सूर्यापासून मिळणारी ही अमर्याद ऊर्जा वापरल्यामुळे कमी होत नाही तसेच पर्यावरणाला हानी पोहोचवत नाही. म्हणूनच सूर्याकडून प्राप्त झालेल्या या ऊर्जेला अक्षय ऊर्जा म्हणतात. 'ग्लोबल वॉर्मिंग' आणि हवामान बदल रोखण्यासाठी नवीकरणीय ऊर्जेचा अवलंब करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. खरे तर पृथ्वीचे वाढते तापमान आणि 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे वाढत्या नैसर्गिक आपत्तींमुळे संपूर्ण जग चिंतेत आहे, म्हणूनच कोळसा, वायू, पेट्रोलियम उत्पादने अशा पारंपरिक ऊर्जेच्या स्रोतांऐवजी अक्षय ऊर्जेला प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक आहे.

भारतासह अनेक प्रमुख देशांमध्ये औष्णिक ऊर्जा प्रकल्पांमध्ये कोळशाचा वापर कमी करताना आता सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा यासारखे अक्षय ऊर्जेचे महत्त्वाचे स्रोत वापरले जात आहेत. आज संपूर्ण जगाला स्वच्छ पर्यावरणासाठी कोळशावर आधारित औष्णिक ऊर्जा प्रकल्पांऐवजी स्वच्छ आणि हरित ऊर्जेची गरज आहे. या गरजा अधोरेखित करताना पंतप्रधानांनी 'एक जग, एक सूर्य, एक ग्रीड' या विषयावर बोलताना संपूर्ण जगाला हाक दिली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतातील सौर ऊर्जा उत्पादन क्षमता अनेक पटींनी वाढली आहे. याशिवाय पवन ऊर्जेच्या माध्यमातून ऊर्जेची गरज भागवण्याचा उपक्रम सुमारे साडेतीन दशकांपूर्वी सुरू झाल्यानंतर आजपर्यंत देशाच्या पवन ऊर्जा उत्पादन क्षमतेतही लक्षणीय वाढ झाली आहे. चीन, अमेरिका आणि जर्मनीनंतर भारत आता पवन ऊर्जा उत्पादनात चौथ्या क्रमांकावर आहे. सध्या देशात शुद्ध, सुरक्षित आणि विश्वासार्ह ऊर्जेच्या दिशेने ज्या प्रकारे वेगाने पावले टाकली जात आहेत, त्यावरून दिसते की, येत्या काही दशकांमध्ये कोळसा, वायू इत्यादीसारख्या प्रदूषणकारक ऊर्जास्रोतांवरील देशाचे अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी होईल. भारत सरकारने २०३० पर्यंत भारताची अक्षय ऊर्जा स्थापित क्षमता ५०० गीगावॉटपर्यंत वाढविण्याचे आणि २०३० पर्यंत देशाच्या एकूण कार्बन उत्सर्जनात एक अब्ज टन घट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे दशकाच्या अखेरीस देशाच्या अर्थव्यवस्थेची कार्बन तीव्रता कमी होईल. २०७० पर्यंत कार्बन उत्सर्जन ४५ टक्क्यांनी कमी करणे आणि निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याचे निश्चित केले आहे. नुकत्याच आलेल्या 'मूडीज रेटिंग' अहवालानुसार २०३० पर्यंत भारताचे ५०० गीगावॉट नवीकरणीय ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट आहे आणि २०३० पर्यंत हे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी भारताला ३८५ अब्ज डॉलर गुंतवणूक करावी लागेल. भारताने २०२२ पर्यंत १७५ गीगावॉटचे उद्दिष्ट चुकवले असले, तरी 'मूडी'च्या मते २०३० पर्यंत अक्षय ऊर्जा लक्ष्य पूर्ण करण्यासाठी भारताने दरवर्षी ५० गीगावॉट गैर-जीवाश्म इंधन क्षमता जोडण्याची योजना आखली आहे.

४४ गीगावॉटची वार्षिक क्षमता वाढदेखील लक्ष्य साध्य करण्यात मदत करेल. 'मूडीज'च्या मतांनुसार २०३० पर्यंत ५०० गीगावॉटचे अक्षय ऊर्जा लक्ष्य गाठण्यासाठी भारताला पुढील सहा-सात वर्षांमध्ये १९०-२१५ अब्ज डॉलर्स आणि प्रसारण आणि वितरणावर १५०-१७० अब्ज डॉलर खर्च करावे लागतील. भारताच्या सशक्त धोरण समर्थनामुळे २०२३-२४ या आर्थिक वर्षात ऊर्जा निर्मिती क्षमतेमध्ये अक्षय ऊर्जेचा वाटा सुमारे ४३ टक्क्यांपर्यंत वाढला आहे तसेच खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीलाही आकर्षित केले आहे. नवीकरणीय ऊर्जेमध्येही स्थिर वाढ होत आहे; परंतु अहवालात म्हटले आहे की, कोळसा पुढील १० वर्षांसाठी वीज निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. येत्या काही वर्षांमध्ये अक्षय ऊर्जेची क्षमता झपाट्याने वाढविण्यासाठी खूप काम करावे लागणार आहे. कारण दीड दशकानंतर भारतातील सौर ऊर्जेची मागणी सात पट वाढू शकते.

केवळ भारतच नाही तर संपूर्ण जगाला विजेसारख्या महत्त्वाच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मर्यादित नैसर्गिक संसाधनांचा सामना करावा लागत आहे तसेच पर्यावरणीय असंतुलन आणि विस्थापनासारख्या गंभीर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अक्षय ऊर्जा हा एकमेव पर्याय आहे, जो पर्यावरणीय समस्यांना तोंड देण्यासाठी ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी प्रभावी ठरेल. गेल्या चार-पाच दशकांमध्ये वाढत्या जागतिक लोकसंख्येसाठी ऊर्जेची मागणी झपाट्याने वाढत आहे. ही मागणी अक्षय ऊर्जेच्या माध्यमातून पूर्ण करता येऊ शकते.

आता अक्षय ऊर्जा हाच भविष्यासाठी एकमेव पर्याय आहे. कारण ती कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन कमी करून पर्यावरणाचे रक्षण करण्यास उपयुक्त आहे. नवीकरणीय ऊर्जेचे पर्याय मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. यावर कोणत्याही देशाची मक्तेदारी नाही. या कारणास्तव ते सहज पुरवले जाऊ शकतात. गेल्या अनेक दशकांपासून जीवाश्म इंधनाच्या स्वरूपात आपण वापरत असलेले ऊर्जास्रोत मर्यादित आहेत. सततच्या शोषणामुळे त्यांचा साठा कमी होत आहे.

दुसरे म्हणजे हे स्रोत जीवाश्म इंधन प्रदूषित करत आहेत. अशा स्थितीत केंद्र सरकारने २०३० च्या अखेरीस ५०० गीगावॅट अक्षय ऊर्जा क्षमतेचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यात वनऊर्जेतून १४० गीगावॉट, सौर ऊर्जेतून २८० गीगावॉट, बायोमास ऊर्जेतून ८० गीगावॉट आणि लहान जलविद्युत प्रकल्पांचे उद्दिष्ट समाविष्ट आहे. सौर ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने अनेक नवीन कार्यक्रम सुरू केले आहेत; जसे की राष्ट्रीय सौर ऊर्जा अभियान, ज्याचा उद्देश संशोधन आणि विकास आणि कच्चा माल आणि उत्पादनांच्या देशांतर्गत उत्पादनाद्वारे सौर ऊर्जेच्या वापरावरील खर्च कमी करणे आहे. केंद्र सरकारने आंतरराष्ट्रीय सौर आघाडीही स्थापन केली आहे. पॅरिसमध्ये ३० नोव्हेंबर २०१५ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदेदरम्यान भारत आणि फ्रान्सने संयुक्तपणे १२२ सौर संसाधन समृद्ध देशांची ही आघाडी उभी केली.

या आराखड्यात २०३० पर्यंत अक्षय ऊर्जा आणि प्रगत आणि स्वच्छ जैव इंधन तंत्रज्ञानासाठी संशोधनात गुंतवणूक वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. स्वच्छ सूर्यप्रकाशाच्या दिवस प्रतिचौरस मीटर सरासरी पाच किलोवॉट सौर ऊर्जा प्रतितास उपलब्ध होते. एक मेगावॉट सौर ऊर्जा निर्मितीसाठी सुमारे तीन हेक्टर सपाट जमीन आवश्यक असते. उष्णकटिबंधीय देश असल्याने आपल्याला वर्षभरात सुमारे तीन हजार तास सूर्यप्रकाश मिळतो.

रुफटॉप सोलर एनर्जी आणि सोलर पार्क हे सौर ऊर्जा उत्पादनात सर्वाधिक योगदान देतात. हे प्रमाण देशातील वीज निर्मितीच्या स्थापित क्षमतेच्या १६ टक्के आहे. ते ६० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. एका अंदाजानुसार २०३५ पर्यंत देशातील सौर ऊर्जेची मागणी सात पट वाढण्याची शक्यता आहे. सौर ऊर्जेचा वापर वाढल्याने जीडीपी दरही वाढेल. ग्रीड कनेक्टेड रूफटॉप आणि लहान सौर ऊर्जा संयंत्र कार्यक्रमदेखील सरकार राबवत आहेत. या कार्यक्रमात सामान्य श्रेणीतील राज्यांमध्ये खर्चाच्या ३० टक्के आणि विशेष श्रेणीतील राज्यांमध्ये ७० टक्क्यांपर्यंतची आर्थिक मदत केंद्र सरकारकडून दिली जात आहे; मात्र नवीकरणीय ऊर्जेबाबत लोकांमध्ये जागरूकतेचा अभाव आहे. त्यामुळे उपलब्ध क्षमता असूनही अक्षय ऊर्जेचा वापर फारच कमी आहे. कुशल मनुष्यबळाचा अभाव आहे.

भारताच्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी पायाभूत सुविधा मजबूत करण्याची गरज आहे. यासोबतच ऊर्जेचे नवीन स्रोत शोधणेही महत्त्वाचे आहे. सौर ऊर्जेसोबतच किनारी भागात पवन आणि जल ऊर्जेपासून वीजनिर्मिती करून ऊर्जेची गरज भागवता येते. नूतनीकरणक्षम ऊर्जेचा वापर केल्याने वायू प्रदूषण कमी केले जाऊ शकते. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)